CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २४ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०६ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघकार्यपद्धतीत पदामुळे कुणीही कार्यकर्ता लहानमोठा ठरत नाही. पद ही संघटनेतील व्यवस्था असते आणि ती व्यवस्था स्वीकारून सर्व कार्यकर्ते काम करतात. प्रत्येक पदाची कर्तव्ये, अधिकार, मर्यादा याचे विवरण केलेले संघाचे एखादे पुस्तकही नाही! कार्यकर्ताच स्वतःच्या जीवनाने, वागणुकीने, व्यवहाराने त्या त्या पदाला अर्थ प्राप्त करून देतो.

- स्व. दामुअण्णा दाते
रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे पूर्व प्रांत प्रचारक

# समान नागरी कायदा राज्यात लवकरच

- निवृत्त न्यायमूर्तींच्या समितीला मान्यता; बहुपत्नीत्वावरही बंदी येणार
- गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची विधानसभेत माहिती



पावसाळी अधिवेशन

**मुंबई, २३ जून**

राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने पाऊल उचलले आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांनी निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यास मान्यता दिली असून, या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यात येणार आहे, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.



पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी भाजप आमदार देवयानी फरांदे यांनी नाशिक जिल्ह्यातील तिहेरी तलाकच्या घटनांबाबत लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता. राज्य सरकार समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सकारात्मक आहे, असे या प्रश्नावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले. 'युसीसी' लागू झाल्यानंतर त्यामध्ये बहुपत्नीत्वावरील बंदीचाही समावेश असेल. सरकार कोणत्याही धर्माच्या किंवा व्यक्तीच्या विरोधात नाही. 'यूसीसी' लागू झाल्यानंतर प्रत्येक धर्माच्या व्यक्तीला कायदा लागू होईल, असे ते म्हणाले. केंद्र सरकारने तिहेरी तलाकवर बंदी आणली असली तरी अशा घटना वाढत असल्याचा दावा केला होता.नाशिकमधील तीन मुस्लिम महिलांकडून धमक्या, हिंसाचार आणि तिहेरी तलाकसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे सभागृहात सांगितले. (तभा वृत्तसेवा)




## मादक पदार्थांचे उत्पादन, विक्रीचे जाळे उद्ध्वस्त करणार

राज्यातील अंमली पदार्थांच्या विरोधातील मोहिमेबाबत राज्य सरकारात सतर्क असून प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये मादकपदार्थ विरोधी पथक निर्माण केले जाणार आहे. मादक पदार्थांचे उत्पादन आणि विक्रीचे जाळे द्ध्वस्त केले जाणार आहे. कुणालाही सोडणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. विधानसभेत तारांकित प्रश्नावर उत्तर देतांना मुख्यमंत्री बोलत होते. आपल्या परीक्षेत्राच्या बाहेरील पोलीस पथकाने कारवाई केली तर संबंधित पोलिस ठाण्याच्या ठाणेदारावर कठोर कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. ड्रग्ज विरोधी मोहीम केंद्र सरकारने सर्व राज्यांच्या समन्वयाने आखली असून, यासाठी पंधरा विभागांचा सहभाग असलेली 'व्होल ऑफ द गव्हर्नमेंट' रणनीती राबवली जात असल्याचे यावेळी सांगितले. ही लढाई केवळ पोलिसांच्या बळावर लढता येणार नाही. मादक पदार्थांच्या जाळ्याची मागची-पुढची साखळी शोधण्याचे काम सुरू आहे. शाळांबाहेरील संशयित ठेले व संभाव्य ठिकाणे उद्ध्वस्त केली. देशातील सर्वात मोठा सूत्रधार सलीम दोला याला अटक करून भारतात आणले आहे. मुंबई पोलिसांनी सलीम दोला आणि त्याच्या बारा साथीदारांना अटक केली. सातारा येथील फॅक्टरी त्याचीच असल्याचे आरोपीने मान्य केल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



## पीक नुकसानीच्या अचूक आकडेवारीसाठी ड्रोनचा वापर करा

वृत्त शेवटच्या पानावर



सोलापूर शहरात मंगळवारी सकाळपासून ढगांची गर्दी दिसून आली. त्यामुळे वातावरणात थंडावा निर्माण झाला होता. सोलापूर-पुणे हायवेवर टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

# मान्सूनची घोडदौड

विदर्भाला ऑरेंज अलर्ट

### मुसळधार पावसाचा अंदाज; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**मुंबई, २३ जून**

मुंबईच्या वेशीवर असलेला मान्सून संपूर्ण राज्य व्यापण्यासाठी सज्ज असून, बहुतांश जिल्ह्यात मंगळवारी मुसळधार पावसाची नोंद झाली. पुढील काही तासात, मुंबई, पश्चिम, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. विदर्भातील नागपूर, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे.

भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवसांत मान्सून संपूर्ण राज्य व्यापणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. मंगळवारी मुंबईच्या माटुंगा, सेनापती बापट मार्ग, वांद्रे आणि वरळी सी-लिंक परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावली. पुढील काही तास मुंबई आणि उपनगरांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून दुपारनंतर पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. विदर्भातील नागपूर, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. या भागात दमट हवामानासह मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात मोठी घसरण

**मुंबई :** आशियाई बाजारातील मंदीच्या संकेतांमुळे मंगळवारी भारतीय शेअर बाजाराच्या दोन्ही प्रमुख निर्देशांकांमध्ये मोठी घसरण झाली. सुरुवातीच्या संथ वाटचालीनंतर सेन्सेक्स आणि निफ्टी कमालीचे खालावले. जागतिक घडामोडींचा विचार करता, दक्षिण कोरियाच्या 'कोस्पी' निर्देशांकात ९ टक्क्यांची प्रचंड घसरण झाल्यामुळे तिथे सर्किट ब्रेकर लागू करण्यात आला होता, ज्यामुळे तिथले ट्रेडिंग २० मिनिटांसाठी थांबवावे लागले. या पडझडीचा परिणाम भारतीय बाजारावरही दिसून आला.

### अनैशा भालाची बुद्धिबळ स्पर्धेत दमदार कामगिरी

**अकोला :** अवघ्या ५ वर्षांच्या अनैशा अंकित भाला हिने पुसद येथे आयोजित प्रथम लिटल स्टार ऑल इंडिया इंटरनॅशनल फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत उल्लेखनीय सहभाग नोंदवत स्पर्धेतील सर्वात लहान खेळाडू होण्याचा मान मिळवला व स्पर्धेत दमदार कामगिरी केली. ही स्पर्धा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना, भारतीय बुद्धिबळ महासंघ व जागतिक बुद्धिबळ संघटना फिडे यांच्या अंतर्गत घेण्यात आली होती.या स्पर्धेत देशभरातून आलेल्या ३३१ खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धा ९ फेऱ्यांमध्ये पार पडली असून एकूण ६२ हजार रुपयेचे पारितोषिक ठेवण्यात आले होते.

## हा देश संविधानाने चालतो

### भातखळकरांनी सना मलिकांना सुनावले

सभागृहात कुराण आणि पाकिस्तानच्या परंपरांवर भाषण देण्याची गरज नाही. हा देश संविधानाने चालतो, कुराणाच्या आधारावर नाही, अशा शब्दात आमदार अतुल भातखळकर यांनी आमदार सना मलिकांना सुनावले.

ट्रिपल तलाक प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीवरून आणि बहुविवाहाच्या मुद्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये प्रचंड गदारोळ होऊन जोरदार खडाजंगी उडाली. नाशिकमधील ट्रिपल तलाक आणि पीडित महिलेवर झालेल्या हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर भाजप आमदार देवयानी फरांदे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती.



लक्षवेधीवरील चर्चेत सहभाग घेताना आमदार सना मलिक यांनी मुस्लिम कौटुंबिक कायदा, कुराण आणि पाकिस्तानमधील कायद्यांचे दाखले देत बहुविवाहाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. तसेच ट्रिपल तलाक कायद्याच्या स्वरूपावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सना मलिक यांच्या या वक्तव्यावर तखळकर अत्यंत आक्रमक झाले. सभागृहात काही काळ प्रचंड गदारोळ निर्माण झाला. विरोधी पक्षनेते जयंत पाटील आणि भास्कर जाधव यांनी सना मलिक यांना सावरण्याचा निष्फळ प्रयत्न केला.

#### मुनगंटीवारांची मध्यस्थी आणि विषय समाप्ती

सभागृहातील वाढता धार्मिक रंग आणि तणाव पाहता ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी अत्यंत कौशल्याने मध्यस्थी केली. त्यांनी स्पष्ट केले की, स्त्रीचा दर्जा आणि सन्मान हा सर्व धर्मांमध्ये सर्वोच्च आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात महिलांवर अत्याचार करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, मग तो कोणत्याही धर्माचा असो. या विषयाला विनाकारण जाती-धर्माचे रूप देऊ नये, असे आवाहन करत त्यांनी हा वाद संपवला.

# करारातून माघार इराणला भोवणार

### अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**वॉशिंग्टन, २३ जून**

इराणने नुकत्याच झालेल्या कराराच्या अटींचे पालन केले नाही अथवा करारातून माघार घेतली किंवा त्याचे वर्तन समाधानकार न राहिल्यास अमेरिका ताकदीने हल्ले सुरू करेल. यावेळच्या हल्ल्यात इराण पूर्णपणे उद्ध्वस्त होईल. आम्ही कठोर भूमिका घेण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला.

पश्चिम आशियामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्वित्झर्लंडमध्ये दोन्ही देशांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चेची पहिली फेरी नुकतीच पार पडली. यासंदर्भात प्रसार माध्यमांना माहिती देताना ट्रम्प म्हणाले. इराणच्या तेल, ऊर्जा संसाधनावर लादलेले निर्बंध आम्ही उठवले आहेत. यातून मिळालेल्या पैशांचा वापर ते अमेरिकेकडून अन्न खरेदी करण्यासाठी करतील.

### आमदारासह पत्नीला सात वर्षांची शिक्षा

**राजपीपला, २३ जून**

आम आदमी पक्षाचे (आप) प्रमुख आदिवासी नेते आणि देडियापाडाचे आमदार चतर वसावा यांच्या अडचणी वाढल्या आहेत. नर्मदा जिल्ह्यातील सत्र न्यायालयाने वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे, जीवे मारण्याची धमकी देणे आणि खंडणी मागणे या प्रकरणात चतर वसावा, त्यांच्या पत्नी शकुंतलाबेन वसावा आणि इतर नऊ आरोपींना दोषी ठरवून प्रत्येकी सात वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच न्यायालयाने सर्व आरोपींवर २५,००० रुपयांचा दंडही ठोठावला आहे. (वृत्तसंस्था)

### मणिपूरमध्ये शस्त्रसाठा जप्त

**तेजपूर, २३ जून**

बंडखोरांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी आणि राज्यात सामान्य स्थिती पुनर्संचयित करण्याच्या उद्देशाने सुरक्षा दलांनी मणिपूरच्या डोंगराळ भागात तीन दिवसीय दहशतवादविरोधी मोहीम राबवत संयुक्त कारवाई केली. या कारवाईनंतर मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. मणिपूर पोलिसांनी एसंयुक्त दलाने २१ आणि २२ जूनला मोठ्या प्रमाणावर शोध आणि क्षेत्र नियंत्रण मोहीम सुरू ठेवली. या मोहिमेत मोठ्या प्रमाणात शस्त्रे जप्त करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# शासकीय डॉक्टरांची खाजगी प्रॅक्टिस गंभीर बाब



**नवी दिल्ली, २३ जून**

शासकीय रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांकडून खासगी प्रॅक्टिस करणे गंभीर बाब आहे. याप्रकरणाची चौकशी करण्याचा उच्च न्यायालयाने दिलेला आदेश योग्यच असून, आम्ही यात हस्तक्षेप करू शकत नाही, अशा शब्दात फटकारत सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्ते शासकीय डॉक्टरची याचिका फेटाळून लावली. उच्च न्यायालय एका व्यापक सार्वजनिक मुद्यावर विचार करत आहे, ही बाब कौतुकास्पद असल्याचे यावेळी न्यायासनाने नमूद केले.

सरकारी डॉक्टरांनी खासगी प्रॅक्टिस करणे ही गंभीर बाब आहे, असे करू नये आणि तुम्हीही एक डॉक्टर आहात, असेही न्या. बी.व्ही. नागरत्ना आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने याचिकाकर्त्याला सुनावले. ४ मे २०२६ रोजी शासकीय डॉ. संतोष कुमार सिंग आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल झाला. गुन्हा रद्द करण्यासाठी त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. डॉ. सिंग यांच्या पत्नी 'अकुरा हॉस्पिटल' या खाजगी नर्सिंग होमच्या संचालिका आहेत, जिथे डॉ. सिंग शस्त्रक्रिया करत असल्याचा आरोप होता. उच्च न्यायालयाने ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे नमूद केले होते. जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवण्यात आलेला अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला नव्हता, हे लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना योग्य ती कारवाई करण्याचे आणि वैद्यकीय महाविद्यालयात खासगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरोधात वैद्यकीय महाविद्यालयाच्या शस्त्रक्रिया विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष कुमार सिंग यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायासनाने याचिकाकर्त्याची चांगलीच खरडपट्टी काढली.

**रुग्णसेवा डॉक्टरांचा अधिकार**

डॉ. संतोष कुमार सिंग यांच्या वतीने ज्येष्ठ वकील हर्षवीर प्रताप शर्मा यांनी युक्तिवादात म्हटले की, रुग्णांची सेवा करणे डॉक्टरांचा अधिकार आहे. (वृत्तसंस्था)

### इंदुरात सोनम तर पुण्यात सिया

# भावी पत्नीनेच पतीला ढकलले खोल दरीत



सिया गोयल



चेतन चौधरी

**पुणे, २३ जून**

लोहगड किल्ल्यावरून दरीत पडून मृत्यू झालेल्या केतन विशाल अग्रवाल या २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू हा अपघात नसून पूर्वनियोजित कट रचून करण्यात आलेला खून असल्याचे पुणे ग्रामीण पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. नियोजित पत्नी सिया प्रवीण गोयल (वय २०, रा. बिबवेवाडी) आणि तिचा प्रियकर चेतन बाबुलाल चौधरी (वय २२, कोंढवा) यांनी संगनमताने केतनला लोहगडावर नेऊन दरीत ढकलल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे. मध्यप्रदेशातील इंदूर येथील सोनम रघुवंशीनेही प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली होती.

१८ जून रोजी लोहगड किल्ल्याच्या पश्चिमेकडील बाजूस झुडपांमध्ये केतनचा मृतदेह आढळून आला होता. त्यावेळी सिया गोयल हिने फिरत असताना केतनचा पाय घसरून तो दरीत पडल्याचे सांगितले होते. त्यानुसार लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र घटना संशयास्पद वाटल्याने पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि नातेवाईकांकडून मिळालेल्या माहितीतून सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्यात गेल्या वर्षभरापासून प्रेमसंबंध असल्याचे उघड झाले. (तभा वृत्तसेवा)

#### केतन होता अनुभवी ट्रेकर



केतन अग्रवाल हा नियमित ट्रेकिंग करणारा आणि डोंगर-दऱ्यांमध्ये फिरण्याचा अनुभव असलेला युवक होता. त्यामुळे साधा तोल जाऊन तो दरीत पडल्याच्या दाव्यावर कुटुंबीयांनी सुरुवातीपासूनच शंका व्यक्त केली होती. सिया आणि केतन हे मे महिन्यात तसेच १४ जून रोजीही लोहगडावर जाऊन आले होते. १९ जून रोजी सियाच्या वाढदिवसानिमित्त महाबळेश्वरला जाण्याचे नियोजन केतनच्या कुटुंबीयांनी केले होते. तिने १८ जूनलाच लोहगडावर जाण्याचा आग्रह धरला आणि केतनला तेथे घेऊन गेली.

संबंधित वृत्त शेवटच्या पानावर

# तुळजापूरच्या प्राध्यापकाची सोलापुरात आत्महत्या

### 'सुसाईड नोट'मध्ये आर्थिक नुकसानीचे कारण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

तुळजापूर येथील एका प्राध्यापकाने सोलापूरस्थित मुरारजी पेठ परिसरातील उमा नगरी येथील घरातील किचन रुममधील अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. अजिंक्य सुरेश हंगरगेकर (वय-३९, रा. उमा नगरी, सोलापूर. मूळ रा.जवाहर गल्ली, ता.तुळजापूर जि.धाराशिव) असे आत्महत्या केलेल्या प्राध्यापकाचे नाव आहे.

मृत अजिंक्य हंगरगेकर हे तुळजापूर येथील तर त्यांची पत्नी सोलापुरातील केगाव येथील महाविद्यालयमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची पत्नी सोमवारी सकाळी महाविद्यालयला जाऊन सायंकाळच्या सुमारास घरी परतल्या असता घर आतून बंद असल्याचे दिसून आले. दरवाज्याला सेफ्टी लॉक असल्याने त्या आपल्या जवळील चावीने दरवाजा उघडून आत गेल्या.

किचनमध्ये त्यांच्या पतीचा मृतदेह गळफास घेऊन लटकलेल्या स्थितीमध्ये आढळला. त्यांनी त्वरित इतरांना घटनास्थळी बोलावून घेतले. नातेवाईकांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदन झाल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यसंस्कारासाठी गावी घेऊन गेले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. नातेवाईक सोलापूरला परतल्यावरच त्यांच्या जाबजबाबानंतर पुढील तपास होईल, अशी माहिती तपासिक अमलदार वसंत गौडणवरु यांनी दिली. दरम्यान, मृत प्रा.अजिंक्य हंगरकेकर यांच्याजवळ सापडलेल्या 'सुसाईड नोट'मध्ये जमिनीच्या व्यवहारात आर्थिक नुकसान झाल्याने आत्महत्या करीत असल्याचे म्हटले आहे, असे सांगण्यात येते.

# राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत खुडूसच्या हनुमंत जाधवला सुवर्ण, राजेश्वरी ठवरे हिला कांस्य

### हनुमंतची जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**माळिशरस / टेंभूर्णी, दि. २३ जून-**

लखनो (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कुस्ती प्रशिक्षण केंद्र खुडूसचा गोदबा पाटील प्रशिक्षण केंद्रातील मल्ल हनुमंत जाधव (मूळ रा.चांदज, ता.माढा) याने १७ वर्षांखालील गटात ४५ किलो वजनी गटात सुवर्ण तर राजेश्वरी महादेव ठवरे हिने ६१ किलो वजनी गटात कास्य पदकांची कमाई केली. हनुमंतची जागतिक स्पर्धेसाठी तर राजेश्वरीची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली.

हनुमंतने सूर्य फोगट दिल्ली, वंश हरियाणा अंतिम फेरीत साहिल हरियाणा १०-६ असे हरवित ही काम गिरी केली. या उल्लेखनीय कमगिरीवर त्याची अझरबैजान (बाकू) या देशात होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियन कुस्ती स्पर्धे साठी निवड झाली आहे. हनुमंतला



हनुमंत जाधव



राजेश्वरी ठवरे

माढ्याचे विक्रमसिंह शिंदे यांनी ५५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. दोघांना एनआयएस कुस्ती कोच पै. महादेव ठवरे, कोच बापूराव ठवरे, किरण मोरे, सागर वाघ, तुषार झंजे यांचे मार्गदर्शन लाभले.

पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राम सातपुते, श्री साखर कारखान्याचे चेअरमन शेषागिरीराव, विक्रसिंह शिंदे, श्रीमंत तांदुळकर, जिल्हा परिषद कृषी सभापती संजय पाटील, माजी सभापती संजय पाटील-भिमानगरकर, पंचायत समिती सदस्या सुनीता संजय पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या पत्रकार परिषदेसाठी रामचंद्र टकले, वस्ताद महादेव ठवरे-पाटील, वस्ताद महादेव जाधव (करोळे), निवृत्ती तांबवे, जालिंदर लट्टे, महादेव दगडे, नितीन मस्के, वडील राजेंद्र जाधव, आजोबा अंकुश जाधव उपस्थित होते.

## महत्वाचे...



## निरोगी शरीरासाठी प्रत्येकाने योग केलाच पाहिजे : डॉ. कुंभार

**अणदूर, दि. २३ जून-**

आपल्या ऋषीमुनींनी शरीर व मन निरोगी राहण्यासाठी योगासने, प्राणायाम,ध्यान ही त्रि सूत्री सांगितली असून ती अतिशय महत्वाची आहे,जगाने योगासनाने मानवी जीवन सुखकर होते ही गोष्ट मान्य केली असून प्रत्येक स्त्री,पुरुषाने योगासने केली पाहिजेत, त्या मुळे आपले जीवन सुखी होईल, त्या प्रत्येकाने सकाळचा एक तास वेळ काढलाच पाहिजे असे आवाहन योग शिक्षक डॉ. नागनाथ कुंभार यांनी केले. ते खडकाळी मॉर्निंग क्लब अणदूर व सूर्योदय प्रभात मंडळ खुदावाडी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त आयोजित योगशिबिरात मुख्य प्रशिक्षक म्हणून बोलत होते, अतिशय सुंदर निसर्गाच्या सान्निध्यात हे शिबिर आयोजित करण्यात आले होते,पुढे बोलताना डॉ. कुंभार म्हणाले की आजचा एक दिवस योगासने करून काहीही उपयोग नाही त्या करिता प्रत्येकाने सकाळचा १ तास वेळ काढलाच पाहिजे आपले आजचे जीवन हे प्रचंड वेगवान व धाकधुकीचे झाले असून, ते सुखकर होण्यासाठी योग हाच एकमेव पर्याय आहे,ध्यानामध्ये मन एकाग्र करण्याची ताकद आहे,योगामध्ये योगासने,प्राणायाम,ध्यान हे महत्वाचे असून,१२ सूर्यनमस्कार हे शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम असल्याचेही त्यांनी सांगितले, त्या नंतर त्यांनी २ तास सर्व योगासने, प्राणायाम, ध्यान याची प्रात्यक्षिके सादर केली व योगाचे साधेसुधे, सोपे उपाय शिबिरार्थी यांच्याकडून करवून घेतले सदरील योगशिबारात गुणवंत मुळे, अभिजित मोकाशे,खंडू मामा मुळे, अमोल मोकाशे, पप्पू नाटेकर,शंभुलिंग स्वामी, बालाजी राजपूत,अजय अणदूरकर,दगडू सालेगावे,गुंडू दादा कापसे,मोहन चिंचोले, हणमंत इटलकर,मेजर यादव जाधव,पाटील, तसेच अणदूर,खुदावाडी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते,शिबिराची सर्व तयारी नाटेकर कुटुंबाने केली होती.

## मिळकती न शोधणाऱ्या, ई-केवायसी न करणाऱ्या ५१ कर्मचाऱ्यांना दंड

**सोलापूर, दि. २३ जून-**

शहरातील नवीन मिळकती न शोधणाऱ्या तसेच मिळकतींची ई-केवायसी न करणाऱ्या महापालिकेच्या ५१ कर्मचाऱ्यांना १ हजार याप्रमाणे एकूण ५१ हजारांचा दंड करण्यात आला आहे. महापालिका उपायुक्त सोनाली यादव यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत. महापालिकेचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासन विविध उपाययोजना करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मालमत्ता कर विभागाकडून नवीन मिळकतींचा शोध घेण्याची मोहीम सुरू आहे. या कामासंदर्भातील उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ३६ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १००० याप्रमाणे ३६ हजारांचा दंड करण्यात आला आहे. याशिवाय मिळकतींची ई-केवायसी न करणाऱ्या १५ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १ हजार याप्रमाणे एकूण १५ हजारांचा दंड करण्यात आला. मिळकती संदर्भात ३६ हजार व ई-केवायसीसंदर्भात १५ हजार असे मिळून एकूण ५१ हजारांचा दंड करण्यात आला आहे. हा दंड माहे जून वेतन पेड इन जुलैमधून वसूल करावा, असे आदेशात नमूद आहे.



## डॉ. हेगडेवार यांच्या स्मृतीपित्यर्थ्य भोजन वाटप

**अक्कलकोट, दि.२३ जून-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक संस्थापक डॉ केशव हेगडेवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त अक्कलकोट येथे भटकी विमुक्त मरगम्मा कोळी समाज बांधव येथे जेवण वाटप करण्यात आले यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा ग्राम विकास मंडल सदस्य संदीप कटकधोंड अक्कलकोट तालुका बजरंग दल संयोजक मदन राठोड सहसंयोजक दिनेश मीनगले व सुनील पाटील गोरक्षक रोहन पालकर गोरक्षक सुनील शिंदे समाज बांधव लक्ष्मण कोळी व माता बहिणी बाळ गोपाल उपस्थित होते

# आमदार दिलीप सोपल यांच्या निवासस्थानाला आग लावण्याचा प्रयत्न

**पेटते फटाके व स्फोटके घराच्या परिसरात फेकल्याचा आरोप; ८ जणांविरोधात गुन्हा दाखल**

### झाडे जळाली, सोलर पॅनलचे नुकसान; सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जून-**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांच्या आगळगांव रोडवरील निवासस्थानाला पेटते फटाके (आदल्या) व स्फोटके फेकून आग लावण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी पहाटे घडली. या प्रकरणी आमदार सोपल यांचे बंधू सुधीर गंगाधर सोपल यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून आठजणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, सुधीर सोपल (वय ७८) हे मंगळवार दि. २३ जून रोजी मध्यरात्री १.१५ वाजण्याच्या सुमारास आपल्या निवासस्थानी झोपले होते. त्यावेळी घराच्या पाठीमागील बी.टी.एम. पॅव्हेलियन मैदानाच्या दिशेने पेटत्या अवस्थेतील फटाके घराच्या परिसरात येऊन पडू लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोठ्या आवाजामुळे जाग आल्यावर त्यांनी खिडकीतून पाहिले असता परिसरातील काही झाडांना आग लागल्याचे दिसून आले.



यानंतर घरातील कर्मचारी गुरुपादय स्वामी यांच्यासह त्यांनी परिसरात पाहणी केली असता दोन व्यक्ती कंपाउंड ओलांडून घराच्या आवारात प्रवेश करुन पेटते फटाके टाकत असल्याचे दिसल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, नाथा मोहिते व योगेश लोंढे हे दोघे घराच्या आवारात दिसले. आपण पाहत असल्याचे लक्षात येताच ते कंपाउंडवरील शिडीच्या साहाय्याने पसार झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, कर्मचारी गुरुपादय स्वामी यांचा मुलगा ओंकार स्वामी याने कंपाउंडच्या बाहेर पाहणी केली असता काही व्यक्ती बाहेरुन पेटते फटाके घराच्या दिशेने फेकत असल्याचे दिसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनास्थळी एक रिक्षा आणि तीन दुचाकीही उभ्या असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या आगीत घराच्या परिसरातील आंबा, जांभूळ व बाबुळची झाडे जळाली. तसेच सोलर पॅनलला तडे जाऊन अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन गाड्यांनी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.

या प्रकरणी नाथा मोहिते, योगेश लोंढे, आशिष शिंदे, कुणाल खंदारे, राज देवकुळे, पेशा रणझुंजारे, नागेश मोहिते व आंबादास रणझुंजारे यांच्याविरोधात जिवीतास धोका निर्माण करण्याच्या उद्देशाने, राहते घर स्फोटकांच्या साह्याने जाळून नष्ट करण्याच्या उद्देशाने आग लावून नुकसान करणे व घर जाळण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या घटनेमुळे बार्शी शहरात खळबळ उडाली असून पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.

## अकलूजमध्ये रुद्रपशुपती कोळेकर महाराज पुण्यस्मरणानिमित्त कार्यक्रम

**अकलूज, दि.२३ जून-**

येथील शिवनिर्णय संघटना महाराष्ट्र वीरशैव सभा, वीरशैव लिंगायत समाज महिला व भजनी मंडळ तसेच उमाशंकर रुद्र मंडळाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने श्री श्री श्री १०८ गुरुनिर्वाण गुरूमूर्ती रुद्रपशुपती शिवाचार्य श्री कोळेकर महाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित सामुदायिक इष्टलिंग महापूजा, पवित्र खडावा दर्शन व महाप्रसादाचा सोहळा अत्यंत भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

याप्रसंगी श्री ष.ब्र.प्र. १०८ पद्मभास्कर किर्तन महर्षी डॉ. निलकंठ शिवाचार्य धारेश्वर महास्वामीजी यांच्या दिव्य सान्निध्याने संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला. इष्टलिंग महापूजेद्वारे शिवभक्तांनी शिवतत्त्वाशी एकरूप होत पहिल्यांदाच असा आत्मिक समाधानाचा अनुभव घेतला. श्री कोळेकर महाराजांनी परिधान केलेल्या पवित्र वस्त्रांचे व खडावांचे दर्शन घेताना भाविकांच्या डोळ्यांत श्रद्धा आणि कृतज्ञतेचे भाव दाटून आले. यासाठी सर्व दाते तसेच मंगेशनाना शेटे, रामलिंग



सोनके, अशोक शेटे, शेखर ढोले, सूत्रसंचालक सुहास उरवणे, वैभव शेटे, बापू वैद्य, केदार सोनके, नागेश झपके, ओम राजमाने, आकाश लकडे,मंगेश नरुळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

**आदर्श संसार उभारणाऱ्या सात उभयतांचा सन्मान**

या सोहळ्यातील विशेष आकर्षण ठरला आदर्श आई-वडील पुरस्कार २०२६ आपल्या कुटुंबाचा पाया मजबूत करत संस्कार,त्याग, प्रेम आणि कर्तव्यनिष्ठेच्या बळावर पंचवीस वर्षे अधिक सांसारिक वाटचाल करत आदर्श संसार उभारणाऱ्या सात उभयतांचा गौरव करण्यात आला. शासकीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सुहास उरवणे व घरच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत गायत्री क्षीरसागर हिस पोलिस खात्यात नोकरी मिळाल्याबद्दल सन्मान करण्यात आला.



## आमदार बसवराज पाटील यांची माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट

**अणदूर, दि. २३ जून-**

स्थानिक स्वराज संस्थेच्या धाराशिव लातूर बीड विधानपरिषद मतदार संघातील नव निर्वाचित आमदार बसवराज पाटील यांनी अणदूर येथे येऊन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

त्यांनी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी चव्हाण परिवाराच्या वतीने तसेच खुदावाडी ग्रामस्थ, विविध संस्थांच्या व श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने बसवराज पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुकुंद डोंगरे,सुनील चव्हाण, रणवीर चव्हाण, अभिजित चव्हाण,साहेबराव घुगे, धनराज मुळे, सिद्धाराम धमुरे, राम जवळगे, बालाजी मोकाशे, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. विवेक बिराजदार, पृथ्वीराज मुळे, राजकुमार गाढवे, शरणप्पा कबाडे, राजू पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवृत्त पोलिस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला

### चौघांविरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जून-**

शहरातील सुभाषनगर, रिंग रोडजवळील सरकाळे हॉटेल येथे एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यावर बिअरच्या बाटलीने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना सोमवार दि. २२ जून रोजी घडली. याप्रकरणी चारजणांविरोधात बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीमंत लक्ष्मण देवकर (वय ६७, रा. सुभाषनगर, आगळगाव रोड, बार्शी) हे सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी असून ते आपल्या मित्रांसमवेत सरकाळे हॉटेल येथे थांबले होते. यावेळी त्यांचे मित्र अनिल गंभीरे व मदन मुंढे यांच्यासह ते शीतपेय घेत असताना सोनू हाजगुडे, पेशा रणझुंझारे व त्यांचे अन्य दोन साथीदार तेथे आले.

फिर्यादीनुसार देवकर यांनी ओळखीपोटी संबंधितांना बसण्यास सांगितले असता त्यातून वाद निर्माण झाला. यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत देवकर यांना हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सोनू हाजगुडे याने हॉटेलमधील रिकामी बिअरची बाटली उचलून देवकर यांच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाले. त्यानंतर घरी जात असताना पुन्हा मागून येऊन त्यांच्या डोक्यात दुसरी बिअरची बाटली डोक्यात मारल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे.

दरम्यान, या घटनेनंतर सरकाळे हॉटेल परिसरातील कथित अवैध दारू विक्रीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मागील महिन्यातच जिल्हा पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या आदेशानुसार बार्शी शहर व तालुक्यात अवैध व्यवसायांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली होती. त्याअंतर्गत सरकाळे हॉटेल येथे अवैध दारू विक्री व गुटखा विक्रीच्या तक्रारींवरुन छापा टाकण्यात आला होता.

या कारवाईत मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, एवढी मोठी कारवाई होऊनही संबंधित ठिकाणी अवैध दारु विक्री सुरुच असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. निवृत्त पोलीस अधिकाऱ्यावर झालेल्या हल्ल्यात घटनास्थळी बिअरच्या बाटलीचा वापर झाल्याच्या आरोपामुळे या चर्चेला आणखी बळ मिळाले आहे.

घटनेत जखमी झालेल्या अवस्थेत देवकर बार्शी शहर पोलीस ठाण्यात आल्यानंतर, यांच्या डोक्यातून रक्तस्राव झाल्याने त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. उपचारानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणी सोनू हाजगुडे, पेशा रणझुंझारे व अन्य दोन अज्ञात साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.



## शिस्त, समर्पण हाच यशाचा मंत्र : डॉ. शिवपुजे

### सांगोला विद्यामंदिरात गुणवंतांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २३ जून-**

इतरांशी स्वतःची तुलना करण्यापेक्षा प्रयत्नांत सातत्य ठेवा. मोबाईलचा मोह टाळा. शिस्त, समर्पण आणि योग्य निर्णय या त्रिसूत्रीचा जीवनात अंगीकार करणे हाच यशाचा खरा मंत्र असल्याचे सांगून मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

ते सांगोला विद्यामंदिर ज्यु. कॉलेजमध्ये इ.१२ वी बोर्ड परीक्षा व एमएचटी-सीईटी मधील गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे, नाझरा विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना विद्यार्थी धीरज जगताप, स्नेहल बोधगिरे, दिपाली भोसले, श्रीकांत सातपुते आणि पालक रामेश्वर अवताडे यांनी संस्था, संस्थाध्यक्ष, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्याचा गौरव केला. प्रास्ताविक चारुदत्त जगताप, सूत्रसंचालन प्रा. धनाजी चव्हाण, आभार शिवशंकर तटाळे यांनी मानले.

## सोलापुरात होम मैदानावर रंगणार आनंद मेळा

### मैदान भाड्यापोटी महापालिका तिजोरीत १२ लाखांची भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून-**

जानेवारी महिन्यात भरणाऱ्या श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेतील गड्डा यात्रेची आठवण करून देणारा आनंद मेळा आता होम मैदानावर तब्बल ६० दिवस रंगणार आहे. या मेळ्यासाठी महापालिकेच्या मालकीचे होम मैदान भाडेतत्त्वावर देण्यात आले असून त्यातून महापालिका तिजोरीत १२ लाख रुपयांचे उत्पन्न जमा होणार आहे.

महापालिकेच्या रिक्त जागांचा नियोजनबद्ध वापर करून उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने भूमी व मालमत्ता विभागाकडून चांगले प्रयत्न करण्यात येत असल्याचे दिसून येते.

होम मैदानावरील या आनंद मेळ्यात लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी विविध आकर्षणे असणार आहेत. टोरा-टोरा, ड्रॅगन ट्रेन, अवाढव्य आकाश पाळणा, ब्रेक डान्स, सुनामी, स्ट्रीट टॉवर, कप-सासर, रेंजर पाळणा यांसारख्या थरारक राईड्स नागरिकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत आहेत. याशिवाय थराराचा थेट अनुभव देणारा 'मौत का कुआ' हेही प्रमुख आकर्षण ठरणार आहे. मेळाव्याच्या प्रवेशद्वारासाठी यंदा विशेष वॉटर फॉल अर्थात धबधबा थीमवर आधारित भव्य सजावट करण्यात येत आहे. या आकर्षक प्रवेशद्वारामुळे मेळाव्याच्या सौंदर्यात भर पडणार आहे. तसेच मेळाव्यात उभारण्यात येणाऱ्या अवाढव्य पाळण्यांच्या सुरक्षित जुळणीसाठी कर्नाटक, केरळ, बिहार आणि उत्तर प्रदेशमधील तज्ज्ञ कामगार अहोरात्र मेहनत घेत आहेत.

दरम्यान, होम मैदान ६० दिवसांसाठी आरक्षित करण्यात आले असून त्यासाठी १२ लाख रुपये भाडे आकारण्यात आले आहे. याशिवाय क्राफ्ट उत्सवासाठी देण्यात आलेल्या जागेच्या भाड्यापोटी आणखी दीड लाख रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळणार आहे. इतर वेळी रिकामी असलेल्या या मैदानासाठी चांगले भाडे मिळत आहे. भूमी व मालमत्ता विभागाने चांगला पुढाकार घेतला आहे. महापालिकेच्या रिक्त जागांचा नियोजनबद्ध वापर करून उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात असून, सोलापूरकरांसाठी मनोरंजनाची पर्वणी आणि महापालिकेसाठी उत्पन्नाचा नवा स्रोत ठरणार आहे.


# खडकांवरील बीजे फुलवणारे तालसाधक : गुरूवर्य पं. दादासाहेब पाटील

**स्वतःच्या आर्थिक परिस्थितीची आणि संसाराची चिंता न करता ग्रामीण भागात शास्त्रीय संगीताचा प्रचार करणारे सोलापूर जिल्ह्यातील खंडाळी तालुका मोहोळ येथील ख्यातनाम तबला व मृदंगवादक पंडित दादासाहेब पाटील यांचे १५ जून २०२६ रोजी निधन झाले. त्यांना भावसुमनांजली..**

नशिबाने खडकांवर पडलेली बीजे ब-याचदा योग्य वातावणाअभावी करपून जातात. ग्रामीण भागात शास्त्रीय संगीताचे महानगरांसारखे वातावरण नसल्यामुळे पुष्कळदा अनेकांना जन्मतः लाभलेली अंगभूत संगीतकलेची बीजे आकारून येण्याआधीच करपून जातात.

**आकारून येत कांहीं । विरते निमिषात सारे ।**
**स्वप्न चित्र पुसूनी जाई । रंग रंग ओघळून ।**

असा कांहीसा अनुभव ग्रामीण भागातील कलाकारांवर येत असतो. सोलापूर जिल्यातील खंडाळी (ता. मोहोळ) येथील प्रमोद नावाच्या किशोरवयीन मुलालाही प्रारंभीच्या काळात आपल्यातील तबलावादनातील कौशल्याला विकसित करण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. परंतु या बीजाचे नावच जणु जिद्द होते. गावामध्ये होणारे परंपरागत वारकरी सांप्रदायाचे भजन कीर्तन ऐकत आणि संधी मिळेल तशी पांडुरंग रुक्मिणी कृपेने केवळ निरीक्षण आणि श्रवणाने जसे येईल तशी पखावज आणि तबल्यावर बोटे टाकून वजनदार ठेके वाजवणे एवढेच उपलब्ध व्यासपीठ होते...परंतु तालविद्या शिकण्याची लहानग्या प्रमोदची विलक्षण जिद्द त्याला गप्प बसू देत नव्हती. जवळच पंधरा किलोमीटर अंतरावर मोडनिंब गावात एक जुने जाणते अत्यंत अभ्यासू व अजराडा घराण्याचे अभ्यासक असणारे तबला आणि मृदंगवादक पं. अंतुनाना साठे रहात असत. अंतुनाना प्रचंड शिस्तीचे आणि स्वभावाने वरपांगी कडक पण आतून मऊ! शिष्याची विद्या मिळवण्याची जिद्द, गुरूनिष्ठा आणि विनम्रता लक्षात आली की अंतुनाना शिष्याला त्यांच्या हृदयातच जागा द्यायचे. लहानग्या प्रमोदने अंतुनानांच्या हृदयात स्थान मिळवले. खंडाळी ते मोडनिंबला जाण्यासाठी पाच किलोमीटर कच्ची दगडमातीची सडक होती. तेथून दहा किलोमीटर एन.एच. नाईन सोलापूर पुणे दहा किलोमीटर हायवे पार करून मोडनिंबला जावे लागायचे. थोडा जरी पाऊस पडला तर गावापासूनच सायकल खांद्यावर घेऊन चिखलमातीचा सहा किलोमीटरचा रस्ता तुडवत हायवेपर्यंत जावे लागे. तेथून पुढे हायवेवर सायकल चालत असे. असे प्रचंड कष्ट घेत प्रमोद अंतुनानांकडे पोहोचत असे. अंतुनानांकडे कांही वर्षे शिक्षण झाले. एके दिवशी नानांनी प्रमोदला सोबतीला घेऊन पंढरपूर गाठले. मृदंगातील मंगळवेढेकर घराण्याचे पं. दत्तोपंत मंगळवेढेकर या भरतकीर्त मृदंगवादकांच्या घरी घेऊन गेले. दत्तोपंतांना विनंती केली की, 'आता प्रमोदला मृदंगवादनाचे पुढील शिक्षण आपण द्यावे.'



दत्तोपंतांची रीतसर तालीम घेताना शास्त्रीय संगीतातील विविध नामवंत गायक तसेच वारकरी संप्रदायातील नामवंत भजन कीर्तनकार यांना प्रमोद तैयारीने साथसंगत करत असे. हळूहळू त्यांची कीर्ती पसरत गेली आणि पंडित प्रमोद उर्फ दादासाहेब पाटील नावाचा एक निष्णात तबला-मृदंगवादक कलाकार अशी महाराष्ट्रात दादांची कीर्ती पसरू लागली. ही कीर्ती सोलापूरचे ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध गायक गुरूवर्य पं. दत्तुसिंग गहेरवार आणि त्यांच्या सुविद्य पत्नी उषा गहेरवार यांच्या कानावर गेली आणि त्यांनी दादासाहेबांना बोलावून घेतले. गायनाला तबला मृदंगाची साथसंगत सौंदर्यपूर्ण रीतीने कशी करावी? याचे मोलाचे मार्गदर्शन व गांधर्व महाविद्यालयाच्या विशारद पर्यंतचे पदवी शिक्षण गहेरवार सरांनी त्यांना दिले. पुढे सोलापूरचे ख्यातनाम तबलावादक गुरूवर्य पं.भीमरावदादा कनकधर यांचेकडेही प्रमोदजींचे शिक्षण झाले. यासाठी खंडाळी ते सोलापूर जाता येता ११० किमी प्रवास रोज न थकता ते करायचे.

अधून मधून पुण्याला जाऊन मूळचे सोलापूरचे सुप्रसिद्ध तबला व ढोलकीवादक गुरुवर्य पंडित विठ्ठलराव क्षीरसागर यांचेकडूनही त्यांनी विद्या संपादन केली. अशा खडतर प्रवासाने ज्ञानसिद्ध झालेले पं. दादासाहेब पाटील हे विलक्षण व्यक्तिमत्व होते. सर्वच गुरूकडून दादांना पुत्रवत प्रेम मिळाले.. त्याचबरोबर सोलापूरचे पंडित प्रभूदेव सरदार, पंडित भीमसेन जोशी, पंडित राजन साजन मिश्रा, वारकरी संप्रदायातील सुप्रसिद्ध भजन गायक पंडित धामणेकर गुरुजी, मराठवाड्यातील शास्त्रीय संगीत प्रचारक बोळंगे गुरुजी अशा नामवंतांना तबला आणि मृदंगाची साथसंगत करण्याची भाग्य मिळाले. स्वाभाविकच हे सर्व करीत असताना प्रपंचात आर्थिक ओढाताण असायची. त्यातून मार्ग काढत त्यांच्या सौभाग्यवती लता पाटील यांनी त्यांना मोलाची साथ दिली. दादांनी सोलापूरला संगीत विद्यालय स्थापन केले होते, त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलांना शास्त्रीय संगीताचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी बरीच भटकंती केली. खंडाळी पंढरपूर पुणे सोलापूर येथे कलापिनी संगीत विद्यालयाची स्थापना करून अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांना संगीतातील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी पैशाची अपेक्षा न करता ज्ञानदान दिले. दादांना दोन मुले आणि एक मुलगी. दोन्ही मुलांना त्यांनी तबल्याचे शिक्षण देऊन उत्तम कलाकार घडवले. अविनाश पाटील हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आणि भारतातील सवाई गंधर्व महोत्सवाबरोबरच अनेक संगीत महोत्सवांमध्ये प्रथितयश दिग्गज कलाकारांना साथसंगत करणारे कलाकार आहेत. त्यांनी दुबई, कॅनडा कतार, लंडन असे कार्यक्रमाचे दौरे केलेले आहेत. विकास पाटील हे पंढरपूरला शेकडो मुलांना तबल्याचे शिक्षण देत असतात. एकूणच ग्रामीण भागात दुर्दम्य अशा जिद्दीने शास्त्रीय संगीताचा प्रचार करण्याचे खूप मोठे कार्य पंडित प्रमोद उर्फ दादासाहेब पाटील यांनी केले. त्यांच्या जाण्याने ग्रामीण भागातील शास्त्रीय संगीतातील उत्तम गुरु काळाने ओढून नेलेला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली..

**- दीपक कलढोणे**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ट्रकची बस थांब्याला धडक, तिघांचा मृत्यू

**कोची:** केरळमधील कोट्टारक्कराजवळील नीलेश्वरम येथे भरधाव ट्रकने बस थांब्याला धडक दिली. यात एका शाळकरी विद्यार्थ्यासह तिघांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले. हा अपघात मंगळवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास झाला. अपघाताच्या वेळी बस थांब्यावर प्रवाशांची गर्दी होती. प्रत्यक्षदर्शींच्या मते, ट्रकने आधी एका मोटरसायकलला धडक दिली. त्यानंतर ट्रक विद्यार्थी व इतर प्रवासी थांबलेल्या बस थांब्याला धडकला. दरम्यान, ट्रक उलटल्यामुळे बस थांबा आणि ट्रक तेथे उपस्थित लोकांवर कोसळला. ट्रकमधील माती, बस थांब्यावरील ढिगारा आणि जवळच्या इमारतींचे तुटलेले भागही पीडितांच्या अंगावर पडले.

### आई-वडिलांसह दोन मुलांची आत्महत्या

**चित्तूर:** दीर्घ आजारपण आणि आर्थिक अडचणीला कंटाळून एकाच कुटुंबातील चार सदस्यांनी आत्महत्या केली. मृतकांमध्ये आई-वडिलांसह दोन मुलांचा समावेश आहे. ही घटना आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात उघडकीस आली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, आर्थिक अडचणी आणि दीर्घ आजारामुळे कुटुंबातील सदस्यांनी आत्महत्या केली. मृतांमध्ये दामोदर, त्यांची पत्नी निर्मला, १३ वर्षांचा मुलगा आणि एक १० वर्षांची मुलगी यांचा समावेश आहे. दामोदरची बहीण त्यांना भेटायला आली असता या घटनेचा उलगडा झाली. त्यानंतर तिने याबाबत पोलिसांना माहिती दिली.

### ऊर्जा प्रकल्पाला आग, दोघांचा मृत्यू

**अनाकापल्ले:** जिल्ह्यातील परवाडा भागातील दक्षिण एनर्जी प्लांटमध्ये मंगळवारी सकाळी आग लागली. प्रकल्पात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक असल्याने आग वेगाने पसरली. यात दोन कामगारांचा मृत्यू झाला. त्रिनाध आणि व्यंकटेश, अशी मृतकांची नावे आहे. दोघेही अनाकापल्ले भागातील रहिवासी होते. ■

# राज्यात लोडशेडिंग केले नाही

## मुख्यमंत्र्यांची माहिती; विक्रमी ३२ हजार मेगावॅट वीजपुरवठा

**मुंबई, २३ जून**

राज्यात कोणत्याही भागात लोडशेडिंग करण्यात आलेले नसून उलट विक्रमी ३२ हजार मेगावॅट वीजपुरवठा करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत दिली. वाढत्या वीज मागणीचा विचार करून पुढील पाच वर्षांत राज्याची वीजपुरवठा क्षमता ४५ हजार मेगावॅटपर्यंत वाढविण्याचा सरकारचा मानस असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील वीज निर्मिती केंद्र तांत्रिक कारणांनी बंद पडल्याबाबतच्या विधानसभेत उपस्थित केलेल्या तारांकीत प्रश्नावर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात उद्योग, शेती आणि घरगुती वापरासाठी आवश्यक तेवढा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात येत आहे. वाढत्या मागणीच्या पृष्ठभूमीवर वीज यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. विशेषतः वीज उपकेंद्रांवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी आवश्यकता असलेल्या ठिकाणी उपकेंद्रांचे विभाजन करण्यात येणार असून त्यामुळे वीज वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम होईल आणि ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा मिळेल.

राज्यातील ऊर्जा क्षेत्राच्या दीर्घकालीन गरजांचा विचार करून पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात आहे. भविष्यातील वीज मागणी पूर्ण करण्यासाठी निर्मिती, वहन आणि वितरण या तिन्ही स्तरांवर क्षमता वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी कोळसा खरेदीसंदर्भातील प्रश्नांनाही उत्तर दिले. वीज निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या कोळशाच्या उपलब्धतेबाबत निर्माण होणाऱ्या सर्व अडचणी दूर करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्यातील वीज निर्मिती प्रकल्पांना आवश्यक तेवढा कोळसा वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि संबंधित यंत्रणांशी सातत्याने समन्वय साधला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. ◂ (तभा वृत्तसेवा)

# 'वाघाच्या हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकरी द्या'

चंद्रपूर, गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये वाघ-मानव संघर्षाची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. तेंदुपत्ता, मोहफूल आणि इतर वनउत्पादनांच्या संकलनासाठी जंगलात जाणाऱ्या नागरिकांवर वारंवार वाघांचे हल्ले होत असून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. जंगलांचे संगोपन स्थानिक आदिवासी आणि ग्रामीण नागरिकांनी केले, मात्र आज त्यांचाच जीव धोक्यात आला आहे. त्यामुळे वाघाच्या हल्ल्यातील



मृतांच्या कुटुंबातील सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी मागणी विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. तसेच वनक्षेत्रालगतच्या भागांमध्ये नागरिकांना जंगलात जाण्याची गरज कमी व्हावी यासाठी पूर्वी दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करून आदिवासी आणि वनक्षेत्रातील कुटुंबांना वर्षभरासाठी १२ गॅस सिलेंडर मोफत देण्यात यावेत, जेणेकरून सरपणासाठी जंगलात जाण्याची गरज कमी होईल आणि मानवी जीवितहानी टळेल, असे ते म्हणाले. यावर वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबांच्या घरात कायमस्वरुपी नोकरी देण्याचा प्रस्ताव विचारधीन आहे, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यात येईल अस वनमंत्र्यांनी स्पष्ट केले.

◂ (तभा वृत्तसेवा)

# पीक नुकसानीच्या अचूक आकडेवारीसाठी ड्रोनचा वापर करा



**राज्यातील** सर्वाधिक मूल्य असलेल्या पिकांच्या नैसर्गिक आपत्तीत होणाऱ्या नुकसानीची अचूक आकडेवारी मिळविण्यासाठी आगामी कालावधीत कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने संयुक्तरित्या ड्रोनद्वारे सर्वेक्षण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ड्रोनच्या वापरामुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक माहिती समोर येईल आणि पीक विमा कंपन्यांना भरपाई देताना कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील केळी पिकांच्या नुकसानीबाबत विमा कंपन्यांनी केवळ कागदपत्री न पाहता स्थानिक प्रशासनाने केलेली नोंद



**पावसाळी अधिवेशन**

तपासून घ्यावी. तसेच रिअल टाईम डेटा, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचा डेटा आणि सॅटेलाईट डेटा यांची सखोल पडताळणी करून पात्र शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देण्याची कार्यवाही करावी, असे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

◂ (तभा वृत्तसेवा)

# 'महाएआय'मुळे शासकीय कामकाजाला मिळणार स्मार्ट गती

**राज्य** शासनाच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करत प्रशासन अधिक वेगवान, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. 'महा एआय' (महाराष्ट्र हब फॉर ॲडव्हान्स्ड आर्टिफिशियल इंटेलिजन्स) हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव सरकारी उपक्रम विकसित करण्यात आला असून, त्याची लवकरच राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विधानभवन येथे 'महा एआय' प्लॅटफॉर्मबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. सर्व संवेदनशील माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून तिची प्रक्रिया आणि साठवणूक राज्याच्या सुरक्षित अधोसंरचनेतच केली जाणार आहे. 'महा एआय' प्रणालीमुळे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, भाषांतर, शासकीय नियम व शासन निर्णयांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# तृणमूल काँग्रेसच्या तीन बँक खात्यांची चौकशी सुरू

**कोलकाता, २३ जून**

पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील सायबर पोलिसांनी तृणमूल काँग्रेसच्या तीन बँक खात्यांची सखोल चौकशी सुरू केली आहे.



सायबर पोलिस गत पाच वर्षांतील व्यवहारांचा मागोवा घेणार आहे. पोलिसांच्या सूचनेनुसार ही खाती अलीकडेच डेबिट-फ्रीझ करण्यात आली होती.

बिधाननगर सायबर क्राईम पोलिस ठाण्यात सुरू असलेल्या तपासाशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, अधिकारी गत पाच वर्षांत या खात्यांमध्ये झालेल्या व्यवहारांची बारकाईने तपासणी करत आहेत.

या निधीचा स्रोत आणि तो कोठे हस्तांतरित करण्यात आला, यावर तपासाचे लक्ष केंद्रित आहे. तपास अधिकारी या खात्यांच्या इतर बाबींचाही तपास करत आहेत. ती कधी उघडण्यात आली, कोणाच्या नावाने नोंदणीकृत होती आणि गत काही वर्षांत ती कोणी चालवली.

(वृत्तसंस्था)



भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार आणि श्री नरकेसरी प्रकाशनचे माजी अध्यक्ष अरुण लखानी यांचे मंगळवारी विधानभवन परिसरात परिवारासह आगमन झाले. यावेळी त्यांचे पुत्र सारंग, सून रेवती सोबत होते

### भारताचा पाकिस्तानवर ४-३ ने रोमांचक विजय

**लंडन :** येथे खेळल्या गेलेल्या एफआयएच प्रो-लीग हॉकीच्या महत्त्वपूर्ण सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर ४-३ अशा एका गोलच्या फरकाने रोमांचक विजय मिळविला. या विजयाबरोबरच भारताने पाकिस्तानविरुद्धचा गत दशकातील आपला अपराजित राहण्याची शानदार परंपरा भारतीय हॉकी संघाने कायम राखली.

सामन्याच्या प्रारंभी पाकिस्तानने आघाडी घेतली होती, परंतु अभिषेक, निलाकांता शर्मा, सुखजीत सिंग आणि राजिंदर सिंग यांच्या गोलच्या जोरावर भारताने जोरदार पुनरागमन केले. भारताने ४-१ अशी आघाडी घेतली होती. ■

# ताडोबातील सफारी गाड्या 'ईव्ही'मध्ये बदलवू: गडकरी

### मंगळवारच्या सफारीत 'छोटा दडीयल'चे दर्शन

**चंद्रपूर, २३ जून**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात सध्या सफारीसाठी डिझेलवर चालणाऱ्या गाड्या वापरल्या जातात. या गाड्यांमुळे वायू व ध्वनी प्रदूषण होते. शिवाय इंधनाचा प्रश्न असतोच. त्यामुळे येत्या काळात येथील सफारीच्या सर्व गाड्या 'ईव्ही'मध्ये बदलण्याचा प्रस्ताव तयार केला जात आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी येथे दिली.

सोमवारी दुपारी नितीन गडकरी सहपरिवार ताडोबा येथे जंगल सफारीसाठी आले होते. त्यांचा हा खाजगी दौरा होता. मंगळवार, २३ जून रोजी सकाळी त्यांनी देवाडी गेटवरून सफारी केली. अगदी काही अंतरावरच ताडोबातील 'छोटा दडीयल' नामक रूबाबदार वाघाचे त्यांना दर्शन झाले. ताडोबा प्रकल्पाचा मोहर्ली गेट अत्यंत देखणा केल्याबद्दल त्यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे कौतुकही केले.

सफारी पूर्ण केल्यानंतर गडकरी यांनी काही पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले, सध्या जल, वायू व ध्वनी प्रदूषण या सगळ्यात महत्वाच्या समस्या आहेत. विशेषतः जंगलात डिझेलवर चालणाऱ्या गाड्या वापरल्यामुळे हवेचे प्रदूषण होते. सोबतच या गाड्यांच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण आहेच. या गाड्यांऐवजी समोर दोन आणि मागे सहा अशा ८ लोकांची व्यवस्था असलेल्या, मजबूत चेसीस असलेल्या 'इलेक्ट्रिक बॅटरी'चालणाऱ्या गाड्या वापरता येईल. या गाड्या जेथे 'पार्क' केल्या जातील तेथेच छत करून,



सफारी पूर्ण करून देवाडा गेटवर पत्रकारांशी संवाद साधताना नितीन गडकरी

त्यावर सोलार पॅनल लावायचे आणि गाडीची बॅटरी चार्ज करून घ्यायची. नंतर साधारणः तीनशे-साडे तीनशे किलोमीटर ती गाडी चालवता येईल. असे केल्याने 'फ्यूल कॉस्ट' जवळपास शून्य होईल. शिवाय आवाज होणार नाही आणि वायू प्रदूषणही होणार नाही. महत्त्वाचे म्हणजे. सफारी स्वस्त होईल आणि नफाही वाढेल. येथील ३०० लोकांकडे वाहन चालविण्याचा परवाना आहे. अशा सर्वांसाठी ही योजना तयार करण्याच्या सूचना मी कालच चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत तसेच वनाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. ही योजना वीज मंडळाकडून आपण मंजूर करून घेऊ. त्याला बँकेचे लोन मिळवून देवू. या नव्या गाड्यासाठीचा काही खर्च चालक करेल. काही येथील ट्रस्टच्या मार्फत करता येईल का, याचा विचारही विचार करण्याबाबत सूचवले आहे, असेही गडकरी यांनी यावेळी सांगितले. ◂ (तभा वृत्तसेवा)

# सियानेच लपविला केतनचा पासपोर्ट

**पुणे, २३ जून**

चेतनचे वागणे आणि हालचालीवरून पोलिसांना काही तरी काळेबेरे असल्याचा संशय आला. 'हुडी'त आलेल्या चेतनला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केल्यानंतर सियालाही ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी सांगितले की, केतनचे वडील विशाल अग्रवाल यांच्या तक्रारीवरून मंगळवारी हत्या आणि गुन्हेगारी कट रचल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

केतन आणि सिया यांचे प्री-वेडिंग शूटसाठी जूनच्या पहिल्या आठवड्यात बाली येथे जाण्याचे नियोजन होते. मात्र मुंबई विमानतळावर पोहोचल्यानंतर केतनचा पासपोर्ट गायब असल्याचे समोर आले आणि संपूर्ण दौरा रद्द करण्यात आला. तपासादरम्यान हा पासपोर्ट सियानेच लपवून ठेवल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

> **लोकेशन लपविण्यासाठी मोबाईल घरीच ठेवला**
>
> पोलिस तपासात चेतन चौधरी याने घटनेच्या दिवशी स्वतःचे लोकेशन समजू नये यासाठी मोबाईल घरीच ठेवला होता. तसेच ओळख लपविण्यासाठी त्याने हुडी परिधान केली होती आणि त्यावर हेडफोन लावले होते. ■

केतनसोबत विवाह करायचा नसल्याने सियाने केतनचा जीव घेण्याचे ठरविले. १४ जून रोजीही दोघेही लोहगडावर गेले होते आणि त्यावेळीही सियाने केतनला लोहगडवरूनच दरीत ढकलून देण्याचा प्रयत्न केला होता. सुदैवाने एका झुडपामुळे केतन बचावला. मात्र, चालाक आणि क्रुर प्रवृत्तीच्या सियाला त्याची दया आली नाही. बिंग फुटू नये म्हणून सियाने 'साप-साप' असे ओरडत नाटक करत, केतनला मिठी मारून वेळ मारून नेली होती, असा धक्कादायक खुलासा केतनच्या वडिलांनी केला आहे. अग्रवाल, गोयल आणि चौधरी ही तिन्ही कुटुंबे व्यावसायिक क्षेत्राशी संबंधित आहेत. पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात सुका मेवा, मसाले आणि इतर व्यापार व्यवसायाशी त्यांचा संबंध असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### धनलक्ष्मी सॉल्व्हेक्सची मालमत्ता जप्त

**नवी दिल्ली :** ईडीच्या इंदूर उप-विभागीय कार्यालयाने धनलक्ष्मी सॉल्व्हेक्स प्रायव्हेट लिमिटेड, तिचे संचालक आणि संबंधित कंपन्या/व्यक्तींविरुद्ध मनी लाँड्रिंगच्या तपासाच्या संदर्भात ३५.५२ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. आरोपींनी कर्ज देणाऱ्या बँकांना ३५६.३१ कोटी रुपयांचे नुकसान पोहोचवले आणि कर्जाच्या निधीचा अपहार केला आहे. ईडीचा हा तपास, बँकांनी नोंदवलेल्या एफआयआरवर आधारित आहे. ■

### चिमुकलीचे अपहरण; अत्याचारानंतर हत्या

**दिल्ली :** दिल्लीच्या मेहरौली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील छतरपूर एक्सटेंशन परिसरात एका ११ वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला आणि त्यानंतर तिची निर्घृण हत्या करण्यात आली. क्षिण दिल्ली जिल्ह्याचे पोलिस उपआयुक्त अनंत मित्तल यांनी सांगितले की, आरोपीने मुलीचा मृतदेह फरिदाबाद-गुरुग्राम रस्त्यावरील जंगलात फेकून दिला. या घृणास्पद गुन्ह्यामुळे संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण आहे. ■

# योग करा, आयुष्यभर निरोगी राहा

## स्वामी रामदेव यांनी केले योगमय जगाचे आवाहन

**विजयवाडा, २३ जून**

व्यक्तीच्या जीवनात योगाचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेमुळे योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे जगभरातील १७७ देशांनी ठराव करून योग दिनाची कल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या प्रेरणेमुळे आणि दृढनिश्चयामुळे देश एका विकसित, निरोगी, समृद्ध, अत्यंत गौरवशाली विश्वगुरूच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामुळे सर्वांनी योग करून निरोगी जीवन जगावे, असे आवाहन योगऋषी स्वामी रामदेवजी यांनी केले आहे.



'योगऋषीयोगानिघंटू' या पुस्तकाचे प्रकाशन करताना स्वामी रामदेव बाबा व मान्यवर

२१ जून रोजी, सुमारे २०० देश एकत्र योगाभ्यास करतात. या वर्षीच्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, परमपूज्य स्वामीजी महाराजांनी आंध्र प्रदेशातील कृष्णा नदी प्रदेशातील अमरावती (विजयवाडा) येथून योग-केंद्रित राष्ट्र आणि योग-केंद्रित जगाचे आवाहन केले. हा कार्यक्रम पतंजली योगपीठ आणि आंध्र प्रदेश सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता आणि यावेळी आचार्य बाळकृष्णजी महाराजही उपस्थित होते. या वर्षीच्या योग दिनाची मध्यवर्ती कल्पना 'निरोगी वार्धक्यासाठी योग' ही होती. स्वामी रामदेव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू आणि आचार्य बाळकृष्ण यांनी हजारो योगसाधकांसोबत योगाभ्यास केला. अमरावती ही देवांची राजधानी आहे. हा योग विधी तेजस्वी मुख्यमंत्री, एन. चंद्रबाबू नायडू यांच्या मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली सुरळीतपणे पार पडत आहे. नायडू हे एक दूरदर्शी मुख्यमंत्री आहेत. त्यांच्यामध्ये दृढनिश्चय, सेवेची भावना, समर्पणाची भावना आणि अतुलनीय सर्जनशील क्षमता आहे. ते संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणास्रोत आहेत, असे स्वामी रामदेव म्हणाले. स्वामी रामदेव आणि मुख्यमंत्री नायडू योगाचा संदेश देत आहेत यापेक्षा योगाच्या प्रसारासाठी फार मोठी गोष्ट आहे, असे यावेळी बाळकृष्ण म्हणाले. (वृत्तसंस्था)

> **आचार्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**
>
> या कार्यक्रमात आचार्य बाळकृष्णजी यांनी लिहिलेल्या 'योगऋषीयोगानिघंटू' या पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले. 'योगऋषीयोगानिघंटू' या पुस्तकात ३,७५३ योग आसने, ५५ प्रकारचे प्राणायाम, ७२१ बंधमुद्रा, १२० ध्यान तंत्रे, १५० शुद्धीकरण क्रिया आणि ४०० योगिक व्यायामांचा उल्लेख आहे. यामध्ये प्रथमच ५,१९९ योग व्यायामांची नावे नोंदवली गेली आहेत. हे पुस्तक संस्कृत आणि इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध आहे, असे बाळकृष्ण यांनी सांगितले. ■

# राज्यातील सात मान्यवरांना 'पद्म' पुरस्कार प्रदान



गायिका अलका याज्ञिक यांना पद्मभूषण पुरस्कार प्रदान करताना राष्ट्रपती

**नवी दिल्ली, २३ जून**

देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मंगळवारी राष्ट्रपती भवनात सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील सात देशातील ६५ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले. पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ६५ मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये दोन पद्मविभूषण, सात पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री प्रदान करण्यात आला. वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनेते, पटकथा लेखक, निर्माते आणि दिग्दर्शक आर. माधवन यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# पिछाडणे आणि पछाडणे...

महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीने मिळविलेला विजय हा महाराष्ट्राच्या बदललेल्या राजकीय वास्तवाचे प्रतिबिंब आहे. १७ पैकी १६ जागांवर विजय मिळवून महायुतीने आपले राजकीय वर्चस्व पुन्हा सिद्ध केले आहे. त्यापैकी ११ जागा एकट्या भारतीय जनता पक्षाने जिंकल्या आहेत. महायुतीचा हा विजय संघटनशक्तीचा, राजकीय नियोजनाचा, नेतृत्वावरील विश्वासाचा आणि विरोधकांच्या विकलतेचा एकत्रित परिणाम आहे. लोकशाहीत जनतेचा किंवा लोकप्रतिनिधींचा कौल ज्या पक्षाच्या बाजूने जातो, त्याचे स्वागत झाले पाहिजे. त्यामुळे महायुतीने हा विजय मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करावेच लागेल. राजकारणात कुणीही नाहक जिंकत नाही आणि विनाकारण पराभूत होत नाही. महाराष्ट्रात महायुतीच्या विजयामागे सर्वांत मोठे कारण म्हणजे भाजपाच्या नेतृत्वातील मजबूत संघटनात्मक यंत्रणा, सूक्ष्म नियोजन, कार्यकर्त्यांचे कष्ट आणि नेतृत्वावर असलेला विश्वास. अनेकदा भाजपाच्या यशाकडे सत्तेच्या ताकदीच्या किंवा संसाधनांच्या चष्म्यातून पाहिले जाते. पण ते संपूर्ण सत्य नाही. या यशाच्या मागे पाच दशकांचा संघर्ष आहे. भाजपाला सलग सत्ता मिळाली ती गेल्या दहा-बारा वर्षांत. तत्पूर्वी, क्वचितच सत्ता मिळाली. बहुतेकदा सत्तेने हुलकावण्या दिल्या. सरकारे आली आणि गेलीही. राज्यात आणि केंद्रातही तसे घडले. पण, सत्तेच्या बाहेर राहूनही भाजपाने संघटन वाढविले. कार्यकर्त्यांनी वैचारिक बांधिलकी जपली. सत्ता नसली तरी कार्यकर्ते टिकून राहिले. आजच्या विरोधकांनी भाजपाच्या या इतिहासातून शिकण्याची गरज आहे. सध्या महाराष्ट्रातील विरोधकांच्या राजकारणाचे सर्वांत मोठे संकट त्यांच्यातील आत्मविश्वासाच्या अभावाचे आहे. काँग्रेसवाल्यांना किंवा त्यांच्या मित्रपक्षांना विरोधी पक्षात राहणे आवडत नाही. कारण विरोधी पक्षाची भूमिका निभावणे आव्हानात्मक असते. खरे तर पराभव हा राजकारणाचा अपरिहार्य भाग आहे. पराभवाच्या कारणांचा प्रामाणिकपणे शोध घेण्याची तयारी असावी लागते. या निवडणुकीत प्रामुख्याने विरोधकांची मते फुटली. अनेक ठिकाणी क्रॉस व्होटिंग झाल्याच्या चर्चा झाल्या. काही ठिकाणी मतदारांनी आपल्याच पक्षाच्या उमेदवारांना साथ दिली नाही. संघटनेतील असंतोषाचे, संभ्रमाचे आणि नेतृत्वावरील विश्वास कमी होत असल्याचे हे लक्षण आहे, हे विरोधकांनी लक्षात घेतले पाहिजे आणि त्यानुसार सुधारणा केल्या पाहिजेत. नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत महायुतीने स्वतःच्या मतांबरोबरच बाहेरची जवळपास शंभर मते खेचली असे म्हणतात. राजकारणात हे नवीन नाही. निवडणुकीतील यश हे स्वतःची मते टिकविण्यासोबतच विरोधकांची मते आकर्षित करण्यावरही ठरत असते. त्यालाच राजकीय व्यवस्थापन म्हणतात. महायुतीने ते केले.

प्रश्न एवढाच आहे की विरोधकांना स्वतःची मते का टिकविता आली नाहीत? आपल्या मतदारांमध्ये, लोकप्रतिनिधींमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात ते का अपयशी ठरले? आपण एखाद्यावर आमिषाचा आरोप करीत असू तर त्या आमिषाला बळी पडणाऱ्याला बोल लावायचा की नाही?... की फक्त दोषारोप करण्यातच धन्यता मानायची? काही वर्षांपूर्वी काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे तीन पक्ष एकत्र आले. भाजपाला रोखणे हा त्यांचा समान कार्यक्रम होता. भाजपाविरोध हा 'राजकीय' उद्देश असू शकतो; तो दीर्घकालीन राजकीय विचार होऊ शकत नाही. जनतेला पर्यायी दृष्टी व आश्वासक विचार हवा असतो. महाराष्ट्राच्या विकासासाठी विरोधकांकडे कोणता आराखडा आहे? उद्योग, शेती, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा यावर विरोधकांची भूमिका काय आहे?... या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत. महाविकास आघाडी त्यात पूर्णपणे पिछाडली आहे आणि फक्त भाजपाद्वेषाने फारच पछाडली आहे. त्यामुळेच अशा विवेकासह स्वतःच्या पराभवाची मीमांसा करणे आघाडीला जमेनासे झालेले आहे. पक्षनिष्ठा, वैचारिक निष्ठा आणि संघटनेशी असलेली बांधिलकी यांमुळेच कठीण काळात पक्ष टिकतो. आज विरोधकांकडे नेमका याच गोष्टींचा अभाव आहे. सत्ता गेली की अस्वस्थता वाढते आणि निष्ठा डळमळते. महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे तेच झाले आहे आणि जोवर ते प्रामाणिक आत्मपरीक्षण करीत नाहीत, तोवर ते होत राहणार आहे. भाजपाने अनेक दशके सत्तेबाहेर राहूनही आपली विचारधारा आणि संघटन जपले. विरोधी बाकांवर बसूनही पक्ष वाढविला. आजच्या विरोधकांनी भाजपाकडून धडा घेतला पाहिजे की, सत्ता हा राजकारणाचा शेवट नसतो आणि सत्ता गेली किंवा मिळाली नाही म्हणून पक्ष संपत नसतो. सत्तेबाहेरचा काळ हा संघटन मजबूत करण्यासाठी, नव्या नेतृत्वाला घडविण्यासाठी आणि आत्मपरीक्षणासाठी सर्वोत्तम काळ असतो. गेली अनेक वर्षे विरोधी पक्ष बव्हंशी सत्तेबाहेर आहेत. पण, त्यांचा तो काळ भाजपावरील टीकेत वाया गेला. पण, इतरांवर टीका करताना स्वतःकडे कधी तरी पाहावेच लागते ना! विशेषतः काँग्रेसकडून अशा आत्मपरीक्षणाची अपेक्षा आहे. काँग्रेस हा त्यातल्या त्यात 'पक्ष' आहे म्हणून ही अपेक्षा. महाराष्ट्रावर अनेक दशकांपर्यंत वर्चस्व गाजविणारा पक्ष आज अनेक भागांत दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. अनेक ठिकाणी शून्यावर आला आहे. नेतृत्वाची दुसरी फळी निर्माण करण्यात अपयश, कार्यकर्त्यांशी कमी झालेला संवाद, निर्णयप्रक्रियेचे केंद्रीकरण आणि स्पष्ट राजकीय भूमिकेचा अभाव यामुळे काँग्रेस पक्ष कमकुवत झाला आहे. सत्तेच्या काळात काँग्रेसचे नेते गब्बर झाले. आता ते पक्षाला काडीचीही मदत करीत नाहीत. उलट, त्यांच्याच घरातले लोक या ना त्या पद्धतीने सत्तेशी घरठाव करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचे काँग्रेसच्या दिल्लीवाल्या नेत्यांना काहीच वाटत नसेल तर त्यांच्या सोशिकतेचे कौतुक केले पाहिजे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उदाहरण पाहा. शरद पवार यांच्या पक्षाची स्थिती पाहा. पवारांचे राजकीय कौशल्य वादातीत असले तरी केवळ अनुभवी नेतृत्वावर राजकारण चालत नाही. नवीन नेतृत्व, नवीन ऊर्जा आणि संघटनात्मक विस्तार यांची आवश्यकता असते. ते ना उद्धव ठाकरेंच्या पक्षात आहे, ना शरद पवारांच्या! लोकशाहीत सत्ताधारी पक्ष जितका मजबूत असावा लागतो, तितकाच मजबूत विरोधी पक्षही आवश्यक असतो. विरोधक नसतील तर सरकारवर अंकुश राहत नाही. धोरणांचे-निर्णयांचे मूल्यांकन नीट होत नाही. जनतेच्या प्रश्नांना पर्यायी माध्यम मिळत नाही. ब्रिटनमध्ये विरोधी पक्षाला 'गव्हर्न्मेंट इन वेटिंग' म्हटले जाते. कारण विरोधक हा भविष्यातला पर्याय असतो. महाराष्ट्रातील विरोधकांनीही स्वतःला नुसत्या विरोधकाच्या नव्हे तर अशा प्रभावी पर्यायाच्या स्वरूपात उभे करणे आवश्यक आहे. आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएमवर, यंत्रणेवर किंवा विरोधकांच्या संसाधनांवर फोडून उपयोग नाही. संघटन उभे करावे लागेल. राजकारणातील यशासाठी जनतेत जावे लागते, संघर्ष करावा लागतो, प्रश्न उचलावे लागतात आणि पर्याय द्यावा लागतो. यातले काहीच न करता विरोधकांना सत्ता हवी असेल तर ते कायम 'वेटिंग'वरच राहतील. नेभळट, बोटचेपे, बुळचट, घाबरट, संभ्रमित आणि बिनकण्याचे विरोधक लोकशाहीच्या कामाचे नसतात. तिला अभ्यासू, वैचारिक, संघर्षशील आणि सक्षम विरोधक हवेत. महायुतीच्या विजयाच्या निमित्ताने, विरोधकांना पुन्हा एकवार आरशात स्वतःला न्याहाळण्याची संधी या निकालाने दिलेली आहे. ती संधी घ्यायची की आरशाकडे पाठ वळविण्याची सवय कायम ठेवायची हे विरोधकांनीच ठरवायचे आहे. ■

## विशेष

# हरित ऊर्जेची झेप अन् वीज वितरणाचे वास्तव

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताने गेल्या दशकात अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात घेतलेली झेप ही केवळ देशांतर्गत धोरणात्मक यशकथा नाही, तर जागतिक पातळीवरही लक्ष वेधून घेणारी घडामोड आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामानबदल आराखडा करारांतर्गत सादर केलेल्या राष्ट्रीय निर्धारित योगदानांद्वारे भारताने २०३५ पर्यंत उत्सर्जन तीव्रतेत ४७ टक्के घट, एकूण वीजक्षमतेपैकी ६० टक्के क्षमता बिगर जीवाश्म इंधन स्रोतांतून निर्माण करणे आणि मोठ्या प्रमाणात कार्बन सिंक उभारणे अशी उद्दिष्टे जाहीर केली आहेत. या दिशेने भारताची वाटचाल अपेक्षेपेक्षा वेगाने होत असल्याचे दिसते; परंतु या यशाच्या चमकदार चित्रामागे वीजवितरण क्षेत्रातील वाढती आर्थिक अस्थिरता हा एक गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. भारताने २०३० साठी निश्चित केलेली अनेक हरित ऊर्जा उद्दिष्टे आधीच गाठण्यास सुरुवात केली आहे. ५० टक्के बिगर-जीवाश्म वीजक्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट २०२५ पर्यंतच पूर्ण झाले आहे. सौर आणि पवन ऊर्जेच्या झपाट्याने वाढलेल्या क्षमतेमुळे भारत अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात जागतिक नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करत आहे. ग्रामीण भागातही सौरऊर्जेचा प्रसार वाढत आहे. घरांच्या छतांवर सौर पॅनेल बसवण्यास प्रोत्साहन देणाऱ्या योजनांना प्रतिसाद मिळत आहे. 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना'सारख्या योजनांमुळे अनेक घरगुती ग्राहक स्वतःची वीज स्वतः निर्माण करू लागले आहेत.

वरकरणी पाहता ही ऊर्जा स्वातंत्र्याची आणि पर्यावरणीय प्रगतीची आदर्श दिशा वाटते; पण या बदलाचे आर्थिक परिणाम आता स्पष्टपणे समोर येऊ लागले आहेत. देशातील वीज वितरण कंपन्या म्हणजेच 'डिस्कॉम्स' आधीपासूनच आर्थिक अडचणीत आहेत. अनेक वर्षांपासून त्यांना तोटा सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अक्षय ऊर्जेच्या नव्या धोरणांमुळे त्यांच्या महसुलावर आणखी ताण पडत आहे. यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्राहकांच्या वापराच्या पद्धतीत होत असलेला बदल. पारंपरिक पद्धतीत ग्राहक पूर्णपणे 'डिस्कॉम'कडून वीज विकत घेत असत. आता मात्र मोठे औद्योगिक ग्राहक आणि संस्थात्मक ग्राहक थेट अक्षय ऊर्जा प्रकल्पांकडून वीज खरेदी करू लागले आहेत. 'ओपन ॲक्सेस' व्यवस्थेमुळे त्यांना ही मुभा मिळाली आहे. दिल्ली मेट्रोसारख्या संस्थांनी सौर प्रकल्पांमधून थेट वीज घेण्यास सुरुवात केली आहे. यामुळे स्वच्छ ऊर्जा वापर वाढतो; पण त्याच वेळी 'डिस्कॉम्स'चे सर्वाधिक महसूल देणारे ग्राहक त्यांच्यापासून दूर जात आहेत. याचा आर्थिक परिणाम गंभीर आहे.

घरगुती सौरऊर्जेचा वाढता वापरही याच समस्येला हातभार लावत आहे. नेट मीटरिंग व्यवस्थेमुळे ग्राहकांनी निर्माण केलेली अतिरिक्त वीज ग्रिडमध्ये पाठवली जाते आणि त्याचा लाभ त्यांच्या वीज बिलात समाविष्ट केला जातो. काही ग्राहकांचे बिल शून्यापर्यंत येऊ लागले आहे. हे ग्राहकांसाठी नक्कीच फायदेशीर असले, तरी 'डिस्कॉम्स'च्या महसुलात घट होत आहे. वीजवितरण व्यवस्थेत अनेक खर्च असे असतात, जे ग्राहक किती वीज वापरतो यावर अवलंबून नसतात. कर्मचारी वेतन, ट्रान्समिशन नेटवर्क, सबस्टेशन्स, पायाभूत सुविधा देखभाल आणि वीज उत्पादकांना द्यावी लागणारी निश्चित देयके हे सर्व खर्च कायम असतात; पण सध्याच्या दररचनेत ग्राहकांकडून आकारले जाणारे निश्चित शुल्क तुलनेने कमी आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (सीईए) याच समस्येकडे लक्ष वेधत दररचनेत सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली आहे. 'सीईए'च्या मते, घरगुती आणि कृषी ग्राहकांकडून निश्चित शुल्काच्या स्वरूपात अधिक महसूल वसूल करणे आवश्यक आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी तर निश्चित खर्चाची संपूर्ण वसुली करण्याची शिफारस करण्यात आली आहे. 'नेट मीटरिंग' ग्राहकांसाठी स्वतंत्र दरश्रेणी तयार करणे, 'ओपन ॲक्सेस' ग्राहकांसाठी 'स्टॅण्डबाय चार्ज' आकारणे आणि वेळेनुसार बदलणारे वीजदर लागू करणे हे उपाय सुचवण्यात आले आहेत.

विकसित देशांमध्ये घरगुती ग्राहकांसाठी निश्चित शुल्क मर्यादित ठेवले जाते आणि उद्योगांवर अधिक भार टाकला जातो. भारतातही अशाच संतुलित दृष्टिकोनाची गरज आहे. दुसरीकडे 'डिस्कॉम्स'नी स्वतःच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे तितकेच आवश्यक आहे. अजूनही अनेक राज्यांमध्ये वीजचोरी, बिल वसुलीतील त्रुटी आणि तांत्रिक तोटे मोठ्या प्रमाणावर आहेत. स्मार्ट मीटरिंग, डिजिटल बिलिंग, आधुनिक ट्रान्समिशन प्रणाली आणि पारदर्शक व्यवस्थापनाद्वारे हे तोटे कमी करता येऊ शकतात.

आज भारत एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. एकीकडे हवामानबदलाचा मुकाबला करण्यासाठी हरित ऊर्जेची दिशा स्वीकारावी लागणार आहे, तर दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी आणि विश्वासार्ह वीज उपलब्ध ठेवावी लागणार आहे. ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करणे कठीण असले, तरी अशक्य नाही. त्यासाठी दूरदृष्टी, आर्थिक शिस्त आणि तांत्रिक नवकल्पनांची जोड आवश्यक आहे. भारताची हरित ऊर्जा क्रांती खऱ्या अर्थाने यशस्वी ठरणार असेल, तर तिचा पाया मजबूत आणि शाश्वत वीजवितरण व्यवस्थेवरच उभा रहावा लागेल. भारतातील बहुतांश 'डिस्कॉम्स' गेल्या अनेक दशकांपासून तोट्यात आहेत. तांत्रिक आणि व्यावसायिक तोटे कमी करण्याच्या प्रयत्नांमुळे त्यांची परिस्थिती काहीशी सुधारली असली, तरी २०२३-२४ या आर्थिक वर्षात अजूनही प्रति युनिट ०.३९ रुपयांचा रोखीचा तोटा होत असून एकूण रोख तूट तब्बल ५८ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच अक्षय ऊर्जा वाढत असताना 'डिस्कॉम्स'च्या आर्थिक मॉडेलवर मोठा ताण निर्माण होत आहे. 'डिस्कॉम्स'ना थर्मल वीज उत्पादकांशी दीर्घकालीन 'टेक-ऑर-पे' स्वरूपाचे करार करावे लागतात. म्हणजेच त्यांनी ठरावीक प्रमाणात वीज घेतली नाही, तरी ठरावीक शुल्क द्यावेच लागते. दुसरीकडे, ग्राहक स्वतः वीज निर्माण करू लागल्याने किंवा थेट हरित ऊर्जा खरेदी करू लागल्याने 'डिस्कॉम्स'ची विक्री घटते. त्यामुळे महसूल घटत असताना खर्च कायम राहतो आणि आर्थिक तूट वाढत जाते.

या पृष्ठभूमीवर केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने मांडलेल्या सूचनांना महत्त्व प्राप्त झाले आहे. सीईएने वीज दररचनेत बदल करून 'डिस्कॉम्स'च्या निश्चित खर्चाची भरपाई अधिक प्रभावीपणे करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. सध्या 'डिस्कॉम्स'ला ग्राहकांकडून निश्चित शुल्काच्या स्वरूपात मिळणारा महसूल फक्त ९ ते २० टक्के आहे. त्यामुळे सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांकडूनही ग्रिडच्या वापरासाठी योग्य प्रमाणात शुल्क आकारले पाहिजे, असा युक्तिवाद करण्यात येत आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# कोचिंग कल्चर...

मुलं शिकावीत, त्यांनी खूप मोठे व्हावे, असे प्रत्येकच आई-बापाचे स्वप्न असते. मात्र आता या स्वप्नांना 'कोचिंग कल्चर'ची किनार दिसून येत आहे. मोठ्या कोचिंग सेंटरमध्ये प्रवेश म्हणजे प्रतिष्ठेत आणखी भर! ही मानसिकता एकीकडे आणि कोचिंग क्लासेस नव्हे तर अब्जावधीची इंडस्ट्री अशी निर्माण झालेली शिकवणी वर्गांची प्रतिमा आज शिक्षणाचे झालेले बाजारीकरण स्पष्ट करते. अशा या बाजारीकरणात पालकच आपल्या पाल्यांचे जीव धोक्यात टाकताहेत की काय? असा प्रश्न लखनौसारख्या घटनांनी उपस्थित होतो. शाळा सोडून अनेक तास शिकवणीत बसणाऱ्या मुलांचा ज्यावेळी निरर्थक बळी जातो, तेव्हा कोचिंग कल्चर केवळ नावापुरतेच उरते!

शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेचे रूप बदलत आहे. आधी शाळांशिवाय काहीच नव्हते. तेव्हा आम्हा पालकांची मानसिकताही शाळेपुरतीच मर्यादित होती. आणि हो, या शाळांमध्ये शिकूनच, कुठल्याही शिकवण्या न लावता उच्चपदस्थ अधिकारी, डॉक्टर, अभियंते घडले. अनेक चांगले राजकारणी याच शाळांतून पुढे आले. तेव्हा कुठेही 'कोचिंग'चे कल्चर नव्हते. आज परिस्थिती बदलली आहे. सुरुवात पालकांच्या मानसिकतेपासून झाली. पालकांची मानसिकता 'कोचिंग'वाली झाली आणि कोचिंग सेंटर नावाने ज्ञानदानाच्या नावावर व्यवसाय करणारी अनेक दुकाने उघडली गेली. कर्ज काढून पालक आपल्या मुलांना महागड्या शिकवण्यांमध्ये पाठवितो. जवळची जमापुंजी पणाला लावतो. अधिक वेळ कोचिंगमध्ये घालविणारे विद्यार्थी शाळेत केवळ कागदोपत्री हजर असतात. म्हणजे शाळा 'डमी' झाल्या अन् उत्तीर्ण होण्याची हमी शिकवण्या देऊ लागले. शिकवणी वर्गाच्या मोठमोठाल्या इमारती, अत्याधुनिक सोयी, एखाद्या पंचतारांकित हॉटेलला लाजवेल अशी व्यवस्था पाहून पालकही हुरळून जातात. पण बाहेर जेवढे दिसते, तेवढे शिक्षण खरेच गुणात्मक असते का? याचा विचार केला जात नाही. एखादा मुलगा महागड्या शिकवण्यांमध्ये गेला की, पालकांची प्रतिष्ठा वाढते!

पण या शिकवण्या किती सुरक्षित आहेत, हा प्रश्न पुन्हा एकदा लखनौ येथे झालेल्या जळीत कांडाने उपस्थित केला आहे. १५ विद्यार्थ्यांचे जीव गेले. मग अशावेळी 'कोचिंग कल्चर' उराशी बाळगून 'त्या' पालकांचे दुःख कमी होणार आहे का? शिक्षणाचे झालेले व्यापारीकरण आणि त्यात वाढलेली स्पर्धा यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. गावागावात टोलेजंग इमारती उभारून कोचिंग क्लासेस सुरू केले जात आहेत. ना कोणती परवानगी, ना कोणत्याही सुरक्षेची हमी! आम्ही पालकही या गोष्टी फारशा गांभीर्याने घेत नाही. उंच इमारत आणि आतील 'दिखावा' पाहून सर्व विसरून जातो. पण १५ जणांच्या जिवावर बेतल्यानंतर आता याचा विचार होणे गरजेचे आहे. अग्नी सुरक्षा, वाहनतळ, आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या प्राथमिक सोयींचा अभाव अशा स्थितीत प्रशासनाच्या डोळ्यादेखत आज प्रत्येक शहरात कोचिंगचा व्यवसाय जोरात सुरू आहे. शिक्षणाचे पावित्र्य आज गाठोड्यात गुंडाळून शिक्षकच सौदेबाजीवर उतरल्याने 'नीट' घोटाळ्यासारखे प्रकार पुढे येत आहेत. अनेक नामांकित कोचिंगचे प्रमुख याचे कर्तेधर्ते असल्याचे पुढे आल्यानंतरही आम्ही कोचिंग संस्कृतीचे शेपूट धरून त्याच्याच मागे जाणार असू तर खरंच आपण आपल्या पाल्यांचे आयुष्य घडवितो की बिघडवतो, याचा विचार होणे गरजेचे आहे.

कोचिंग सेंटर आज अब्जावधीची इंडस्ट्री झाली आहे. त्यांची हिंमत एवढी वाढली आहे की, एखादा गरीब मुलगा स्वतःची जिद्द, परिश्रमाच्या बळावर उत्तुंग भरारी घेत असेल तर त्याला पैशाने विकत घेऊन आपल्या शिकवणीचा असल्याचे दाखविण्यातही त्यांना कुठलीच खंत वाटत नाही. शिकवणी वर्गामधील बंदिस्त वातावरण विद्यार्थ्यांची मानिकसता संकुचित करीत आहे. शिकवण्यांनी स्वयंअध्ययन ही संकल्पनाच मोडीत काढली आहे. स्वतः अडचणी सोडविल्याने वाढणारी तर्कशक्ती आता संपल्यात जमा आहे. जिद्द संपली, आत्मविश्वास कमी झाला आणि केवळ शिकवणीतील शिक्षकांवर आपला भार टाकून यशस्वी होण्याची स्वप्ने पाहणारी पिढी तयार होत आहे. जुनी पिढी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिकून यशस्वी झाली. मात्र आज आमचे यश लाखोंच्या कोचिंग सेंटरवर अवलंबून आहे. मात्र हेच कोचिंग सेंटर शिक्षणासह जिवांचा बाजारही मांडू शकतात, हे लखनौच्या घटनेने अधोरेखित केले आहे. ज्यांच्याकडे अधिकार आहेत, त्या यंत्रणा डोळे झाकून आहेत. तर ज्यांनी समजायला पाहिजे, अशा पालकांच्या डोक्यावर कोचिंगच्या भव्यदिव्यतेची झापडं आहेत. बदलत्या स्पर्धेच्या युगात एका मर्यादेपर्यंत कोचिंग महत्त्वाचे वाटत असले तरी तेच सर्वस्व म्हणून त्याच्या आहारी जाणे म्हणजे पाल्यांच्या जीवाचा 'सौदा' करण्यासारखेच आहे. ■

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# सप्त वासर अर्थात सात वार!

**प्रा. दिलीप जोशी**

भारतीय कालगणनेत वारांचाही महत्त्वपूर्ण समावेश आहे. वारांना आपल्या शास्त्रात वासर म्हणतात. १) रविवारला आदित्य वासर, भानुवासर, २) सोमवारला इंदुवासर किंवा चंद्रवासर, ३) मंगळवारला भौमवासर, ४) बुधवारला सौम्यवासर, ५) गुरुवारला बृहस्पतीवासर, ६) शुक्रवारला भृगूवासर, ७) शनिवारला मंदवासर किंवा स्थिरवासर म्हणतात.

पंचांगाच्या पाच अंगात वारांचा समावेश आहे. वारांची नावे ग्रहानुसार आहेत. ग्रह नऊ असूनही वारांची नावे सातच ग्रहावरून का? तर खगोलशास्त्र किंवा ज्योतिषशास्त्रातील दृश्य खगोलीय ग्रह म्हणजे जे आपल्याला डोळ्यांनी दिसतात त्यांच्यावरूनच वारांची नावे ठेवली आहेत. ज्योतिर्वैज्ञानिकांनी सूर्य आणि चंद्र यांनाही ग्रह म्हटले आहे. त्यानुसार शनि, रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरू आणि शुक्र हे दृश्य खगोलीय ग्रह आहेत. ज्या वाराचा जो ग्रह अधिपती त्यानुसार त्या वाराचे नाव ठेवले जाते.

**वारांचा अधिपती कसा ठरतो?**

ज्योतिषशास्त्रात होरा शब्द प्रचलित आहे. सोप्या भाषेत होरा म्हणजे एक तास. दिवसभराचे चोवीस तास म्हणजे चोवीस होरा असतात. यातील प्रत्येक होऱ्याचा म्हणजे प्रत्येक तासाचा एक अधिपती ग्रह असतो. त्याला होराधिपती म्हणतात. असे होराधिपती वरील सांगितलेले फक्त सात ग्रह आहेत. कारण वारांसाठी दृश्य सप्त ग्रहांचाच वापर केला आहे. सूर्योदयाच्या वेळी जो होरा असतो (म्हणजे त्या दिवसाचा पहिला तास) त्या पहिल्या होऱ्याचा अधिपती ग्रह जो असेल (होराधिपती) त्या ग्रहाचे नाव त्या वाराला दिले जाते. त्या दिवशी पहिल्या होऱ्याचा राशिस्वामी म्हणजे अधिपती ग्रह त्या दिवसाचा दिनाधिपती असतो. त्याच ग्रहाचे नाव त्या दिवसाला दिले जाते. म्हणजे रविवारी सूर्योदयाला पहिल्या होऱ्यात म्हणजे पहिल्या तासात अधिपती ग्रह सूर्य असतो म्हणून तो पूर्ण दिवस रविवार. सोमवारी सूर्योदयाला पहिल्या होऱ्याला राशिस्वामी चंद्र असतो म्हणून सोमवार. सूर्योदयाला पहिल्या तासाचा होराधिपती जो ग्रह असेल त्या दिवशीच्या वाराचे नाव त्या दिवशीच्या होराधिपती ग्रहावरून ठेवले जाते. तोच त्या दिवसाचा दिनाधिपती असतो.

**प्रचलित वारांचा क्रम कसा ठरविला जातो?**

वारांचा क्रम ग्रहांच्या गतीनुसार ठरतो. म्हणजे मंदगतीच्या ग्रहापासून शीघ्रगतीच्या ग्रहापर्यंत त्यादिवशीच्या सूर्योदयाचा प्रथम होरा ठरवितात. ते क्रमवार असतात. सोप्या भाषेत, एखादा ग्रह एका राशीतून दुसऱ्या राशीत जाताना किती वेळ घेतो ती त्याची गती. एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेशासाठी ज्या ग्रहाला जास्त वेळ लागतो तो ग्रह प्रथम घेतला जातो. त्यानंतर त्याहून थोडा जलद म्हणजे पूर्वीच्या ग्रहापेक्षा जरा गतिमान तो घेतला जातो. त्यानंतर त्यापेक्षा जलद असा क्रम विचारात घेतला जातो.

गतीचा क्रम मंद ते शीघ्र असा विचारात घेतला तर सर्वांत मंद शनि ग्रह आहे. त्याला एका राशीतून दुसऱ्या राशीत जाताना अडीच वर्ष लागतात. त्याहून थोडा गतिमान गुरू आहे. त्याला एका राशीतून दुसऱ्या राशीत जाण्यासाठी एक वर्ष लागते. त्यानंतर क्रमाने मंगळ, ज्याला सत्तावन्न दिवस लागतात. रविला एक महिना. शुक्र अठरा दिवस, बुध साडेसात दिवस आणि सर्वांत जलद चंद्र ज्याला सव्वा दोन दिवस लागतात. त्यानुसार वारांचा क्रम घेतला जातो. खरं तर शनि सर्वांत मंद असल्याने शास्त्रात आठवड्याची खरी सुरुवात शनिवारपासून होते, पण कालौघात सोमवारला प्रथम दिवस मानले गेले. सोमवार ते रविवार असा क्रम आपण घेतो.

आता अजून प्रश्न पडतो की गतिक्रमानुसार ग्रहांचा क्रम शनि, गुरु, मंगळ, रवी, शुक्र, बुध, चंद्र असा आहे. मग वारांचा क्रम सोम, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, रवि असा का धरला जातो? त्याचे प्रमाण श्लोकात आहे.

**"मंदात् अधः क्रमेण स्युः चतुर्थाः दिवसाधिपाः''**

मंद म्हणजे शनिपासून सुरुवात करून गतिक्रमानुसार शनि धरून पुढील चौथा ग्रह म्हणजे पुढील दिनाधिपती राहील. म्हणजे त्यानंतरचा पुढील वार राहील. त्यालाही थोडे समजून घेऊ. ग्रहांचा गतीनुसार क्रम पुढीलप्रमाणे आहे.

१) शनी २) गुरु ३) मंगळ ४) रवि ५) शुक्र ६) बुध ७) चंद्र.

वरील गतीनुसार क्रम घेतला तर शनिवारनंतर पुढील वार ठरविण्यासाठी शनि ग्रह धरून त्यापुढील चौथा ग्रह रवि येतो. म्हणून शनिनंतर रविवार येतो. आता रवि धरून चौथा ग्रह घ्या, तर तो चंद्र म्हणजे सोमवार. पुढे सोम म्हणजे चंद्र धरून चौथा घ्या तर तो मंगळ येतो. म्हणून सोमवारनंतर मंगळवार येईल. असे प्रत्येक ग्रहानंतर चौथा घ्या तर त्या ग्रहवारानंतर पुढील वार येईल. त्यामुळे ग्रहांच्या गतीनुसार क्रम वेगळा असला तरी वारांचा क्रम प्रचलित आहे.

**चौथा ग्रह का घ्यावा?**

तर, एकूण दृश्य ग्रह सात आहेत. दिवस हा चोवीस होरा म्हणजे चोवीस तासांचा आहे. सात ग्रह असल्यामुळे प्रत्येक ग्रहाचा एक तास म्हणजे सात ग्रहांचे सात तास झाल्यावर पुन्हा नवीन फेरी सुरू होते. दिवसभरात सात सात तासांच्या तीन फेऱ्या पूर्ण होतात. म्हणजे चोवीस तासातील एकवीस तास तीन फेऱ्यात हे ग्रह पूर्ण करतात. आता उरतात तीन तास. तीन होऱ्यात (तासात) अनुक्रमे पुढील तीन ग्रह पार होतात. म्हणजे चोवीस होरा (तास) पूर्ण होतात.

आता पुढील दिवस सुरू होतो तो तेथून म्हणजे एकविसाव्या होऱ्यापासून चौथ्या ग्रहावर. म्हणून वारांचा क्रम घेताना गतिक्रमातील ग्रहांच्या चौथ्या ग्रहापासून घेतात. सूर्योदय ते सूर्योदय हे चोवीस तास म्हणजे ज्योतिषात त्याला अहोरात्र म्हणतात. वारांमुळे काळ वेळेचे सूत्र लागते. नियोजनामुळे शिस्त लागते. विशिष्ट वारांचा विशिष्ट ग्रह अथवा देवता असते. म्हणूनच शनिचे उपासक शनिवारला महत्त्व देतात. दत्तभक्तांचा गुरुवार, देवीचे उपासक मंगळवार, बालाजी भगवंताचा शुक्रवार असे आपण मानतो आणि त्यानुसार उपवास, उपासना किंवा व्रत करतो.

ज्योतिषशास्त्रातील पंच अंगात वाराचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

भारतीय खगोल आणि ज्योतिषावरूनच जगानेही वारांचा अभ्यास करून त्यांच्या भाषेत वारांची नावे दिलीत. संडे, मंडे त्यानुसारच आहेत. इस्लामी वार देखील पीर, मंगल, बुध, जुमेरात, जुम्मा, सनीचर आणि इतवार नावावरून त्यातील भारतीयता लक्षात येईल. सप्त वासर म्हणजे सात वार आपल्या जीवनात महत्त्वाची भूमिका ठेवतात. म्हणूनच मोठा महाल असो की झोपडी, कार्यालय असो की दुकान प्रत्येकाच्या भिंतीवर हे वार कालदर्शिकेत लटकलेले असतात. ज्याला आपण दैनंदिनी, दिनदर्शिका म्हणतो. ज्यात सात वारांचा समूह म्हणजे सप्ताह आणि पंधरा वारांना पक्ष तर तीस वारांचा समूह म्हणजे मास किंवा महिना म्हणतो. असे बारा महिने म्हणजे एक वर्ष आहे. भागवत, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी असे सप्ताह बसविण्याची पद्धत म्हणजे सात दिनाधिपतींच्या सान्निध्यात नामसंकीर्तन होय. ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### साधू संत येती घरा



महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. मानव रूपात ईश्वराचे दूत म्हणूनच संतांचे अवतारकार्य चालते म्हणूनच संसाराच्या दुष्टचक्रात अडकलेल्या माणसास भगवंताच्या प्राप्तीसाठी संतचरणी लीन व्हावे लागते. आपल्या आचारविचार व प्रबोधनातून या भूतलावरील सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणासाठीच संतांचे अवतारकार्य असते. याच तोडीचे अवतारी संत श्री गजानन महाराज, भक्तांच्या हाकेला सदैव धाऊन येणारी माउली.

पंढरीच्या वारीसाठी शेगावहून निघालेली श्री गजानन महाराजांची पालखी २३ व २४ जून रोजी अकोल्यात मुक्कामी आहे. दरवर्षी विठू माउलीच्या भेटीसाठी पंढरीला जाणाऱ्या पालखीचा मुक्काम दोन दिवस अकोल्यात असतो. श्रींच्या पालखी आगमनानिमित्त शहरात एक वेगळाच उत्साह संचारतो. आणि "साधू संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा'' या ओळी नकळत ओठावर येतात. प्रशासनाची सुद्धा एक वेगळी लगबग सुरू झालेली असते. पालखी मार्गातील रस्त्यांची डागडुजी, स्वच्छता, नालेसफाई, पालखी मार्गातील पथदिव्यांची दुरुस्ती आदी कामे उरकली जातात. महाराजांच्या भक्तांसाठी सेवेची पर्वणी स्वतःच्या गावात चालून आलेली असते, त्यामुळे हा उत्साह काही वेगळाच असतो. अकोल्याहून अगदी रोज महाराजांच्या दर्शनासाठी जाणारी भक्तमंडळीसुद्धा आहे. आपण भलेही महाराजांच्या दर्शनासाठी त्यांच्या गावात रोज जात असू पण महाराज वर्षातून एकदा आपल्या गावात येतात ही भावनाच खूप आनंददायी आहे. म्हणूनच देहभान विसरून पालखीतील महाराजांच्या रजत मुखवट्याच्या दर्शनाने मिळालेला अलौकिक आनंद महाराजांचे भक्त शब्दांत व्यक्तच करू शकत नाहीत. दर्शनानंतर पाणावलेल्या डोळ्यांनी सुख-दुःखाची शिदोरी महाराजांपाशी सोडून एक निराळे समाधान नकळत व्यक्त होते. शहरातील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर पालखी मार्गस्थ होते. जड अंतःकरणाने अकोलावासी पाणावलेल्या डोळ्यांनी माउलीचा निरोप घेतात व पालखीची सेवा निरंतर घडावी यासाठी प्रार्थना करतात.

**अखिल देशपांडे**/अकोला

■■■

### केवळ एका प्रसिद्धीसाठी!

सोशल मीडियावर रिल्स बनवण्यासाठी आणि प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी दिवसेंदिवस तरुणांची स्टंटबाजी हा एक मोठा चिंतेचा विषय बनला चालला आहे. अगदी कमी वेळात हजारो लोकांमध्ये प्रसिद्धी मिळण्यासाठी अतिशय खालचा पातळीवर जाऊन स्वतःचा आणि इतरांचा जीव विनाकारण धोक्यात घालून सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण समाजापर्यंत काय मेसेज देतो याचे भान ठेवणे गरजेचे आहे. सोशल मीडियावर टाकणाऱ्या या असल्या प्रत्येक गोष्टीचा समाजावर काही ना काही चांगला-वाईट परिणाम होतच असतो. यापेक्षा समाजासाठी, देशासाठी, निसर्गासाठी काहीतरी चांगो काम करून त्याची रिल बनवून टाकली तर समाजापर्यंत चांगले मेसेज जाऊन कौतुक देखील होईल. उगीच स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या जीवावर बेतणारी अशा प्रकारची स्टंटबाजी करून जगासमोर काय साध्य करायचे आहे?

**लोकेश बापट**/पुणे

■■■

### विद्यार्थ्यांचा हक्क हिरावू नका

नीट युजी परीक्षा संपूर्ण महाराष्ट्रात रविवारी संपन्न झाली. खरं म्हणजे गेल्या एक महिन्यापूर्वी या परीक्षेचे पेपर फुटल्यामुळे ती परीक्षा रद्द करण्यात आली होती. आणि आता पुन्हा ती जाहीर करण्यात आली होती. आता मुलांना जोमात अभ्यास करून या परीक्षेला बसताना टेन्शन येत होतं, कारण महिनाभरापूर्वी परीक्षेचा झालेला गोंधळ आणि आता पण गोंधळ होईल का? महिनाभरापूर्वी झालेला अभ्यास, त्यानंतर आता केलेल्या अभ्यास सर्व सरमिसळ झाल्यामुळे एक प्रकारचं विद्यार्थ्यांवर टेन्शन होतं. त्यामध्ये एक दोन मिनिटे उशीर झाल्यामुळे परीक्षा केंद्रांवर आलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले नाही. खरे तर हे योग्य वाटत नाही. एक दोन मिनिटे जरी विद्यार्थी उशिरा आला तरी त्याला परीक्षेला बसू देणे फार महत्त्वाचे आहे. विद्यार्थी हा वर्षभर अभ्यास करून परीक्षेला येताना कुठे वाहतूककोंडीत अडकू शकतो, तर काही दुर्दैवी घटना घडू शकतात आणि यामुळे त्याला उशीर होऊ शकतो. पण तो कमी वेळ घेऊन आपली परीक्षा देणार आहे, त्यामुळे त्यामध्ये कसलाही गैरप्रकार होऊ शकत नाही. मुलांना उशीर झाला तर त्यांचे वर्ष शिक्षण मंडळाने बरबाद करू नये. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार नाही, याची काळजी त्यांनी घ्यावी आणि त्यांचा परीक्षेला बसण्याचा हक्क हिरावू नये. ■

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सलीम खान संघाचा दास्ताने संघावर शानदार विजय

## लिटिल चॅम्प क्रिकेटः आदित्य चटके सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून -**

लिटिल चॅम्प क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी झालेल्या सामन्यात सलीम खान संघाने दास्ताने संघाचा ३० धावांनी पराभव करत शानदार विजय मिळवला. आदित्य चाटके याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर सलीम खान संघाने सामन्यावर आपले वर्चस्व गाजवले.



जुळे सोलापुरातील भंडारी क्लबच्या मैदानावर झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सलीम खान संघाने निर्धारित ३० षटकांत ९ बाद १६६ धावांची मजबूत धावसंख्या उभारली. त्यांच्याकडून आदित्य चटके याने ३२ चेंडूंत ३ चौकारांसह नाबाद ३० धावांची खेळी केली. त्याला लक्ष्मण याने २४ धावांचे आणि अर्णव भोसले याने ५ चौकारांच्या मदतीने नाबाद २३ धावांचे योगदान दिले. दास्ताने संघाकडून गोलंदाजी करताना हर्षवर्धन सेन याने ३ षटकांत १२ धावा देऊन २ बळी घेतले.

१६७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दास्ताने संघाचा डाव २६.५ षटकांत १३६ धावांवरच आटोपला. सलीम खान संघाच्या तबीश कांबळे याने घातक गोलंदाजी करत अवघ्या ३ षटकांत ८ धावा देऊन ४ फलंदाजांना बाद केले. त्याला आदित्य राठोड याने ९ धावांत २ बळी आणि आदित्य चाटके याने ५ धावांत २ बळी घेत सुरेख साथ दिली. दास्ताने संघकडून हर्षवर्धन सेन याने ४ धावा केल्या आणि २ बळी घेतले, त्याच्या या कामगिरीसाठी त्याला फायटर ऑफ द मॅच म्हणून गौरवण्यात आले.

उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या सलीम खान संघाच्या आदित्य चाटके याला सामनावीर आणि सर्वोत्कृष्ट फलंदाज म्हणून निवडण्यात आले. तर तबीश कांबळे याला सर्वोत्कृष्ट गोलंदाजचा मान मिळाला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः काटेगांव, ता. बार्शी व बार्शी तालुका हद्दीतील व आसपासचे लोकांना आमचे पक्षकार यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे काटेगांव हद्दीतील जमीन गट नं. २००/१/अ/१ यापैकी क्षेत्र ०० हे. ८० आर + पो.ख. ०० हे. ०२ आर, आकार ०१ रू. ५१ पैसे. आतील जमीन आतील दगड, माती, वगैरे तदंगभूत वस्तूसह, सदरील मिळकत आमचे अशिलाची आई लग्नापुर्वीचे नांव : सविता काशिनाथ गाढवे, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असून ७/१२ सदरी त्यांचे नावाची नोंद आहे. आमचे अशिल सविता काशिनाथ गाढवे यांचा मुलगा प्रतापसिंह नवनाथ जाधव, रा. उपळाई रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर आहे, सदरील मिळकतीमध्ये आमचे अशिलाचे न विभागलेला हिस्सा आहे. असे असता सविता काशिनाथ गाढवे यांना कसलेही कौटूंबिक पैशाची गरज नसताना अथवा कर्ज नसताना केवळ ७/१२ सदरी स्वतःचे नाव आहे याचा गैरफायदा घेऊन सदरील मिळकत विक्री करण्याचा प्रयत्न करणार आहे, अशी भाषा गावात बोलू लागले आहे, सदरील मिळकत सविता गाढवे यांना विक्री करण्याचा कसलाही हक्क अधिकार नाही. आमचे अशिल सदर मिळकतीबाबत योग्य त्या दिवाणी न्यायालयात सरस निरस मानाने वाटप होवून मिळण्याचा दावा दाखल करत आहेत.

सबब आपणास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, यदा कदाचित सविता काशिनाथ गाढवे, रा. बार्शी, ता. बार्शी यांनी सदरील मिळकत विक्री काढलेस तिचे वर कोणीही कसल्याही प्रकारचा गहाण, दाण, हस्तांतरण अथवा बोजा निर्माण होईल अथवा त्रयस्थ व्यक्तीचा हक्क प्रस्थापीत होईल असे कुठलेही कृत्य, कसलाही व्यवहार सविता काशिनाथ गाढवे हिच्याबरोबर करू नये, केल्यास तो आमचे अशिलाचे हक्क व हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. २४/०६/२०२६.

सही/-
**ॲड. एस. एस. ठोंबरे**
**बी.कॉम. (ऑनर्स), एलएल.बी.**
**फुले प्लॉट, बार्शी**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मोबा.नं. ९३७११६२४४५**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली ता. ०१/०९/२०२६
दिवाणी कि.अ. नं. १४/२०२६

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

**श्री. केशव ज्ञानोबा जाधव,**
वय ३९ वर्षे, धंदा - नोकरी
रा. रातंजन, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदारांची मयत सुधामती श्रीरंग जाधव यांनी अर्जदाराचे हक्कात ता. ३०/०६/२०२५ रोजी अर्जातील मिळकती संबंधाने यांनी त्यांचे हयातीत मृत्यूपत्राचा दस्त त्याबाबत लिहून ठेवलेला आहे. सुधामती श्रीरंग जाधव हे दि.१३/०९/२०२५ रोजी रातंजन, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झाली आहे. मयत सुधामती श्रीरंग जाधव यांचा सांभाळ सेवाशुश्रुषा अर्जदार हेच करत होते. त्यामुळे त्यांना अर्जदाराविषयी प्रेम, लळा उत्पन्न झाला व त्यातून त्यांनी अर्जदाराचे नांवे मृत्यूपत्र करुन ठेवले सदर सुधामती श्रीरंग जाधव हे मयत झालेवर अर्जदाराने मृत्यूपत्राने नोंद लावणेकरीता विनंती केली असता संबंधीत अधिकारी यांनी दिवाणी न्यायालयातून मृत्यूपत्र प्रोबेट करुन आणा असे सांगीतले मयत सुधामती श्रीरंग जाधव यांनी अर्जदाराचे हक्कात अर्जातील मिळकती संबंधाने करुन ठेवलेले मृत्यूपत्राचे प्रोबेट अर्जदाराचे नांवे मिळावे अथवा लेटर्स ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन मिळावे असे कथन करुन अर्जदाराने प्रस्तुत अर्ज आणला आहे. त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात कांही दस्त असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत वा प्रकरणी पुढील नेमले तारीख ०१/०९/२०२६ रोजी . कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात, मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.
तारीख : २०/०६/२०२६

| सही/- वरिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी | (कोर्टाचा शिक्का) | सही/- सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर,बार्शी |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

नि.दि. अपील. नं. १४७/२०१८
निशाण क्र. ३७

### सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो यांचे न्यायालयात

**(मा.श्री. पी.पी. राजवैद्य साहेब)**

**भगवान गोपाळ सुतार, वगैरे ५** - **अपेलंट**
विरुध्द
**भागाबाई मारुती सुतार, वगैरे ४** - **रिस्पॉंडंट**
प्रति -
**३अ) नागर कुबेर लोखंडे,**
रा. आष्टी, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
**४ड) प्रमिला अक्षय मानुके,**
रा. कोर्टी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

ज्याअर्थी उपरोक्त अपेलंट यांनी या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. तुम्हाला याद्वारे ताकीद देण्यात येत आहे की, सदर अपीलाचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. ३१/०७/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे.

सदर नोटीस प्रसिद्ध होऊनही आपण गैरहजर राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी. हे जाहीर नोटीस आज रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.

| सही/- लिपिक | (कोर्टाचा शिक्का) | सही/- अधिक्षक जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर. |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे भोईंजे, ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी. सोलापूर सब. डी. व ता. बार्शीपैकी मौजे भोईजे हद्दीतील जमीन ग. नं. ७३/१ याचे क्षेत्र ०० हे. ९८ आर. याचा आकार ०३ रु. ९६ पैसे येणेप्रमाणे वर्णनाची खुली जमीन ही गंगुबाई लक्ष्मण घोंगडे, श्री. विजयकुमार लक्ष्मण घोंगडे व श्री. बाळासाहेब लक्ष्मण घोंगडे यांचे मालकीची असुन हक्कपत्रकी त्यांचे नाव दाखल आहे. सदरची मिळकत ही आमचे पक्षकारांनी गंगुबाई लक्ष्मण घोंगडे, श्री. विजयकुमार लक्ष्मण घोंगडे व श्री. बाळासाहेब लक्ष्मण घोंगडे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा खरेदी देणार यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. आमचे पक्षकार यांनी सदर जागेची बाजार भावाने होणारी योग्य ती किंमत देऊन खरेदी घेण्याचे ठरविले असुन तसा करार खरेदी देणार व आमचे पक्षकार यांचे दरम्यान झालेला आहे. तरीदेखील वर नमुद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास उदा. साठे-करार, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, पोटगीहक्क, वारसाहक्क, फेडपत्र, भाडेपट्टा, टाच, बोजा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्याची शाबिती संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसात कागदपत्रानिशी आमचे ऑफीसमध्ये येऊन तशी आमच्या पक्षकाराची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असुन सदर मिळकतीशी कोणाचाही कसलाही कायदेशीर हक्क-हितसंबंध नाही, व असल्यास त्याने तो स्वतः होऊन सोडून दिलेला आहे असे समजुन खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून कोणाचीही, कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. मुदतबाह्य तक्रारींचा विचार केला जाणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सर्वांच्या माहितीकरिता हे जाहिर प्रसिध्दिकरण केले असे. ता. २३/०६/२०२६.

सही/-
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**'रघु-कुल', कर्मवीर नगर,**
**पाटील प्लॉट,बार्शी - ४१३४११**
**मो.न. ९८२२०६५६६१**

## जाहीर समन्स

रे.मु.नं. ५४५/२०१७
पुढील नेमलेली तारीख ३०/०७/२०२६ नि.३७

### माढा येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. साहेब यांचे न्यायालयात

**मंदोदरी भिका थोरात, वगैरे** - **वादी**
विरूध्द
**सौ. मनिषा भागवत भोसले, वगैरे** - **प्रतिवादी**

ज्याअर्थी, यातील वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द ठराव होवून वाटप कब्जा निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे, रा. घोटी (मा)(बेंबळे), ता. माढा, जि. सोलापूर यांना त्यांचे दाव्यातील पत्त्यावर अनेकवेळा समन्स काढून प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे हा दाव्यातील नमूद पत्त्यावर आढळून येत नाही. त्याबाबत कोणीही काहीही माहिती देत नाही, व त्याबाबत कोणासही काहीही माहिती नाही, असा बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे यांचा कायमचा पत्ता दाव्यातील नमूद पत्त्याशिवाय वादीकडे नाही.

त्या अर्थी तरी प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे यांना या जाहीर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, हि जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अथवा पुढील नेमलेली तारीख दि. ३०/०७/२०२६ रोजी नेमलेल्या तारखेस सदर दाव्यात प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे त्याचे प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता दाव्यात हजर करावा. वरीलप्रमाणे प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे यांनी सदर दाव्यात हजर न झाल्यास वादीच्या दाव्यातील मागणीप्रमाणे प्रतिवादी नं. ४ दगडू रामा कांबळे यांचे विरोधात वादीच्या हक्कात सदर दाव्याचा हुकूम होईल. कळावे याची नोंद घ्यावी. हे जाहीर नोटीस/समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. १८/०६/२०२६

| सही/- कनिष्ट लिपीक मे.सि.ज.ज्यु.डि. माढा | (कोर्टाचा शिक्का) | सही/- सहा. अधिक्षक मे.सि.ज.ज्यु.डि. माढा |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १११/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. जहाँआरा अ.अजीज महेदवी** - **अर्जदार**
रा. वार्ड नं. २५, १०५२/३/२, शहापूर रोड,
तोरणा नगर ता. इचलकरंजी
(असल्यास, तर्फे वकील महमद ए. लांडगे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. वार्ड नं. २५, १०५२/३/२, शहापूर रोड, तोरणा नगर ता. इचलकरंजी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी ता. बार्शी, जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १० जून २०२६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १० जून २०२६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११ जून २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(शिक्का)
सही/-
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विशेषतः मौजे लिंबी चिंचोळी ग्रामपंचायत व तालुका दक्षिण सोलापूर येथील लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी, तालुका दक्षिण सोलापूर पैकी, तालुका पंचायत समिती दक्षिण सोलापूर, मौजे लिंबी चिंचोळी ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन गट क्र. ४१/१ यापैकी पश्चिम बाजूची बागायत शेतजमीन क्षेत्र ० हे. ६७ आर, आकार ०.८७ रुपये.पैसे असे वर्णनाची बागायत शेतजमीन. उत्तर दिशेस ७ फूट रुंदीचा सामाईक रस्त्यासह. चतुःसीमा खालीलप्रमाणेः पूर्वेस : गट नंबर ४१/२ब, पश्चिमेस : तलाव, उत्तरेस : गट नंबर ४७ व ४८, दक्षिणेस : गट नंबर ४०अ

वर नमूद केलेली शेतजमिन ही रिना महावीर गांधी यांचे खरेदी मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणीचे निरसन करण्याकरिता सदर शेतजमीन आमचे अशिलांना कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरवून आमच्या अशिलांकडून इसारा रक्कम स्विकारून तसा इसारा पावती व करारपत्र लिहून दिले आहेत. तसेच सदर शेतजमीन निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद शेतजमीनीवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, पोटगी, टाच, सरकारी व निम सरकारी बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा असल्यास किंवा दान, बक्षीस, वहिवाट, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यू पत्र, वारसपत्र, अधिकारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क दिल्यास किंवा हस्तांन्तरण केले असल्यास अथवा सदर शेतजमीनीबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्रांनिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची शेतजमीन ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीप्रूव जाहीर नोटीस प्रसिद्ध केली.

सदरची खरेदीपुर्वजाहीर नोटीस दिली. तारीखः २३/०६/२०२६

सही/-
**ॲड. राजशेखर भिमाशंकर कोरे**
**बी.ए., एलएल.एम., जीडीआी ॲन्ड ए**
**ॲड. आकाश म. कळकिळे**
**मु.पो. कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर,**
**जि.सोलापूर मो.नं.९८२२९८९७०८**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माझे अशील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, शेळगी हे खालील वर्णन केलेली मालमत्ता खरेदी करीत आहेत.

**मालमत्तेचे वर्णन** :- गट नं. १३०/२/अ, क्षेत्रफळ ०.४७ आर पैकी, ०.१८ आर व १३०/२/ब, क्षेत्रफळ ०.०५ आर मौजे मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांच्या हद्दीतील मालमत्ता, सध्या श्री./सौ. सिध्देश्वर बसप्पा म्हेत्रे, अरविंद बसप्पा म्हेत्रे, देवयानी दरेप्पा माळी, कन्याकुमारी मलकारी कोरे, सीमा गुरुराज नंदनगी, धनंजय सिध्देश्वर मेहेत्रे यांचे मालकीची सामाईक क्षेत्र आहे.

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा हक्क, हितसंबंध, ताबा, गहाण, बोजा, करार, वारसा हक्क, न्यायालयीन वाद, जप्ती आदेश अथवा इतर कोणताही दावा असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रकाशन दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यांकडे आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात कळवावे. निर्धारित मुदतीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नसल्याचे गृहीत धरून माझे अशील सदर मालमत्तेची खरेदी प्रक्रिया पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्याची जबाबदारी स्वीकारली जाणार नाही.

**दिनांक : २४/०६/२०२६**
**ठिकाण : सोलापूर**

सही/-
**ॲड. अश्विनी तारे**
**मो.बा. :- ९७६४६५५६९९ / ९६३७८५६१००**
**पत्ता :- प्लॉट नंबर ९४/९६ मित्र नगर,**
**रब्बी रिसर्च सेंटरजवळ शेळगी सोलापूर -४१३००६**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १०८/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. सलीम महामुद बाबुडे** - **अर्जदार**
**रा. एकविराई मंदिराजवळ,**
**परंडा रोड, बार्शी ता. बार्शी**
**(असल्यास, तर्फे वकील सारीका कोकाटे)**
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. एकविराई मंदिराजवळ, परंडा रोड, बार्शी ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी, ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १६ मार्च १९६२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १६ मार्च १९६२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११ जून २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(शिक्का)
सही/-
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

# प्राचार्य सीताराम गोसावी यांचे निधन

**सोलापूर, दि. २३ जून-**

रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य सीताराम गोसावी (वय ७०) यांचे मंगळवारी सकाळी ११:३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बारामती येथे निधन झाले.



त्यांच्या इच्छेनुसार त्यांनी मरणोत्तर देहदान केले त्यांच्या पश्चात पत्नी प्राध्यापिका सीमा, दोन मुले, सुना, तीन मुली नात नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी औंध, सोलापूर, शिरवळ व पंढरपूर येथील महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्य केले. अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी बरेच वर्ष काम पाहिले. त्यांनी आपल्या कार्यकाळात वंचित व उपेक्षित समाजातील विद्यार्थिनींना शैक्षणिक प्रोत्साहन दिले. महाविद्यालयात अनेक उपक्रम राबविले राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित केल्या सोलापुरातील शहर वस्तीपासून ते खेड्यापाड्यापर्यंत त्यांनी पुरोगामी चळवळीवर व्याख्याने दिली. मराठीचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती होती. अनेक परिषदांमधून संसाधन व्यक्ती म्हणून त्यांनी व्याख्याने दिली. महाराष्ट्रातील सर्व साहित्यिक त्यांना जवळून ओळखत होते. सम्राट चौकातील रयत शिक्षण संकुलातून त्यांनी मोदीखाना येथे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय संस्थेच्या आदेशानुसार स्थलांतरित केले. त्यांच्या निधनामुळे पुरोगामी चळवळीचे हानी झाली आहे अशी सुमनांजली रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील यांनी व्यक्त केली

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**दगडी खडी/ट्रॅक दुरुस्तीचे काम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक: 05-2026-DEN-Tr कामाचे नाव: ओसा (जड) डेपो येथे साइटवर एडेन (DEN) यांच्या निर्देशानुसार रेल्वेच्या जागेवर नवीनतम सुधारणांसह फेब्रुवारी-2023 च्या आरडीएसओ/एलकेओ (RDSO/LKO) च्या अद्ययावत तपशिलानुसार 65 मिमी मशीनने क्रश केलेली दगडी खडी पुरवणे आणि ढीग करणे, ज्यामध्ये रॉयल्टी आणि फी इत्यादींचा समावेश आहे आणि तीच खडी रेल्वे हॉपर्स/वॅगन्स इत्यादींमध्ये भरणे (एकूण 30,000 घनमीटर). कामाची अंदाजित किंमत: रुपये 3,23,40,000.00 इसारा रक्कम (Earnest Money): रुपये 6,46,800.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 18 महिने देखभाल कालावधी: काहीही नाही निविदा सूचना क्रमांक: 06-2026-DEN-Tr कामाचे नाव: डीईएन (ट्रॅक) सोलापूर (DEN (Track) SUR) यांच्या अधिकारक्षेत्रांतर्गत रेल्वे ट्रॅकच्या अलाइनमेंट दुरुस्तीसाठी प्रिझम गेडो ट्रॉली (Prism GEDO TROLLY) सर्वेक्षण. कामाची अंदाजित किंमत: रुपये १,८३,८२,६७९.०० इसारा रक्कम: रुपये 3,67,700.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 24 महिने देखभाल कालावधी: काहीही नाही www.ireps.gov.in या संकेतस्थळावर कोट केलेली निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: निविदा 05-2026-DEN-Tr आणि 06-2026-DEN-Tr साठी 10.07.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: निविदा 05-2026-DEN-Tr आणि 06-2026-DEN-Tr साठी 10.07.2026 रोजी दुपारी 15.30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in.

ANJ-22 — विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर (पायरीवर) प्रवास करणे टाळा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**इमारती आणि निवासस्थानांची दुरुस्ती**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक: 14-2026-SrDENC कामाचे नाव: एडेन/बीजी/कुर्डूवाडी (DEN/BG/KWV) उपविभागांतर्गत बार्शी ते कुर्डूवाडी (BRB to KWV) विभागातील कर्मचारी निवासस्थानांची दुरुस्ती. कामाची अंदाजित किंमत: रुपये 29999998.71. इसारा रक्कम (Earnest Money): रुपये 600000.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 12 महिने. निविदा सूचना क्रमांक: 15-2026-SrDENC कामाचे नाव: सिनीयर एडेन/उत्तर/सोलापूर (Sr DEN/N/SUR) अंतर्गत मुकुंदवाडी रोड (चघझढ), आक्कलकोट रोड (G), वाघोली (WK), माढा (M) आणि वाडीस (WDS) स्थानकांवरील सेवा इमारती आणि निवासस्थानांची सुधारणा व दुरुस्ती. कामाची अंदाजित किंमत: रुपये 24424884.32. इसारा रक्कम: रुपये 488500.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 12 महिने. www.ireps.gov.ळप या संकेतस्थळावर कोट केलेली निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 02/07/2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 02/07/2026 रोजी दुपारी 15.30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

ANJ-21 — विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर (पायरीवर) प्रवास करणे टाळा

# महाराष्ट्रातील वाढत्या सायबर गुन्ह्यांवर लगाम घाला : पै.माऊली हेगडे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजना राबवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते पै.माऊली हेगडे यांनी मुख्यमंत्री सचिवालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे आर्थिक फसवणूक, ओळख चोरी (आयडेंटिटी थेफ्ट), महिलांवरील व बालकांवरील ऑनलाइन गुन्हे तसेच सायबर दहशतवादासारख्या गंभीर प्रकारांमध्ये वाढ होत आहे. बँक अधिकारी असल्याचे भासवून फोन करणे, यूपीआय, गुगल पे, फोन पे यांसारख्या माध्यमांतून पैसे पाठविण्यास प्रवृत्त करणे, बनावट संदेशांच्या माध्यमातून गोपनीय माहिती मिळवणे आणि विविध आमिषे दाखवून नागरिकांची फसवणूक करणे, असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांचे आर्थिक व वैयक्तिक नुकसान होत असल्याने शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर व तालुका तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे पानगांव येथील शेतजमीन ग.नं. १११५/२ चे एकूण क्षेत्र ४ हे. ४३ आर पैकी ०१ हे.०४ आर आकार रु. २.१७ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - बाबुराव गाडे यांची जमीन, दक्षिणेस - भगवान कानगुडे यांची जमीन, पश्चिमेस कॅनॉल, उत्तरेस - दिगंबर कानगुडे यांची जमीन येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक जागा आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे वापराचे हक्कासह जागा.

वर क्र. १ मध्ये नमूद मिळकत ही आनंद दत्तात्रय कानगुडे, रा. पानगांव, ता. बार्शी यांचे मालकीची आहे. सदर आनंद दत्तात्रय कानगुडे यांनी वर नमूद मिळकत गाई-म्हशी खरेदी करणेसाठी आमचे अशिल सांगली अर्बन को. ऑप बँक लि. शाखा बार्शी यांचेकडे कर्ज मागणी केली असून त्याना रुपये १०,००,०००/- चे कर्ज आमचे अशिल बँकेने मंजूर केलेले आहे. सदर कर्जाकरीता आनंद दत्तात्रय कानगुडें यांनी कर्जदार म्हणून त्यांची वर नमूद मिळकत आमचे अशिल बँकेचे हक्कात गहाण तारण देण्याचे मान्य केले असून तसा दस्त नोंदवून देणेचेही त्यांनी कबुल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा त्यांनी आमचे अशिल बँकेस दिलेला असून सदर मिळकत अन्य कोणत्याही बँकेकडे अगर वित्तीय संस्थेकडे गहाण तारण दिलेली नाही, कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाहीत अशीही ग्वाही त्यांनी दिलेली आहे. तरी या जाहीर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा व हस्तांतर अगर कर्जबोजाचे हक्क अधिकार असल्यास संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन आमची खातरजमा करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होवू नये व आमचे अशिलाचे हक्काची सर्वत्रास जाणीव व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.२३/०६/२०२६

सही/-
**ॲड. श्री. प्रसाद जे. कुलकर्णी**
**बी.एस.एल., एलएल.एम.**
**लक्ष्मीनृसिंह, कासारवाडी रोड,**
**सिध्देश्वरनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे पॅनल ॲडव्होकेट**

## IN THE COURT OF ADDL. CIVIL JUDGE INDI,AT: INDI

F.D.P. NO: 20/2025

**Kumar. Amul S/o Suresh Helawar and Others** .... **Petitioners**
V/s
**Shri. Suresh S/o Basavaraj Helawar and Another** .... **Respondents**

**SUMMONS TO RESPONDENT NO 1 AND 2**

| | |
|---|---|
| Respondent No.1 | Shri. Suresh S/o Basavaraj Helwar Age: 42 Yrs Occ: Coolie R/o, Solapur kumata Naka metre vasti Shivanganga Nagar bag 5 Solapur Tq: and Dist: Solapur |
| Respondent No.2 | Shri. Ramesh S/o Basavaraj Helwar Age: 45 Yrs Occ: Coolie R/o, Solapur kumata Naka metre vasti Shivanganga Nagar bag 5 Solapur Tq: and Dist: Solapur |

**SUMMONS U/s 5 RULE 20(1A) OF C.P.C.**

Whereas the above named Petitioners had instituted a suit against you in the above said court. You are hereby summoned to appear in this court either in person or through Advocate duly instructed by you on the date of 02/08/2026 in the forenoon 10:30 Am to answer the claim and you are directed to produce on day all the documents upon which you intend to rely in support of your defense.Take summons that in default of your appearance on the day fixed your appearance in above mentioned suit will be heard and determined in your absence.Given under my hand and seal of the court on 18/06/2026 this day.

Advocate for the Plaintiff.
D.S. Madiavalakar
**sd/-**
**Shirastadar (Adm)**
**Civil Judge INDI**

(Seal)

**sd/-**
**Shirastadar (Adm)**
**Civil Judge (Jr-Dn)**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### द सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड**, जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास ते अपयशी ठरल्यामुळे आणि खात्यांमध्ये अनियमितता झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने त्यांची कर्ज खाती एनपीए (थकबाकी खाते) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेल्या रकमा खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित जारी केलेल्या नोटिसींनुसार आहेत. तसेच सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील दरानुसार आकारले जाईल..

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 157051446 | मालमत्तेवर कर्ज | १. रूपाली सुधाकर सावंत (कै. सुधाकर महादेव सावंत यांच्या उपलब्ध कायदेशीर वारसदार म्हणून) २. रूपाली सुधाकर सावंत | 27/05/2026 | INR 9,01,139.91/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मौजे दसूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर, महाराष्ट्र - ४१३११३ येथे स्थित, ग्रामपंचायत मिळकत क्र. २३८ मधील निवासी घर, ज्याचे क्षेत्रफळ १०५०.०० चौ. फूट (३०X३५) आणि ६०० चौ. फूट क्षेत्रफळाची मोकळी जागा (बाखळ), म्हणजेच एकूण क्षेत्रफळ १६५०.०० चौ. फूट असलेली संपूर्ण मालमत्ता. सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेतः पूर्वः किसन लोंढे, पश्चिमः पांडुरंग शिंदे, उत्तरः शासनाची मोकळी जागा, दक्षिणः रस्ता | | | | | |
| 2 | 161918279 | मालमत्तेवर कर्ज | १. दीपक नारायण रायते २. वैशाली दीपक रायते | 16/05/2026 | INR 10,88,707.29/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मौजे गुरसाळे, ता. माळशिरस, जि. सोलापूर, महाराष्ट्र येथे स्थित, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४५८ मधील निवासी घर, ज्याचे क्षेत्रफळ १०५०.०० चौ. फूट (३५X३०) आणि ३८२५.०० चौ. फूट (४५X८५) क्षेत्रफळाची मोकळी जागा असलेली संपूर्ण मालमत्ता. सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेतः पूर्वः रस्ता, पश्चिमः रवींद्र नारायण रायते. उत्तरः प्रमोद पोपट रायते, दक्षिणः गोपाळ शंकर रायते | | | | | |

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**दिनांक : 24/06/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**




# मेस्सीने घडविला इतिहास

## विश्वचषकात सर्वाधिक १७ गोल करण्याचा पराक्रम


अर्लिंग्टन येथे अर्जेंटिना आणि ऑस्ट्रिया यांच्यात झालेल्या विश्वचषक गट 'जे' फुटबॉल सामन्यानंतर मैदानाबाहेर पडताना अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी

**डॅलस, २३ जून**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत विश्वविजेत्या अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीने आणखी एक विश्वविक्रम केला, बुधवारी ३९ वर्षांचा होणाऱ्या स्टार खेळाडू मेस्सीने ऑस्ट्रीयाविरुद्धच्या साखळी सामन्यात पहिला गोल करत विश्वचषकातील सर्वाधिक गोल (१७ गोल) करण्याचा विक्रम आपल्या नावे केला. ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीने दोन गोल करत गतविजेत्या अर्जेंटिनाला 'अंतिम ३२'च्या फेरीत पोहोचवले.

अर्जेंटिनासाठी लिओनेल मेस्सीची सुरुवातीची पेनल्टी हुकली; चेंडू गोलपोस्टच्या बाहेर गेला.

मेस्सीने ९५ व्या मिनिटाला स्पर्धेतील आपला १८ वा गोल करत 'ग्रुप जे' मधील सामन्याचा निकाल निश्चित केला. या विजयामुळे गतविजेता अर्जेंटिना संघ अंतिम ३२ संघांच्या फेरीत पोहोचला, तर ऑस्ट्रियाचे गुण तीनवरच राहिले

मेस्सीने स्पर्धेतील आपले १७ वे आणि १८ वे गोल नोंदवले. यासह त्याने जर्मनीचा स्ट्रायकर मिरोस्लाव क्लोस याच्यापेक्षा दोन गोलची आघाडी घेतली. क्लोसने २००२ ते २०१४ दरम्यान गोल केले होते.

सामन्याच्या ३८ व्या मिनिटाला मेस्सीने हा ऐतिहासिक टप्पा गाठला. फॅकुन्डो मेडिनाने मागे पाठवलेला चेंडू थियागो अल्माडाने हुशारीने आपल्या पायाखालून जाऊ दिला आणि मेस्सीसाठी संधी निर्माण केली; मेस्सीने पेनॉल्टी क्षेत्राच्या आतून चेंडूला थेट गोलपोस्टमध्ये धाडले.

या स्टार फॉरवर्ड खेळाडूचा दुसरा गोल उत्तरार्धातील 'स्टॉपेज टाइम'मध्ये झाला. ज्युलियन अल्वारेझचा प्रयत्न गोलरक्षक अलेक्झांडर श्लागरने रोखल्यानंतर, मेस्सीने दोन ऑस्ट्रियन बचावपटूंना चकवून अत्यंत कठीण कोनातून गोल केला.

तथापि, मेस्सी सामन्यात याआधीच विक्रम मोडू शकला असता. सामना सुरू झाल्यानंतर अवघ्या आठ मिनिटांत, लाउटारो मार्टिनेझवर स्टीफन पोशने फाऊल केल्यामुळे अर्जेंटिनाला पेनॉल्टी मिळाली,प रंतु मेस्सीचा 'स्पॉट-किक'चा फटका गोलपोस्टच्या बाहेर गेला.

मात्र, पुढे त्याने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत त्या निराशाजनक क्षणाचे रूपांतर लवकरच आनंदात केले.

गटातील पहिल्या सामन्यात अल्जेरियाविरुद्ध ३-० अशा विजयात हॅट्‌ ट्रिक केल्यानंतर, आता दोन सामन्यांत पाच गोलसह तो २०२६ च्या स्पर्धेत सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला आहे.

मेस्सीच्या दुसऱ्या गोलपूर्वी, राल्फ रँगनिक यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या ऑस्ट्रिया संघाला सामना १-१ असा बरोबरीत आणण्याची संधी मिळाली होती. पण अॅस्टन व्हिलाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझने मार्सेल सबित्झरची जोरदार 'फ्री-किक' रोखून धरली. सहा गुणांसह अर्जेंटिना आता अंतिम ३२ संघांची फेरीसाठी पात्र ठरलेल्या मेक्सिको, अमेरिका आणि जर्मनीच्या पंक्तीत सहभागी झाला आहे; तसेच, जर जॉर्डनने नंतर होणाऱ्या सामन्यात अल्जेरियाचा पराभव केला नाही, तर अर्जेंटिना 'गट जे' मधील विजेता म्हणून निश्चित होईल. आपल्या सलामीच्या सामन्यात जॉर्डनवर विजय मिळवल्यामुळे, ऑस्ट्रिया तीन गुणांसह अजूनही स्पर्धेत टिकून आहे. (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**स्वित्झर्लंड विरुद्ध कॅनडा**
वेळ : बुधवारी मध्य रात्री १२:३०
स्थळ : बीसी प्लेस, व्हँकुव्हर

**कतार वि. बोस्निया अॅण्ड हर्झगोव्हिना**
वेळ : बुधवारी १२:३० वाजतापासून
स्थळ : लुमेन फील्ड, सिएटल

**मोरोक्को वि. हैती**
वेळ : गुरुवारी पहाटे ३:३० वाजतापासून
स्थळ : मर्सिडीज-बेन्झ स्टेडियम, अटलांटा

**स्कॉटलंड वि. ब्राझील**
वेळ : गुरुवारी पहाटे ३:३० वाजतापासून
स्थळ : हार्ड रॉक स्टेडियम, मियामी

**दक्षिण आफ्रिका वि. दक्षिण कोरिया**
वेळ : गुरुवारी सकाळी ६:३० वाजतापासून
स्थळ : एस्तादियो बीबीव्हीए, मॉन्टेरी

**झेक प्रजासत्ताक वि. मेक्सिको**
वेळ : गुरुवारी सकाळी ६:३० वाजतापासून
स्थळ : एस्तादियो अझ्टेका, मेक्सिको सिटी

**थेट प्रसारण :**
**युनाईट८ वर (झी५)**

# सेनेगलला ३-२ ने हरवून नॉर्वे अंतिम ३२ च्या फेरीत

### एर्लिंग हालंडचे दोन गोल


सेनेगलविरुद्धच्या विश्वचषक गट 'आय'च्या फुटबॉल सामन्यादरम्यान चेंडूवर नियंत्रण राखताना नॉर्वेचा एर्लिंग हॅलंड

**न्यू जर्सी, २३ जून**

एर्लिंग हालंडने विश्वचषकात सलग दुसऱ्यांदा दोन गोल करत नॉर्वेला न्यूयॉर्क न्यू जर्सी स्टेडियमवर सेनेगलवर ३-२ ने विजय मिळवून दिला आणि अंतिम ३२ मध्ये आपले स्थान निश्चित केले.

गट 'आय'च्या या सामन्यात नॉर्वेचा बदली खेळाडू मार्कस होल्मग्रेन पेडरसनने पूर्वार्धाच्या अखेरीस गोल केला, त्यानंतर मध्यंतरानंतर लगेचच हालंडने आघाडी दुप्पट केली.

इस्माईला सारने सेनेगलसाठी पिछाडी कमी केली, पण त्यांच्या ढिसाळ बचावाचा फायदा घेत हालंडने गोल केला आणि सारने अखेरच्या क्षणी एक सांत्वनपर गोल करूनही नॉर्वेने एक सामना शिल्लक असतानाच बाद फेरीत प्रवेश केला. मँचेस्टर सिटीचा आक्रमक खेळाडू हालंडने आता या स्पर्धेत दोन सामन्यांत चार गोल केले आहेत. यापूर्वीच लिओनेल मेस्सीने दोन गोल करत विश्वचषकात विक्रमी १८ गोल पूर्ण केले होते. मागे न राहता, किलियन एमबाप्पेनेही दोन गोल करत फ्रान्सला इराकवर ३-० ने विजय मिळवून दिला.

(वृत्तसंस्था)

# अल्जेरियाची जोरदार मुसंडी; जॉर्डन बाहेर


विजयी गोल केल्याचा आनंद साजरा करताना अल्जेरियाचा अमीन गुइरी

**सॅन फ्रान्सिस्को, २३ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत गट 'जे' मधील सामन्यात पिछाडीवर राहिल्यानंतर अल्जेरियाने उत्तरार्धात जोरदार मुसंडी मारत जॉर्डनवर २-१ असा विजय नोंदवून स्पर्धेच्या अंतिम ३२ संघांच्या फेरीत स्थान मिळविले व याचबरोबरच जॉर्डनला विश्वचषकाच्या शर्यतीतून बाहेर केले. विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या जॉर्डनचे आव्हान एका सामना शिल्लक असतानाच संपुष्टात आले.

या सामन्यात पूर्वार्धात निझार अल-रशदानने ३६ व्या मिनिटाला केलेल्या गोलला बेनबुआलीने 'हेडर'द्वारे ६९ व्या मिनिटाला उत्तर दिले. त्यानंतर, सामना संपण्यास आठ मिनिटे बाकी असताना गोल-पोस्टसमोर झालेल्या गोंधळाचा फायदा घेत गुइरीने ८२ व्या मिनिटाला गोल केला आणि अल्जेरियाच्या मोहिमेला पुन्हा संजीवनी दिली; याआधी त्यांना अर्जेंटनाकडून ३-० असा पराभव पत्करावा लागला होता.

(वृत्तसंस्था)

# एमबाप्पेच्या दोन गोलमुळे फ्रान्स बाद फेरीत

### इराकवर ३-० ने विजय


इराकविरुद्धच्या सामन्यात पहिला गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना फ्रान्सचा किलियन एमबाप्पे (१०)

**फिलाडेल्फिया, २३ जून**

फिफा २०२६ विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आय गटातील सामन्यात किलियन एमबाप्पेने नोंदविलेल्या दोन गोलच्या बळावर माजी विजेत्या फ्रान्सने इराकवर सरळ ३-० ने विजय नोंदविला. या विजयामुळे स्पर्धेतील एक सामना शिल्लक असतानाच फ्रान्सने विश्वचषकाच्या अंतिम ३२ संघांच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.

सेनेगलविरुद्धच्या सुरुवातीच्या विजयानंतर, या सामन्यातील विजयाने पात्रता निश्चित होईल हे जाणूनच दिदिएर देशॉम्प्स यांचा संघ मैदानात उतरला होता. त्यांनी अत्यंत सहजतेने आणि प्रभावीपणे खेळ करत, केवळ जिद्दी प्रतिस्पर्ध्यांवरच नव्हे तर निसर्गाच्या अडथळ्यांवरही मात केली आणि स्पर्धेतील आपली विजयी घोडदौड कायम राखली.

या सामन्यात पुन्हा एकदा किलियन एमबाप्पेच आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरला. फ्रान्सच्या या कर्णधाराने मध्यंतराच्या आधी १४ व्या मिनिटाला आणि नंतर ५४ व्या मिनिटाला गोल करत स्पर्धेतील आपली एकूण गोलसंख्या चारवर नेली. जागतिक फुटबॉलमधील सर्वात धोकादायक 'आक्रमक खेळाडू' म्हणून तो का ओळखला जातो, हे त्याने पुन्हा एकदा सिद्ध केले. उस्मान डेम्बेलेसाठीही हा सामना वैयक्तिक यशाचा आणि स्वतःला सिद्ध करण्याचा ठरला. विश्वचषक आणि युरोपियन चॅम्पियनशिप मिळून आपल्या २० व्या सामन्यात त्याने ६६ व्या मिनिटाला पहिल्यांदाच गोलची नोंद केली.

मेस्सी जी कामगिरी करत आहे, त्याच्या बरोबरीला राहण्यासाठी मला आणखी चांगली कामगिरी करावी लागेल, असे अर्जेंटिनाच्या एमबाप्पे मेस्सीच्या शानदार कामगिरीबद्दल म्हणाला. (वृत्तसंस्था)

# इंग्लंड दौऱ्यासाठी नितीश रेड्डीच्या जागी सूर्यांश शेडगे

**नवी दिल्ली, २३ जून**

आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या आगामी टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकांसाठी भारताच्या संघात दुखापतग्रस्त अष्टपैलू खेळाडू नितीश रेड्डीच्या जागी आश्वासक खेळाडू सूर्यांश शेडगेची निवड करण्यात आली आहे. असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मंगळवारी जाहीर केले.

यापूर्वी, अफगाणिस्तान विरुद्धच्या अलीकडील एकदिवसीय मालिकेत पायाच्या दुखापतीमुळे रेड्डी इंग्लंड दौऱ्यातून बाहेर पडल्याने भारताला मोठा धक्का बसला होता.

राष्ट्रीय निवड समितीने आयर्लंड व इंग्लंडविरुद्धच्या आगामी टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकांसाठी भारताच्या संघात नितीश कुमार रेड्डीच्या जागी सूर्यांश शेडगेची निवड केली आहे. २० जून रोजी अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर रेड्डीला डाव्या मांडीच्या स्नायूंमध्ये अस्वस्थता जाणवली. त्यानंतरच्या वैद्यकीय तपासणीनंतर,


सूर्यांश शेडगे

बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याला पुनर्वसन प्रक्रियेतून जाण्याचा सल्ला दिला आहे, त्यामुळे तो दोन्ही टी-२० मालिकांमधून बाहेर पडला आहे.

श्रीलंकेत नुकत्याच पार पडलेल्या तिरंगी मालिकेत 'भारत अ' संघासाठी केलेल्या दमदार कामगिरीनंतर शेडगेला संघात बोलावण्यात आले. मधल्या फळीत फलंदाजी करताना, या २३ वर्षीय खेळाडूने पाच सामन्यांत १४७ धावा केल्या आणि संपूर्ण स्पर्धेत २३ षटके गोलंदाजी करून संघाला योगदान दिले.

२०२४-२५ च्या सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धेत मुंबईच्या विजेतेपदाच्या मोहिमेतही तो उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी एक होता; त्याने तळाच्या-मधल्या फळीत २५१.९२ च्या स्ट्राईक रेटने १३१ धावा केल्या होत्या.

हार्दिक पांड्याच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठीही रेड्डीची निवड करण्यात आली होती; पांड्यालाही मांडीच्या स्नायूंची किरकोळ दुखापत झाली असून तो एकदिवसीय सामन्यांमध्ये १० षटके गोलंदाजी करण्याच्या स्थितीत नाही.

नितीश कुमार रेड्डी आयर्लंड मालिकेसाठी उपलब्ध नसेल. एमआरआय तपासणीत डाव्या मांडीच्या स्नायूंमध्ये सूज आणि तंतूंची हानी झाल्याचे दिसून आले आहे.

पुढील तपासणीसाठी त्याला 'सीओई' मध्ये हजर राहण्यास सांगण्यात आले आहे, असे वैद्यकीय अहवालात नमूद केले आहे.

रेड्डीला त्याचे पुनर्वसन पूर्ण करण्यासाठी किमान चार आठवडे लागतील व हा कालावधी वाढूही शकतो, असे समजते. या २३ वर्षीय खेळाडूने आतापर्यंत भारतासाठी १० कसोटी, ६ एकदिवसीय आणि ४ टी-२० सामने खेळले आहेत. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत त्याने दोन एकदिवसीय सामने खेळले होते, मात्र लखनौमधील दुसरा सामना त्याला मुकावा लागला होता.

त्यावेळी गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल यांनी दुखापत गंभीर नसल्याचे म्हटले होते, तरीही आता या दुखापतीने गंभीर वळण घेतले आहे.

(वृत्तसंस्था)




# इंग्लंड, वेस्ट इंडीजमध्ये अव्वल स्थानासाठी चुरस

**लंडन, २३ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गट २ मध्ये बुधवारी इंग्लंड आणि वेस्ट इडीज यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या दोन्ही प्रतिस्पर्धी संघांनी आपापली पहिले तीन सामने जिंकली असून त्यांचे प्रत्येकी ६ गुण आहे, मात्र सरस धावगतीच्या आधारावर इंग्लंड (२.४९०) गटात अव्वल स्थानी, तर वेस्ट इंडीज (०.६४४) दुसर्या स्थानावर आहे. या सामन्यात विजय नोंदविणारा संघ उपांत्य फेरीतील


नॅट सायव्हर-ब्रंट


हिली मॅथ्यूज

आपले स्थान निश्चित करेल.

गत सामन्यात वेस्ट इंडीजने श्रीलंकेवर ५ गड्यांनी विजय नोंदविला. या सामन्यात कर्णधार हिली मॅथ्यूजने आपल्या अष्टपैलू खेळाची चमक दाखविली. श्रीलंकेला ९८ धावांत गुंडाळताना मॅथ्यूजने ३ बळी टिपले व विजयाचे सोपे लक्ष्य गाठताना १७ धावा केल्या. श्रीलंकेविरुद्धच्या या विजयामुळे वेस्ट इंडीज संघाचा आत्मविश्वास बळावलेला असेल.तिकडे, नॅट सायव्हर-ब्रंटच्या नेतृत्वाखाली इंग्लंड संघाने गत सामन्यात स्कॉटलंडवर ३८ धावांनी विजय नोंदविला. इंग्लंडच्या ५ बाद २०० धवांना प्रत्युत्तर देताना स्कॉटलंडला ७ बाद १६२ धावांपर्यंतच मजल मारता आली. त्यामुळे आता वेस्ट इंडीजविरुद्ध खेळताना फलंदाज सोफिया डंकले, अॅली कॅपे, हीदर नाईट यांच्याकडून उत्तम कामगिरीची आशा आहे. तसेच गोलंदाज लॉरेन बेल, सोफिया एक्लेस्टोन, चार्ली डीन, डॅनी गिब्सन यांच्याकडून प्रभावी कामगिरी अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**इंग्लंड वि. वेस्ट इंडीज**
**वेळ :** रात्री ११.०० वाजतापासून
**स्थळ :** लॉर्डस, लंडन
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

# 'पत', 'धन' कपातीसह घरवापसी

**नवी दिल्ली, २३ जून**

लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार म्हणून दोन निराशाजनक हंगाम घालवल्यानंतर ऋषभ पंतने आपल्या मानधनात १२ कोटी रुपयांची मोठी कपात स्वीकारली आहे. मंगळवारी पूर्ण झालेल्या एका हाय-प्रोफाइल 'ट्रेड-ऑफ' (खेळाडूंची अदलाबदल) प्रक्रियेत पंत १५ कोटी रुपयांत 'दिल्ली कॅपिटल्स'मध्ये परतला. याआधी, आयपीएल २०२५ पूर्वीच्या 'मेगा लिलावात' लखनौने त्याला तब्बल २७ कोटी रुपयांना आपल्या संघात सामील करून घेतले होते., हे मानधन आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक मूल्य होते विशेष म्हणजे, लखनौ सुपर जायंट्सचे मालक संजीव गोएंका यांनी एकेकाळी पंतसोबतचा करार दीर्घकालीन असेल असा दावा केला होता; परंतु दोन निराशाजनक हंगामानंतर, लखनौच्या


ऋषभ पंत

मालकांनी या आक्रमक यष्टिरक्षक-फलंदाजाला करारमुक्त करण्याचा निर्णय घेतला. अपेक्षित अशा या अदलाबदल प्रक्रियेत, डावखुरा रिस्ट-स्पिनर कुलदीप यादव १३.५० कोटी रुपयांच्या आपल्या विद्यमान मानधनावर 'दिल्ली कॅपिटल्स'कडून लखनौ संघामध्ये गेला. पंत आता पुन्हा त्या फ्रँचायझीशी जोडला जाईल. (वृत्तसंस्था)

# जेम्स कोल्सची इंग्लंड संघात निवड

**लंडन, २३ जून**

इंग्लंडने भारताविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी १७ खेळाडूंचा मोठा संघ जाहीर केला आहे. ससेक्सचा अष्टपैलू खेळाडू जेम्स कोल्सची प्रथमच इंग्लंड संघात निवड करण्यात आली, परंतु उर्वरित संघ मार्चमधील टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारताकडून पराभूत झालेल्या संघासारखाच आहे. विश्वचषकात फारशी चांगली कामगिरी न होऊनही जोस बटलरने आपले स्थान कायम राखले आहे, तर ३६ वर्षीय लियाम डॉसनची संघात झालेली निवड ही आणखी एक उल्लेखनीय बाब आहे.

इंग्लंड टी-२० संघ : हॅरी ब्रूक (कर्णधार), रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, सोनी बेकर, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर (यष्टीरक्षक), जेम्स कोल्स, जॉर्डन कॉक्स, सॅम करन, लियाम डॉसन, विल जॅक्स, साकिब महमूद, आदिल रशीद, फिल सॉल्ट, जोश टॉंग, ल्यूक वुड.


जेम्स कोल्स

**टी-२० सामन्यांचे वेळापत्रक-**

१ जुलै- पहिला टी-२० सामना, चेस्टर-ले-स्ट्रीट. ४ जुलै - दुसरा टी-२० सामना, ओल्ड ट्रॅफर्ड. ७ जुलै - तिसरा टी-२० सामना, ट्रेंट ब्रिज ९ जुलै - चौथा टी-२० सामना, ब्रिस्टल. ११ जुलै - पाचवा टी-२० सामना, साऊदम्प्टन

(वृत्तसंस्था)

# न्यूझीलंडच्या उपांत्य फेरीच्या आशा जिवंत

**ब्रिस्टल, २३ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत आपले आव्हान टिकवून ठेवण्यासाठी न्यूझीलंडने अपेक्षेनुसार स्कॉटलंडवर सहा गडी राखून विजय मिळवला.

स्कॉटलंडला प्रथम फलंदाजीस आमंत्रित केल्यानंतर न्यूझीलंडने त्यांना ७ बाद १३१ धावांवर रोखले. 'नेट रन-रेट'चा विचार करता, हे लक्ष्य लवकरात लवकर गाठणे न्यूझीलंडसाठी महत्त्वाचे होते. न्यूझीलंडने विजयासाठी आवश्यक १३२ धावा १८.२ षटकांत ४ गडी गमावित पूर्ण केल्या.

स्कॉटलंडकडून सलामीवीर डार्सी कार्टरने तेवढी एकाकी झुंज देत ५२ चेंडूंत ८ चौकार व एका षकाराच्या मदतीने नाबाद ७२ धावांची खेळी केली. सारा ब्राईसने २५ धावांची भर घातली. स्कॉटलंडला १३१ धावांवर रोखताना मेली केरने ३ बळी, सोफिया डिव्हाईनने २ बळी, तर नेन्सी पटेल व ली ताहुहूने प्रत्येकी एक बळी टिपला.

न्यूझीलंडला विजय मिळवून देताना इझी शार्प आणि ब्रूक हॅलिडेने चौथ्या गड्यासाठी १०१ धावांची भागीदारी केली. शार्पने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम ६२ धावांची खेळी साकारली. तिने ४३ चेंडूंच्या खेळीत ८ चौकार व एक षटकार हाणला. ब्रूकने ३८ चेंडूत नाबाद ४१ धावांची खेळी केली. न्यूझीलंडने १९ व्या षटकात विजयाचे लक्ष्य गाठले. या पराभवामुळे स्कॉटलंडचे उपांत्य फेरीतील आव्हान संपुष्टात आले. (वृत्तसंस्था)



विजयाच्या शिल्पकार ब्रूक हॅलिडे व इझी शार्प

# पोलिओचा धोका शून्यावर ठेवण्यासाठी जिल्हा सज्ज

## २८ जूनला राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम; साडेचार लाखांहून अधिक बालकांना डोस देण्याचे लक्ष्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून-**

पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सोलापूर जिल्ह्यात येत्या दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामीण, शहरी आणि स्थलांतरित वस्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले असून संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे.



जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ३६ हजार ५७२ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजारपेठा, विटभट्ट्या, साखर कारखाने, यात्रा स्थळे आणि लग्न समारंभांमध्येही पोलिओ डोस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भटक्या वसाहती, स्थलांतरित कुटुंबे आणि ऊसतोड कामगारांच्या वस्त्यांमधील बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोबाईल पथके कार्यरत राहणार आहेत.

पोलिओमुक्त भारताचे यश कायम राखण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत लसीकरण पोहोचणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील बालकांना जवळच्या पोलिओ बूथवर घेऊन जावे आणि पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. मोहिमेच्या यशासाठी ग्रामस्तरावर जनजागृती मोहीम, प्रभातफेरी, प्रचार-प्रसिद्धी आणि विविध विभागांमधील समन्वयावर भर देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### पर्यवेक्षकांकडून मोहिमेवर बारकाईने देखरेख

मोहिमेसाठी ग्रामीण भागात ५ हजार ५७०, शहरी भागात ५७० आणि महानगरपालिका क्षेत्रात ३७३ लसीकरण बूथ उभारण्यात आले आहेत. लसीकरणासाठी ७ हजार २२२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा व तालुकास्तरीय पर्यवेक्षकांकडून मोहिमेवर बारकाईने देखरेख ठेवली जाणार आहे.

## महत्वाचे...




### संत निरंकारी मिशनच्या रक्तदान शिबिरात १०२ भक्तांचे रक्तदान

**सोलापूर, दि.२३ जून-**

संत निरंकारी मिशनचे तत्कालीन सतगुरु बाबा गुरबचनसिंह यांच्या स्मृती प्रित्यर्थ मानव एकता दिनानिमित्त सतगुरु माता सुदिक्षा महाराज व निरंकारी राजपिता रमित यांच्या मार्गदर्शनात संत निरंकारी सत्संग भवन अंत्रोळीकर नगर भाग १, कुमठा नाका या ठिकाणी निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबीर झाले. शिबिरात १०२ श्रद्धाळूंनी रक्तदान करून सतगुरूंचा आशीर्वाद प्राप्त केला. शिबिरास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, छ. शिवाजी महाराज सिव्हिल हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड बँक चेअरमन डॉ. राजीव प्रधान, नगरसेविका संगीता शिवाजी जाधव व संगीता शंकर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात रक्त संकलन करण्यासाठी गोपाबाई दमाणी व सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढीचे सर्व स्टाफचे तथा निरंकारी सेवादलचे सहकार्य लाभले. रक्तदानाबरोबरच सत्संगाचा कार्यक्रम पार पडला.




### हरि ओम संस्थेच्या खजिनदारपदी लक्ष्मीकांत दंडी

**सोलापूर, दि.२३ जून-**

अक्कलकोट रोड उषा लाऊन येथे हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पदाधिकाऱ्यांची निवड सन २०२६-२७ सालाकरीता निवड करण्यात आली. अध्यक्ष बालाजी जंगम, उपाध्यक्ष इराण्णा चांशेटी, खजिनदारपदी लक्ष्मीकांत दंडी, सचिव प्रकाश पुल्ली, सहसचिव विनायक सिद्धंम यांची एकमताने निवड करण्यात आली. जुलै महिन्यात श्री शेगाव गजानन महाराज पालखी सोलापूर मुक्कामी येणार आहे. पालखीतील वारकऱ्यांना दरवर्षी प्रमाणे महाप्रसाद देण्याचे ठरले. सभेला हिरालाल धुळम, शिवप्रकाश चव्हाण, गिरीश शंकू, जगदीश बोमद्याल, अंबादास जक्कन, शिवराज मेरगू, श्रीनिवास मादास, शेखर इराबत्ती, रुक्मणसा दौलताबाद, शिरीष कोल्हापुरे, राजू मद्याल उपस्थित होते.

### सार्थक लेंगरे पुनर्मूल्यांकनानंतर एसएससी परीक्षेत राज्यात प्रथम

**पंढरपूर, दि.२३ जून-**



येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द. ह. कवठेकर प्रशालेचा सार्थक लेंगरे हा मार्च २०२६च्या एसएससी परीक्षेत पुनर्मूल्यांकनानंतर पाच गुण वाढल्याने शंभर टक्के गुण प्राप्त करून राज्यात प्रथम आला. त्याचे इंग्रजी, विज्ञान व भूगोल या विषयाते हे गुण वाढून आले. यापूर्वी त्यास ९९.२० इतके गुण होते. याच प्रशालेचा विद्यार्थी चिरंजीव अथर्व अमित वाडेकर यास मार्च २०२६ परीक्षेत राज्यात शंभर टक्के गुण प्राप्त करून प्रथम येण्याचा मान प्राप्त झाला होता. सार्थक लेंगरे यांच्या यशामुळे द. ह. कवठेकर प्रशालेचे दोन विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीमध्ये सर्वप्रथम झळकले. प्रशालेतील ३६ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त झाले आहेत. सार्थक याला त्याच्या शंभर टक्के यशाबद्दल पूर्ण खात्री होती. त्यानी एसएससी बोर्डाच्या उत्तरपत्रिकांची प्रत मागून तज्ञ विषय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पुनरमुल्यांकन प्रक्रिया पार पाडली. एसएससी बोर्डाने तात्काळ पाच गुण वाढ देऊन शंभर टक्के गुण प्राप्त केल्याचे जाहीर केले. सार्थक याचे वडील सिद्धेश्वर व आई राणी लेंगरे या जिल्हा परिषदेच्या शिक्षिका असून सामाजिक व शैक्षणिक कार्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. संस्थेचे अध्यक्ष नाना मालक कवठेकर, सचिव एस.आर.पटवर्धन, मुख्याध्यापक व्ही.एम.कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका एस.एस.विश्वासे, पर्यवेक्षक जे.एम.शेलार यांनी सार्थक याचे अभिनंदन केले.

### नवभारत इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन साजरा

**जेऊर, दि. २३ जून-**

नवभारत इंग्लिश स्कूल, जेऊर (ता.करमाळा) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षिका, मुख्याध्यापक व कर्मचारी वर्गाने सामूहिक योगाभ्यास केला. शिक्षकांनी स्वतः विद्यार्थ्यांसमोर विविध योगासने करून दाखवत त्यांच्याकडून करुनही घेतली. सुराणा हॉस्पिटलचे डॉ. सुभाष सुराणा यांनी विद्यार्थ्यांना योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व समजावून सांगितले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांसोबत योगासनांचा सरावही केला.

### राजवाडे चौकातील पान शॉपवर धाड; प्रतिबंधित मावा जप्त

**सोलापूर, दि.२३ जून-**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने नवी पेठ परिसरातील राजवाडे चौकात असलेल्या एका पान दुकानावर धाड टाकून शासनाने प्रतिबंधित केलेल्या ओला माव्याच्या पुड्या जप्त केल्या. या प्रकरणी नंदिनी सिध्देश्वर हिरेमठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दुकान चालक उमेश भीमाशंकर बहिरवाडे (वय ३७, रा. ५५, नवी पेठ, सोलापूर) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. मंगळवारी दुपारी राजवाडे चौक येथील मे. भोला पान शॉपवर ही कारवाई केली. छाप्यादरम्यान दुकानातून २,५५० रुपये किमतीच्या ओला मावाच्या १७० पुड्या जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, वाहतूक, साठा करण्याच्या बंदी आदेशाचा भंग केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.



## एमआयटीव्हीजीएस शाळेत योगदिन, संगीत दिन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जून-**

एम. आय. टी. व्ही. जी. एस. शाळेत जागतिक योगदिन आणि जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शाळेच्या प्राचार्या रेखा पाटील व प्रमुख पाहुणे शहनाईवादक सचिन राऊत व बासरीवादक सुमित घाडगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

जागतिक योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी योग प्रात्यक्षिक सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी संगीताच्या तालावर विविध योगासनांची आकर्षक प्रात्यक्षिके सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. जागतिक संगीत दिनानिमित्त एकल गायन, एकल वादन आणि सामूहिक वादन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यानंतर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांसमोर शास्त्रीय व सुगम संगीताचे मनमोहक सादरीकरण केले. स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांनीही आपले गीतगायन व वादनकला सादर करुन उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळिवली.

## शुक्रवारपासून राज्यस्तरीय योगशास्त्र संगमम् परिषद

**तीन दिवस पातंजल योगसूत्रांवर होणार सखोल विचारमंथन**

**राज्यभरातील संशोधक, अभ्यासकांचा राहणार सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

विवेकानंद केंद्र, वयमब, सोलापूर यांच्या वतीने दि. २६, २७ व २८ जून या कालावधीत पहिल्या राज्यस्तरीय 'योगशास्त्र संगमम्' या त्रिदिवसीय योग परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.प्रणव नगरी, जुळे सोलापूर येथील विवेकानंद केंद्रात ही परिषद होणार असल्याची माहिती डॉ. शालिनी मस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विवेकानंद केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्र स्तरावर आयोजित होणारी ही पहिलीच योग परिषद आहे.या परिषदेत योगाभ्यास, आसने, प्राणायाम, ध्यान, योगतज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, शैक्षणिक चर्चासत्रे तसेच संशोधनपर शोधनिबंध सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील योग अभ्यासक, संशोधक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आपल्या संशोधनाचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

परिषदेचे उद्घाटन २६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता परमपूज्य स्वामी स्वरूपानंद सरस्वती महाराज (श्रुती सागर आश्रम, फुलगाव, पुणे) यांच्या हस्ते होणार आहे. परिषदेत प्रख्यात योग व विचारवंत तज्ज्ञ श्रीराम आगाशे (ठाणे) आणि रवि शर्मा (कन्याकुमारी) यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. त्यांच्या व्याख्यानांमधून योगाचे तात्त्विक, वैज्ञानिक आणि व्यावहारिक पैलू उलगडून सांगितले जाणार आहेत.

या परिषदेच्या माध्यमातून योग क्षेत्रातील नव्या संकल्पना, संशोधन निष्कर्ष आणि अनुभवांची देवाणघेवाण होणार असून राज्यभरातील योगप्रेमींना एक समान व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. योग क्षेत्राशी संबंधित अभ्यासक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिकांनी या परिषदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस सुहास देशपांडे, संध्या पाटील, दीपक पाटील, नंदकुमार चितापुरे, अरविंद जोशी, अभिराम सराफ आदी उपस्थित होते.

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त कोल्हापुरात बिगुल वादनातून मानवंदना

**शाक्य संघाच्या वतीने राज्यभरातील 100हून अधिक सदस्यांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त २६ जून रोजी कोल्हापूर येथे शाक्य संघ, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बिगुल वादनातून विशेष मानवंदना देण्यात येणार आहे. या सोहळ्यास राज्यभरातील १०० हून अधिक सदस्य विशेष ड्रेसकोडमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

कोल्हापूरच्या दसरा चौकात होणाऱ्या शासकीय जयंती कार्यक्रमात सहभागी होत खा. छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर शाक्य संघ तसेच माता रमाई महिला ब्रिगेडच्या संयुक्त विद्यमाने बिगुल वादन करून राजर्षींना मानवंदना दिली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर, कोल्हापूर, सांगली, पुणे, दौंड, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, बीड आदी जिल्ह्यांतील सदस्य उपस्थित राहणार आहेत.

राजर्षी शाहू महाराजांची जयंती दिवाळीप्रमाणे साजरी करण्याचा संदेश भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता.

त्या विचारातून कार्यक्रमस्थळी उपस्थितांना मिठाई व खाऊ वाटप करण्यात येणार आहे. याप्रसंगी इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, वसंतराव मुळीक, संजय कांबळे, बबनराव रानगे यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित राहणार आहेत. शाक्य संघाच्या वतीने कोल्हापूर येथे राजर्षी शाहू महाराजांना मानवंदना देण्याचा हा सलग दुसरा उपक्रम असून, आगामी काळातही दरवर्षी हा उपक्रम सुरू ठेवण्याचा संस्थेचा मानस आहे. या कार्यक्रमाचे नियोजन अशोककुमार दिलपाक, अरुण ओहळ, सुभाष सर्वगोड, गोविंद जगताप, कल्याण भंडारे, अंकुश पंडित, निवृत्ती सुरडकर, प्रकाश सावंत आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



## एनआयपीईआर परीक्षेत कॉलेज ऑफ फार्मसीचे देशपातळीवर यश

### सहा विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटीकल एज्युकेशन अँड रिसर्च (एनआयपीईआर) तर्फे राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या जॉईंट एंट्रन्स एक्झामिनेशन २०२६ (संयुक्त प्रवेश परीक्षा) मध्ये दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसीच्या सहा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

हे सर्व यशस्वी विद्यार्थी संगणक आधारित चाचणीच्या (सीबीटी) विद्यावेतनासह एम.एस. (फार्मा.), एम.फार्मा., एम.टेक. आणि पीएच. डी. या उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. संपूर्ण भारतात अहमदाबाद, गुवाहाटी, हाजीपूर, हैदराबाद, कोलकाता, मोहाली आणि रायबरेली अशा एकूण सातच ठिकाणी एनआयपीईआरचे मुख्य कॅम्पस (संस्था) असून, या नामवंत संस्थांमध्ये या विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता यादीत मानसी गोवर्धन डिडवाणी (क्रमांक- ९७), पारिक कुमार भागवत (६४०), वैष्णवी पद्मुखे (६७२), अन्सारी मोहम्मद हनीफ जैनुद्दीन (९५२), सानिका शांताराम शिंदे ( १२३८) आणि यामिनी देवीचंद्र ढगे ( १२६५) या विद्यार्थ्यांनी बाजी मारत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या अद्वितीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व चेअरमन राजशेखर शिवदारे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या पुढील उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे विश्वस्त प्रा. डॉ.भीमाशंकर शेटे यांनीही विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

''कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांनी ज्या पवित्र उद्देशाने दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाची स्थापना केली, तो उद्देश आज खऱ्या अर्थाने पूर्ण होताना दिसत आहे. महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा देश पातळीवर कायम राखली आहे,'' अशा शब्दांत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

## बाळे जिल्हा परिषद केंद्र शाळेची सोलापूर विमानतळास शैक्षणिक भेट

**सोलापूर, दि.२३ जून-**

जिल्हा परिषद केंद्रशाळा बाळेच्या विद्यार्थ्यांची सोलापूर विमानतळाची शैक्षणिक क्षेत्रभेट झाली. मुख्याध्यापिका सोजर मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित क्षेत्रभेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळवून देणे, विविध क्षेत्रांची ओळख करून देणे आणि त्यांच्या जिज्ञासेला चालना देणे हा होता. विमानतळाच्या एअरपोर्ट डायरेक्टर अंजली कुमारी, एअरपोर्ट टर्मिनल मॅनेजर वीरेंद्र सासी, एअर ट्रॅफिक कंट्रोल इन्चार्ज रोहन जनयराम, फायर सुपरिटेंडंट इन्चार्ज निशांत म्हात्रे, फायर सुपरिटेंडंट तुकाराम दराडे, वरिष्ठ सहाय्यक अग्निशमन अधिकारी विक्रांत थोरात, महेंद्र साळुंखे तसेच शाळेचे माजी विद्यार्थी राजेंद्र गुरव, साई तोडकरी आणि सर्व विमानतळ कर्मचाऱ्यांच्या विशेष सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना विमानतळाच्या विविध विभागांची माहिती मिळाली. यावेळी विद्यार्थ्यांना केळी वाटप केले. चित्रकला स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना बक्षिसे दिली. विद्यार्थी व शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण केले. लेझीम नृत्यात उत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या मुलींनाही बक्षिसे प्रदान करण्यात आली.

## सांगोला नगरपरिषदेत आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२३ जून-**

आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन सांगोला नगरपरिषदेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महिला व बाल कल्याण समिती सभापती छाया मेटकरी यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी आरोग्य सभापती गोदाबाई बनसोडे, नगरसेविका राणी माने, आशादेवी यावलकर, श्रद्धा साबळे, अनिता केदार, सुजाता केदार, वैशाली झपके, शोभा फुले, सीमा सरगर, तनुजा एरंडे तसेच मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.सुधीर गवळी यांनी केले. कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीचे औचित्य साधून ज्योतिबा फुले जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. कर निरीक्षक प्रियांका पाटील यांनी




एकल महिलांकरिता असलेल्या विविध आर्थिक व सामाजिक स्थैर्य मिळवून देणाऱ्या शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली.

या प्रसंगी उपस्थित अनेक एकल महिलांनी आपल्याला भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर आपले मत मांडले. राणी माने यांनी एकल महिलांच्या पाठीशी नगरपालिका खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. छाया मेटकरी यांनी एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी आणि त्यांना समाजात समानतेचा अधिकार मिळवून देण्यासाठी सांगोला नगरपरिषद कटिबद्ध आहे, असे सांगितले. या कार्यक्रमाला सांगोला शहरातील एकल महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शरद थोरात, जयश्री खडतरे, सविता लोखंडे, कोमल चांडोले, सारिका लोखंडे आणि प्रतिभा कोरे यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे यांनी केले. आभार कर निरीक्षक अस्मिता निकम यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### दारु पिऊन गोंधळ घालणाऱ्याला समजावताना दोघा भावांना मारहाण

**सोलापूर, दि.२३ जून-**

दारु पिऊन गल्लीत धुडगूस घालणाऱ्याला समजावून सांगणाऱ्या दोन भावांना बेदम मारहाण केल्याप्रकरणी एका महिलेसह दोघा जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जगदीश व मेनका संगटे (दोघेही रा.मधुकर उपलप वस्ती, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. नागनाथ हणमंतू दिवटे (रा.मधुकर उपलप वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, जगदीश संगटे हा दारु पिऊन घरासमोर येऊन शिवीगाळ करत असतो. दि.२० जून रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास तो दारु पिऊन गोंधळ घालत होता. तेव्हा माझा भाऊ परशुराम याने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता गल्ली काय तुझ्या बापाची आहे का? असे म्हणत लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरु केली. भावाच्या मदतीला धावून गेलो असता मेनका संगटे हिनेही शिवीगाळ करत माझ्या पाठीवर जोरात चावा घेतला. जगदीश संगटे याने फरशी तुकड्याने मारले.

### श्रमिक कामगार नगर येथील मेडिकल दुकान फोडले

**सोलापूर, दि.२३ जून-**

एमआयडीसी परिसरातील श्रमिक कामगार नगर येथील बंद मेडिकल दुकान फोडून चोरट्याने ६ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम चोरुन नेले. याबाबत चिनू गंगाधर बल्ला (रा.व्यंकटेश नगर, सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. दि.२१ ते २२ जून दरम्यान दुकान बंद असताना चोरट्याने शटर उचकटून दुकानात प्रवेश करुन गल्ल्यातील ६ हजार ५०० रुपये रोख रक्कम चोरून नेले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# बोगस डॉक्टरांची माहिती देताना आरोग्य विभागाची उडाली धांदल




**कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन वाढले**

आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन वाढले आहे. कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी न सांगताच गैरहजर राहणे चुकीचे आहे. पूर्वसूचना न देता गैरहजर राहिल्याने वरिष्ठांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगण्यात येते.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांविरोधात सुरु असलेल्या मोहिमेची माहिती अधिवेशनात मागविण्यात आल्यानंतर जिल्हा परिषद आरोग्य विभागाची चांगलीच धांदल उडाल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, या मोहिमेची माहिती संकलित करण्याची जबाबदारी असलेला कर्मचारी शिंदे कार्यालयात उपस्थित नसल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश कोपूरवाड यांच्यासमोर अडचणीची परिस्थिती निर्माण झाली.

बार्शी तालुक्यातील उपळाई येथे एका बोगस डॉक्टरकडून झालेल्या उपचारामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली होती. जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश आरोग्य विभागाला देण्यात आले होते. विविध तालुक्यांमधील संशयित बोगस वैद्यकीय व्यवसायिकांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू करण्यात आले होते.

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात या मोहिम बाबत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर संबंधित माहिती तातडीने मागविण्यात आली. मात्र, माहिती संकलनाची जबाबदारी असलेला कर्मचारी कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर असल्याने आवश्यक आकडेवारी आणि अहवाल तातडीने उपलब्ध करण्यात अडचणी आल्या. बोगस डॉक्टरांविरोधातील कारवाई ही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, अशा मोहिमेतील माहिती व्यवस्थापनात झालेल्या त्रुटींमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अधिवेशनात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांसाठी अद्ययावत माहिती तत्काळ उपलब्ध राहावी, यासाठी विभागीय पातळीवर अधिक प्रभावी समन्वयाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# आमच्या मुलाला पळवून नेऊन लग्न केले असे म्हणत विवाहितेचा छळ, पतीसह सहा जणांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२३ जून-**

आमच्या मुलाला पळवून नेऊन लग्न केले; त्याचे आयुष्य खराब केले. आता कपड्याच्या व्यवसायासाठी माहेरुन १५ लाख रुपये घेऊन ये, नाहीतर तुला नांदवणार नाही, असे म्हणत एका विवाहितेचा मानसिक व शारिरिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरकडील सहा जणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.






पती प्रतिक सोनटक्के, सासू तेजस्वी सोनटक्के, सासरे नितीन सोनटक्के, चुलत सासू उर्मिला, मामी सासू दीपाली, नणंद पायल (सर्वजण रा.इंदापूर, जि.पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत प्रतिक्षा प्रतिक सोनटक्के (रा.नाकोड युनिटी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. डिसेंबर २०२४ ते दि.७ मे २०२६ यादरम्यान सासरी नांदत असताना लग्नात हुंडा दिला नाही, तू फुकट या घरात आलीस आणि वंशाला दिवा म्हणून मुलाला जन्म न देता मुलीला जन्म दिलास, असे म्हणत वरील आरोपींनी सतत टोमणे मारुन त्रास देण्यास सुरुवात केली, असे फिर्यादीत नमूद आहे. पोलिस हवालदार पवार हे पुढील तपास करत आहेत.

## जिल्हा न्यायालय प्रबंधकपदी संजय म्याकलवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

जिल्हा न्यायालय, सोलापूरच्या प्रबंधकपदी संजय म्याकलवार यांची निवड करण्यात आली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी त्यांचे अभिनंदन केले.



मुंबई येथून कनिष्ठ लिपिक पदावरून न्यायालयीन सेवेला प्रारंभ केलेल्या संजय म्याकलवार यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, प्रशासकीय कौशल्याच्या बळावर ही या पदापर्यंत पोहोचले. न्यायालयीन सेवेत विविध पदांवर कार्यरत असताना पारदर्शक कार्यपध्दती, शिस्तबध्द कामकाज आणि सहकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध जपत आहेत.

# स्थायी समिती सभेत १२ पैकी १० विषयांना मान्यता, दोन प्रस्ताव फेरसादरचा निर्णय

**महापालिका निवडणुकीसाठी मंडप, फर्निचर व इतर साहित्य भाडेतत्त्वावर पुरवठा**

**२५ लाखांचे काम ९७ लाखांपर्यंत कसे गेले? 'स्थायी'च्या सभापती रंजीता चाकोते यांचा सवाल**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

सोलापूर महापालिका स्थायी समितीच्या सभेत १२ पैकी १० विषयांना मान्यता देण्यात आली. सोलापूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी निवडणूक निर्णय अधिकारी एक ते सात यांच्या अखत्यारीत विविध ठिकाणी मंडप, फर्निचर व इतर साहित्य भाडेतत्त्वावर पुरवठा करणे यांसह एकूण दोन प्रस्ताव फेर सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'स्थायी'च्या सभापती रंजीता चाकोते ह्या सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या.

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत मंडप फर्निचरसह इतर साहित्य भाडेतत्त्वावर पुरवठा करण्यासंदर्भातला बिलांची निवडणूक खर्च समितीने वस्तुनिष्ठता प्रामाणिकता दराची योग्यता आणि कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी याची खातरजमा करून एकत्रित अहवाल सादर केला. प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या ठिकाणी संबंधित साहित्यासाठी मूळ मक्त्याची रक्कम २४ लाख ५० हजार रुपये आहे.

मात्र मक्तेदार यांनी सादर केलेल्या एका कार्यालयाकडील बिलाची रक्कम सरासरी ९७ लाख रुपये असल्याचे दिसून येते. तर विभागाने निश्चित केलेली रक्कम ५९ ते ६७ लाख रुपये सरासरी आहे. तर समितीने शिफारस केलेली बिलाची रक्कम ही एका कार्यालयासाठी सरासरी ५१ लाख असल्याचे आहे. साथ ही निवडणूक कार्यालयाकडील मूळ मक्त्याची रक्कम एकूण १ कोटी ७१ लाख ५० हजार रुपये आहे.

मक्तेदाराने सादर केलेल्या बिलाची रक्कम सहा कोटी ७० लाख ७८ हजार ७०५ रुपये आहे तर समितीने शिफारस केलेली बिलाची रक्कम तीन कोटी ५८ लाख ३० हजार २११ रुपये आहे. त्यास मान्यतेसाठी स्थायी समितीकडे हा विषय आला होता. विविध विभागांतील कामांसाठी मंजूर करण्यात आलेल्या खर्चाच्या तुलनेत मक्तेदाराने सादर केलेल्या बिलांमध्ये मोठी तफावत आढळून आले.

मूळ अंदाजित खर्च सुमारे २५ लाख रुपये असताना संबंधित मक्तेदाराने तब्बल ९७ लाख रुपयांचे बिल सादर केल्याचा मुद्दा समोर येताच २५ लाखांचे काम ९७ लाख रुपयांपर्यंत कसे गेले? असा संतप्त सवाल स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांनी संबंधितांना केले. दरम्यान, आयुक्तांनी यापूर्वीच स्वतंत्र समिती नेमून क्रॉस व्हेरिफिकेशन करण्याचे आदेश दिले होते.

**'टीसीएस'ऐवजी 'आयबीपीएस'कडे जबाबदारी**

महापालिकेने सर्व सेवा भरती केल्यानंतर ३०२ पैकी केवळ १३७ उमेदवार कार्यरत आहेत. ही रिक्त पदे भरण्यासाठी टीसीएस या कंपनीला पुन्हा संधी देण्याऐवजी आयबीपीएस या यंत्रणेला ही पदे भरण्याची जबाबदारी देण्याविषयी मान्यता देण्यात आली. हा विषय महापालिका सभेपुढे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# विधवा महिलांना सन्मान, हक्क आणि स्वावलंबनाचा आधार



**एकल महिला सन्मान दिन कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

विधवा महिलांना सन्मान, हक्क आणि स्वावलंबनाचा आधार देण्याकामी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा एकमुखी निर्णय सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या एकल महिला सन्मान दिन कार्यशाळेत घेण्यात आला. मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या हस्ते आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे, सदस्य चैताली मुळे, करुणा शिवशरण, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड ग्रामपंचायतीच्या आदर्श उपक्रमाचा आधार घेत विधवांशी संबंधित अनिष्ट प्रथा बंद करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार पुणे विभागातील सर्व ग्राम पंचायतींमध्ये आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त विशेष जनजागृती व सन्मान उपक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर विधवा महिलांच्या आधार, रेशनकार्ड, पेन्शन व अन्य शासकीय कागदपत्रांतील अडचणी सोडविण्यासाठी मदत केंद्रे कार्यरत ठेवण्यात येणार आहेत. बचत गटांपासून वंचित असलेल्या महिलांना 'उमेद' अभियानांतर्गत स्वयं-साहाय्य गटांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. जिल्हाभरातील ग्रामपंचायत, नगरपंचायत आणि तालुकास्तरीय कार्यालयांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करुन एकल महिलांच्या समस्या जाणून घेण्याचे ठरले.

**महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर**

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), उमेद आणि इतर विभागांच्या सहकार्याने स्वयंरोजगार व कौशल्य विकास मार्गदर्शन मेळावे आयोजित करण्यात येणार असून विधवा व एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये त्यांच्या कामांना प्राधान्य देऊन सन्मानपूर्वक वागणूक देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

**अमानवीय प्रथांविरोधात ग्रामसभांमध्ये ठराव**

राज्य सरकारच्या प्रस्तावित एकल महिला धोरणासाठी महिलांच्या सूचना संकलित केल्या जाणार आहेत. पतीच्या निधनानंतर कुंकू पुसणे, मंगळसूत्र तोडणे, बांगड्या फोडणे किंवा महिलांना शुभकार्यांपासून दूर ठेवणे यांसारख्या अमानवीय प्रथांविरोधात ग्रामसभांमध्ये ठराव मंजूर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवस्मारकासाठी पालकमंत्री गोरे यांच्याकडून २ कोटींची तरतूद

**जि.प. उद्यानातील शिवरायांचा पुतळा तिन्ही बाजूंनी दिसणार**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२३ जून-**

जिल्हा परिषदेच्या शिवछत्रपती रंगभवन समोरील उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सौंदर्यीकरण आणि परिसराचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी महत्त्वाकांक्षी विकास आराखड्याला गती मिळाली आहे. जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी मांडलेल्या प्रस्तावाला पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या कामासाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता दिली आहे.

या योजनेअंतर्गत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चौथऱ्याची उंची वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे उद्यानाबाहेरील रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना पुतळा तिन्ही बाजूंनी स्पष्टपणे दिसणार आहे. सध्या झाडे व इतर अडथळ्यांमुळे पुतळ्याचे दर्शन मर्यादित होत असल्याची भावना अनेक शिवप्रेमींनी व्यक्त केली होती.

उद्यानात आकर्षक माहिती फलक, शिवकालीन वास्तुशैलीवर आधारित सजावटीची रचना आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची माहिती देणारी व्यवस्था उभारण्यात येणार आहे. त्यामुळे हे ठिकाण केवळ उद्यान न राहता इतिहासप्रेमी, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी अभ्यासपूर्ण केंद्र ठरणार आहे.

कामाचा आराखडा अंतिम टप्प्यात असून, पुढील वर्षी ६ जून रोजीच्या शिवराज्याभिषेक दिनापर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे जिल्हा परिषद उद्यानाचा नवा चेहरा समोर येणार असून, शिवरायांच्या स्मारकाला अधिक भव्य आणि दिमाखदार स्वरुप प्राप्त होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# मनपा : अतिरिक्त आयुक्त ते सहाय्यक आयुक्तांपर्यंत जबाबदाऱ्यांचे पुनर्वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून-**

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी विभाग वाटपाचे सुधारित आदेश काढले आहेत. याद्वारे अतिरिक्त आयुक्त ते सहाय्यक आयुक्तांपर्यंत जबाबदाऱ्यांचे पुनर्वाटप करण्यात आले. दरम्यान, उपायुक्त आशिष लोकरे यांची जिल्हाधिकारी कार्यालयकडे बदली झाल्याने त्यांना कार्यमुक्त करण्यात आले.



अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्याकडे आरोग्य, मलेरिया, भूमी व मालमत्ता, अभिलेखापाल, सुरक्षा, नगर सचिव, विधान सल्लागार, विभागीय कार्यालय क्रमांक सात आदी महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी देण्यात आली. अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्याकडे शहर नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय (पाणीपुरवठा व जलनिस्सारण), निवडणूक व जनगणना कार्यालय, विद्युत विभाग आणि विभागीय कार्यालय क्रमांक एक याचा कारभार सोपविण्यात आला आहे. उपायुक्त (नियंत्रण अधिकारी) सोनाली यादव यांच्याकडे सामान्य प्रशासन (भांडार सह), कर आकारणी विभाग, महिला व बालकल्याण, कामगार व जनसंपर्क, समाज विकास, विभागीय कार्यालय क्रमांक सहा आदी विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्याकडे घनकचरा व्यवस्थापन, उद्यान व पर्यावरण संवर्धन, विभागीय कार्यालय क्रमांक तीन या विभागांचा कारभार देण्यात आला. सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्याकडे सामान्य प्रशासन विभाग, निवडणूक व जनगणना, क्रीडा, अग्निशामक आणि आणीबाणी सेवा, विभागीय कार्यालय क्रमांक पाच या विभागांची जबाबदारी देण्यात आली. सहाय्यक आयुक्त मनिषा मगर (विभाग प्रमुख) यांच्याकडे सामान्य प्रशासन, भूमी व मालमत्ता, संगणक विभाग (नियंत्रण अधिकारी), विभागीय अधिकारी कार्यालय क्रमांक दोनची जबाबदारी सोपविण्यात आली. मुख्यलेखापाल डॉ.रत्नराज जवळगेकर यांच्याकडे शिक्षण विभाग व महापालिका क्रमांक एक ते सहा शाळा, विभागीय कार्यालय क्रमांक ४ चे नियंत्रण राहणार आहे.

नगर अभियंता सारिका आकुलवार यांच्याकडे विभागीय कार्यालय क्रमांक आठ तर प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हार माने यांच्याकडे शिक्षण विभाग प्रमुख व महापालिका एक ते सहा शाळेचे विभाग प्रमुख जबाबदारी राहणार आहे. नगररचना विभागाचे कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांच्याकडे परिवहन विभाग (परिवहन व्यवस्थापक या पदासह), अतिक्रमण प्रतिबंधक विभाग, मंडई कोंडवाडा व परवाना विभाग, पशुवैद्यकीय व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विभागाची धुरा सोपविण्यात आली.

## सुरक्षित, सुसज्ज अन् सुखकर 'वारी'साठी जिल्हा परिषद कटिबध्द

**जि.प.अध्यक्ष, उपाध्यक्ष, सीईओनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांच्या स्वागतासाठी जिल्हा परिषद सोलापूरने व्यापक नियोजन केले असून आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि निवारा यांसह विविध सुविधांचे भक्कम जाळे उभारण्यात आले. जिल्ह्यातून १० प्रमुख पालख्या ८१ गावांतून मार्गक्रमण करणार असून ३८ मुक्काम आणि ४३ विसावा स्थळांवर विशेष व्यवस्था करण्यात आली. सुरक्षित, सुसज्ज अन् सुखकर 'वारी'साठी जिल्हा परिषद कटिबध्द आहे, अशी ग्वाही जि.प.चे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, सीईओ कुशल जैन यांनी संयुक्त पत्रपरिषदेत दिली.

५ हजार शौचालये, ५०० स्नानगृहे, २२० पाणी टँकर, ३७ जर्मन हँगर आणि २३ जर्मन हँगर उभारण्यात येणार आहेत. याशिवाय १६७ हिरकणी कक्ष, ४० स्वागत कमानी आणि १५ मोबाईल चार्जिंग केंद्रांची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. १३ मेडिसीन ऑन व्हील सेवा यांसह पायी चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी ७५० चरणसेवा फूट मसाजरची व्यवस्था करण्यात आली. स्वच्छता राखण्यासाठी ५०० सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आषाढी वारीच्या अनुषंगाने शासनाकडून एकूण ६३ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. 'डीपीसी'मधून एक कोटी प्राप्त झाले आहेत. प्रशासनाने केवळ धार्मिक सोहळा म्हणून नव्हे तर 'सेवा, स्वच्छता आणि सुरक्षितता' या त्रिसूत्रीवर भर देत नियोजन केले आहे. वारी मार्गावरील पाणी, आरोग्य सेवा, स्वच्छता, निवारा आणि डिजिटल सुविधांमुळे लाखो वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुसह्य होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## महापालिका उपायुक्तपदी जयंत जावडेकर

**सोलापूर, दि.२३ जून-**



सोलापूर महानगरपालिकेच्या उपायुक्तपदी जयंत जावडेकर यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली. कोल्हापूर महानगरपालिकेत सहायक आयुक्त म्हणून ते कार्यरत होते. उपायुक्त आशिष लोकरे यांची बदली झाल्याने रिक्त झालेल्या या पदावर जावडेकर यांची नियुक्ती करण्यात आली.महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी गट-ब/सहायक आयुक्त गट-ब संवर्गातून मुख्याधिकारी गट-अ/सहायक आयुक्त गट-अ संवर्गात पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत जयंत जावडेकर यांचा समावेश आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### बायकोबरोबर भांडण, पतीने कापून घेतला गळा

**सोलापूर, दि.२३ जून-**

बायकोबरोबर झालेल्या भांडणात एका पतीने ब्लेडने गळा घेतला कापून घेतल्याची घटना लोधी गल्ली येथे घडली. आनंद रणजीत बोकेवाले (वय-२५, बेडरपूल, लोधी गल्ली, सोलापूर) असे त्या पतीचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी बायकोबरोबर भांडण झाले होते. या रागाच्या भरात त्याने स्वतःच्या गळ्यावर चाकूने मारुन घेतले. त्यांना उपचारासाठी भाऊ लखन बोकेवाले यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

..............................

### घरात झोपल्या ठिकाणी तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२३ जून-**

घरात झोपल्या ठिकाणी एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना जुना देगाव नाका येथील हब्बू वस्ती येथे घडली. अतिशय भुताळसिध्द बिरुणगी (वय-३४,, रा.हब्बू वस्ती, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे.सोमवारी रात्री घरामध्ये झोपला होता. मंगळवारी सकाळी नातेवाईकांनी उठवण्याचा प्रयत्न केला असता तो बेशुध्द असल्याचे आढळून आले. त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी भाऊ गोपाळ यांनी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

..............................

### घरजागेच्या वादातून मारहाण, तरुण जखमी

**सोलापूर, दि.२३ जून-**

घरजागेच्या वादातून एका तरुणाला ब्लेड, फायटर व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना लष्कर भागात घडली. गौस अब्दुल सत्तार कुरेशी (वय-३२, रा.सदर बाजार, लष्कर, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी तो राहत्या घरासमोर असताना घरजागेच्या वादातून बाबासाहेब कुरेशी, शाईन कुरेशी व इतर चार जणांनी मिळून त्याला मारहाण केली. त्याला उपचारासाठी भाऊ अल्ताफ कुरेशी याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

..............................

### कुकरचे झाकण उडून पडल्याने वृध्द महिला जखमी

**सोलापूर, दि.२३ जून-**

गरम कुकरचे झाकण उडून अंगावर पडल्याने एक वृध्द महिला भाजून जखमी झाल्याची घटना रेल्वे लाईन्स येथील हार्ट लॅन्ड कंपाउंडमध्ये घडली.

प्रमोदिनी कमलाकर तोरणे (वय-६३) असे त्या वृध्द महिलेचे नाव आहे. सोम वारी रात्री घरामध्ये कुकर लावले असताना अचानक कुकरची शिट्टी उडून कुकरचे झाकण अंगावर पडल्याने दोन्ही पाय भाजले. त्यांना उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात मुलगा अमित तोरणे यांनी दाखल केले.

..............................

### बहिणीला मारल्याचे विचारणा करणाऱ्या भावाला मारहाण

**सोलापूर, दि.२३ जून-**

बहिणीला मारल्याचे विचारणा करणाऱ्या एका भावाला दगडाने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कामती येथील आठवडा बाजारात घडली. किसन यल्लप्पा काटे (वय-३५, रा.वाघोली, ता.मोहोळ) असे त्या तरुणाचे नाव आहे. तो सोमवारी सायंकाळी कामती येथील आठवडा बाजारात असताना शेखर चंदनशिवे याने दगडाने मारहाण केली. यात डोक्याला मार लागल्याने कामती येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन आनंद यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

..............................

### भरधाव वाहन उलटून सात प्रवासी जखमी

**सोलापूर, दि.२३ जून-**

भरधाव वेगातील वाहन वळणावर उलटून खड्डयात पडून झालेल्या अपघातात एकाच गावातील सात प्रवासी जखमी झाल्याची घटना जेऊर येथे घडली. संकेत भैरप्पा कामते (वय-१८), समर्थ राजेंद्र कामते (वय-२१), अक्षय देविदास पवार (वय-२८), श्रेयश काशिनाथ सोरेगाव (वय-२०), केदार लक्ष्मण नंदुर (वय-२३), नागेश लक्ष्मण कामते (वय-२२), श्रीधर कल्लप्पा कामते (वय-१९, सर्वजण रा.कुमठे, ता.उत्तर सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. वरील सर्वजण चारचाकी वाहनातून चडचण-झळकीकडे निघाले होते.

जेऊरजवळ एका वळणावर सदर वाहन पलटी होऊन खड्डयात पडून हा अपघात घडला. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

---

# जि.प.आरोग्य विभागाचा ‘महसुली’ विक्रम

## ‘ना हरकती’तून मिळाले ४.४३ कोटी रुपयांची कमाई

▌ गंभीर आजारग्रस्तांना ‘सेस’मधून आधार

▌ जिल्हा परिषदेचा उपक्रम ठरतोय समाजोपयोगी

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२३ जून-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, जुलै २०१३ ते मे २०२६ या कालावधीत विविध आरोग्यविषयक नाहरकत प्रमाणपत्रांच्या माध्यमातून जिल्हा परिषद सेस निधीत तब्बल ४ कोटी ४३ लाख १६ हजार १०० रुपये जमा झाले आहेत. या कालावधीत एकूण २ हजार ६१० नाहरकत प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. आरोग्य सेवा क्षेत्राशी संबंधित विविध संस्था, वैद्यकीय व्यवसायिक, रुग्णालये आणि इतर आरोग्यविषयक घटकांना ही प्रमाणपत्रे देण्यात येतात.

जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत विविध आरोग्यविषयक नाहरकत प्रमाणपत्रे (एनओसी) आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता प्रशिक्षण पूर्णत्व दाखल्यांमधून गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात महसूल जमा झाला असून, हा निधी गंभीर आजारांनी ग्रस्त गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी वापरला जात आहे. महसूल निर्मिती आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधणारा हा उपक्रम जिल्हा परिषदेसाठी महत्त्वाचा ठरत आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून मिळणाऱ्या महसुलामध्ये सातत्याने वाढ होत आहे. विविध परवानग्या, नूतनीकरणे, आरोग्य संस्थांच्या मान्यता, इतर प्रशासकीय प्रक्रियांसाठी नाहरकत प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. या प्रक्रियेद्वारे शासनाने निश्चित केलेले शुल्क आकारले जाते. त्यातून प्राप्त होणारी रक्कम जि.प.च्या सेस निधीत जमा केली जाते.

विनाअनुदानित वैद्यकीय, आयुर्वेदिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आंतरवासिता प्रशिक्षण पूर्णत्व दाखल्यांमधूनही महसूल मिळत आहे. मार्च २०२२ ते मे २०२६ या कालावधीत एकूण ४१७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण पूर्णत्व दाखले देण्यात आले. त्यापैकी शुल्क आकारण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडून ६ लाख ४० हजार ५०० रुपये सेस निधीत जमा झाले आहेत. वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा दाखला महत्त्वाचा असल्याने त्याची मागणी सातत्याने वाढत आहे.

आरोग्य विभागाकडून जमा होणाऱ्या या निधीचे वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ महसूल म्हणून न राहता थेट समाजोपयोगी कार्यासाठी वापरला जातो. जिल्हा परिषदेकडून या सेस निधीतून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना प्रत्येकी १५ हजार रुपये पात्र लाभार्थ्यांना आर्थिक मदत दिली जाते. विशेषतः किडनी विकार, हृदयरोग आणि कर्करोग यांसारख्या खर्चिक उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना या निधीतून आर्थिक सहाय्य मिळते. गरजू कुटुंबांना उपचाराचा दिलासा मिळत असून आरोग्य विभागाच्या या उपक्रमाला सामाजिक संवेदनशीलतेची जोड मिळाली आहे.

#### सेवा आणि समाजकारण याचा संगम

एकीकडे आरोग्य क्षेत्राशी संबंधित प्रशासकीय सेवांमधून महसूल मिळत असताना दुसरीकडे त्याच निधीतून गंभीर आजारांनी ग्रस्त नागरिकांना जीवनदायी मदत मिळत असल्याने हा उपक्रम ‘सेवा आणि समाजकारण’ यांचा उत्तम संगम ठरत आहे. आगामी काळातही या माध्यमातून अधिकाधिक निधी उपलब्ध होऊन गरजू रुग्णांना सहाय्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

#### महसूल वाढीस हातभार ;गरजूंपर्यंत मदत



आरोग्य विभागाकडून महसूल संकलनाची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि प्रभावी करण्यात आली आहे. विविध प्रमाणपत्रे, परवानग्या आणि दाखल्यांचे कामकाज नियमबध्द पध्दतीने पार पाडले जात असल्याने महसूलवाढीस हातभार लागत आहे. जि.प.प्रशासनाने या निधीचा योग्य वापर करुन गरजू नागरिकांपर्यंत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरु ठेवला आहे, असे जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.सतीश कोपूरवाड यांनी सांगितले.

#### ठळक आकडेवारी याप्रमाणे

- जुलै २०१३ ते मे २०२६ या कालावधीत
- ४.४३ कोटी रुपये सेस निधीत जमा.
- २,६१० आरोग्यविषयक नाहरकत प्रमाणपत्रे निर्गमित.
- आंतरवासिता प्रशिक्षण पूर्णत्व दाखल्यांमधून ६.४० लाख रुपयांचा महसूल.
- ४१७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण पूर्णत्व दाखले प्रदान.
- प्राप्त प्रस्ताव १४, १० प्रस्ताव पात्र
- सेस निधीतून किडनी, हृदयरोग, कर्करोगग्रस्त गरजू रुग्णांना प्रत्येकी १५ हजाराची आर्थिक मदत.
- चालू आर्थिक वर्षात १.५ लाखांचे अनुदान खर्च तर १८.५ लाखाचे अनुदान शिल्लक

---

# ...त्याशिवाय त्यांची ‘दुकानदारी’च चालत नाही

## खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांचा पलटवार

▌ ‘अदृश्य शक्ती’ चालली म्हणूनच ११८ मते

▌ जयकुमार गोरे यांच्याऐवजी चंद्रकांत पाटील...



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जून-**

पराभव झाला तरी चालेल पण विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध होता कामा नये, असे आमचे राष्ट्रीय नेते खा.शरद पवार यांनी सांगितले. त्यामुळे आम्ही त्यांच्या आदेशाचे पालन केले. मात्र, मोहिते-पाटील यांच्या ‘इगो’मुळे ही निवडणूक लागली अन्यथा बिनविरोध झाली असती, असे आमच्या विरोधकांकडून सांगण्यात येते. मुळात जिल्ह्यात कुठेही, काहीही झाले की ही मंडळी मोहिते-पाटील घराण्यावर आरोप करतात. कारण, आमच्यावर आरोप केल्याशिवाय त्यांची ‘दुकानदारी’च चालत नाही, असा पलटवार खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केला.

आमचे विरोधक दोन्ही तोंडाने आमच्यावर टीकाटिप्पणी करत आहेत. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सत्ताधारी पक्षातील नेते, पदाधिकारी म्हणत होते की, मोहिते-पाटील अर्थात ‘महाविकास आघाडी’कडे फक्त १६ मते आहेत. आता म्हणताहेत; मोहिते-पाटलांची अदृश्य शक्ती चालली नाही. माझी ‘अदृश्य शक्ती’ चालली म्हणूनच आम्हाला ११८ मते मिळाली आहेत. हे त्यांनी विसरता कामा नये, असा उपरोधिक सल्लाही त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह सत्ताधारी पक्षातील नेतेमंडळींचे नाव न घेता दिला

आमच्याशी त्यांचे जमत नाही आणि आमच्याशिवाय त्यांना करमतही नाही; असे सांगत ते पुढे म्हणाले, मोहिते-पाटलांना एवढीच खुमखुमी होती तर घरचा उमेदवार उभा करायचा, असे आमचे विरोधक म्हणताहेत. परंतु आम्ही घरचा उमेदवार दिला असता तर ते म्हणाले असते की, मोहिते-पाटील घराणेशाही करतात. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी आमच्याशी नव्हे आमच्या वरिष्ठ नेत्यांशी करायची होती. जयकुमार गोरे यांच्या जागी चंद्रकांत पाटील हे पालकमंत्री असते तर त्यांनी सर्वांना एकत्र बोलवले असते आणि निवडणूक बिनविरोध केली असती.

#### मी कोणाचीही तक्रार करणार नाही

‘महाविकास आघाडी’च्या जे-जे पदाधिकारी, आमदार व इतर पुढाऱ्यांनी या निवडणुकीत ‘महाविकास आघाडी’चे काम न करता ‘महायुती’ला मदत केली, त्यांच्यावर पक्षश्रेष्ठी कारवाई करतील. मात्र मी कोणाचीही तक्रार करणार नाही, असेही खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

#### डीसीसी बँकेसंदर्भात खोटेनाटे आरोप

मोहिते-पाटलांमुळे डीसीसी बँक डबघाईला आली, असे आमच्या विरोधक सांगत आहेत. आमच्याकडे डीसीसीची थकबाकी आहे. पण ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. कोणाच्या काळात डीसीसी बँकेत सर्वात जास्त ठेवी होत्या, सर्वात मोठी कर्जमाफी कोणाच्या काळात झाली, कोणाच्या काळात बँक कशी चालली हे जिल्ह्यातील जनतेला माहिती आहे. उगीच आमच्यावर खोटेनाटे आरोप केले जात आहेत, असेही ते म्हणाले.

#### आ.राजेंद्र राऊत यांचे केले अभिनंदन

‘खासदार’ या नात्याने माढा मतदार संघात आणि आमचे नेते खा.शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात आपण काम करीत राहणार आहे. मतदार संघातील विविध विकास कामांना प्राधान्य देणार आहे, असे सांगताना विधानपरिषद निवडणुकीत निवडून आलेले ‘महायुती’चे उमेदवार राजेंद्र राऊत यांचे अभिनंदन-त्यांना शुभेच्छा, असेही सांगायलाही ते विसरले नाहीत.

---

### ‘महेश नवमी’निमित्त शोभायात्रा...



▶ सोलापूर : महेश नवमीनिमित्त येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने मंगळवारी शहरातील प्रमुख मार्गावरुन शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत लेझीम खेळ सादरीकरण करताना समाजबांधव.

---

# दूषित पाणीपुरवठ्यामुळे विडी घरकुलमधील भारत नगरवासीय संतप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

जुना विडी घरकुल परिसरातील भारतनगरसह आसपासच्या भागात गढूळ, दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सहा दिवसांनंतर पाणी आले असले तरी ते पिण्यायोग्य नसल्याने नागरिकांची चिंता अधिकच वाढली आहे.

दूषित पाणीपुरवठ्याबाबत संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना वारंवार माहिती देऊनही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दूषित पाण्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

पावसाळ्याची सुरुवात झाली असून पाणीपुरवठा



वाहिन्यांमध्ये गटारीचे पाणी मिसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाणीपुरवठा वाहिन्यांची तपासणी करावी. पाण्याची गुणवत्ता तपासून स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

---



# राज्यस्तरीय चर्चासत्रमध्ये विशेष शिक्षकांनी फोडली वाचा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून-**

महाराष्ट्रातील विविध महानगरपालिका क्षेत्रांत कार्यरत विशेष शिक्षकांच्या सेवाविषयक, प्रशासकीय, संघटनात्मक प्रश्नांविषयी जुळे सोलापुरातील सैफुल येथील सोनी महाविद्यालयात आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रमध्ये विशेष शिक्षकांनी आपल्या समस्यांना वाचा फोडली.

संघटनेचे राज्याध्यक्ष विजय देशमुख व दळवी सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या चर्चासत्रात विशेष शिक्षकांनी अडीअडचणी, भविष्यकालीन नियोजन, नियमित व वेळेवर वेतन मिळण्याबाबतच्या समस्या मांडल्या. वेतनाचा १०० टक्के निधी वेळेत उपलब्ध व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

महानगरपालिका स्तरावर विशेष शिक्षकांच्या पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करण्यात यावे, वेतन वितरणातील विलंबबाबत प्रभावी तोडगा काढण्याची आवश्यकता आहे, नियमित सेवेत समाविष्ट झाल्यानंतर राज्यस्तरावर स्वतंत्र विशेष शिक्षक संवर्ग निर्माण करण्यात यावे, असेही यावेळी सांगण्यात आले. अविनाश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन जाधवर यांनी आभार मानले. याप्रसंगी रश्मी परदेशी, किशोर वैरागकर, विठ्ठल वाघ, शरद गावडे, दत्तात्रय सोनवणे, बालाजी थिटे यांच्यासह सोलापूर महापालिका आणि राज्यभरातील विविध महानगरपालिकेतील विशेष शिक्षक उपस्थित होते.

---

# एमआयडीसी, सुनीलनगर परिसरातील अतिक्रमणे निष्कासित



### १६ अनधिकृत पत्राशेड, बांधकामांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने अक्कलकोट रोड एमआयडीसी, सुनील नगर परिसरातील अतिक्रमणे निष्कासित केले.

यावेळी १६ अनधिकृत पत्राशेड, बांधकामांवर कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या निर्देशानुसार, अतिक्रमण नियंत्रण अधिकारी नीलकंठ मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे कनिष्ठ अभियंता दीपक कुंभार यांच्यासह विभागीय कर्मचारी यांच्या पथकाने पोलीस बंदोबस्तात ही कारवाई केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४८१

**ऐसेय घ्यावें जेणें नये तुटी ।**
**बीज वाढे बीजा पोटी ।।**

मानवी जीवनात देवाण घेवाणीला अनन्यसाधारण महत्व आहे. प्रत्येकाला केव्हा ना केव्हा, कशाची का होईना पण देवाण-घेवाण ही करावीच लागत असते. इतरांना देणे जसे अवघड आहे, तसे इतरांकडून घेणेही अवघड आहे. आपल्याकडील जास्तीचे किंवा आपल्या कामाला न येणारे किंवा आपल्याकडे खराब होत असलेले कांहीतरी आपल्या प्रसिध्दीसाठी किंवा लोकांनी आपणाला मोठे, चांगले म्हणावे म्हणून इतरांना देणे म्हणजे योग्य देवाण आहे असे नव्हे. तसेच समोरचा कोणत्या का भावनेतून देईना, कांही का देईना मिळतय तर घ्याचं म्हणून घेणे म्हणजे योग्य घेवाण नव्हे. अर्थात योग्य देवाण-घेवाण तीच होय, जेथे देणारा आणि घेणारा दोघेही शुध्द मनाने, चांगल्या भावनेने देवाण-घेवाण करतात. चांगल्या गोष्टी, विचार-आचार याची देवाण-घेवाण ही एक अत्युत्कृष्ट अशी कला आहे. आपल्याकडील चांगल्या गोष्टी इतरांना देणे व इतरांकडून चांगल्या गोष्टींचा योग्य प्रकारे स्विकार करणे हे ज्याला जमते त्याच्यासारखा इतर कोणी भाग्यवंत असत नाही. आपली अशा भाग्यवंतात गणना होण्यासाठी आपण असेच कांही घ्यायला शिकावे की ज्या घेण्यामुळे देणाऱ्याकडील ज्ञानसंपदा कधीच संपणार नाही. उलट ती त्याच्या व आपल्या माध्यमातून उत्तरोत्तर बीजाप्रमाणे वाढतच जायला हवी. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**ऐसेय घ्यावे जेणें नये तुटी ।**
**बीज वाढे बीजा पोटी ।।**

आपल्या भारतीय समाजात अनेक ज्ञानी लोक आहेत. पण या सर्व ज्ञानी, अनुभवी लोकांना इतरांना त्यांच्याकडील ज्ञान देता येतेच असे नाही. सर्वांनाच इतरांना देण्याचे कौशल्य असते तर समाजात अंधश्रध्दा, अज्ञान टिकून राहिलेच नसते. अनेक ज्ञानी लोकांना घमंड असतो. मी माझ्याकडील कोणाला कांहीही देणार नाही. अशा संकुचित वृत्तीने हे लोक त्यांच्याकडील ज्ञान त्यांच्याकडेच ठेवतात. काहींना आपल्याकडील ज्ञान आर्थिक व्यवहारातूनच द्यावे वाटते. कांहीना इतरांना ज्ञान देण्याची कला नसते. या ज्ञानी, अनुभवींपैकी कांही लोक भोळसट स्वभावाचे असतात. हे लोक जेव्हा इतरांना ज्ञान देण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा लोक यांनाच वेड्यात काढतात. असो, आपण ज्ञानोबा-तुकोबांची विचारसरणी जोपासणारे असल्याने योग्य त्या देवाण-घेवाणीबद्दल आपणाला वेगळे सांगण्याची गरज भासणार नाही. कारण ज्ञानोबा-तुकोबांच्या प्रत्येक ओवी-अभंगातून आपण योग्य आचार-विचारांची देवाण-घेवाण करीतच आहोत. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. २४ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ शु. दशमी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- चित्रा (१३.५८)**
**योग - परिघ (१०.२२)**
**करण - वणिज (अहोरात्र)**
**राहू काल : बुधवार**
**दु. १२.०० ते ०१.३०**

**दिनविशेष : १८९९:**
**मराठी रंगभूमीवरचे नटसम्राट नानासाहेब फाटक यांचा जन्म.**
**१९३७: ज्येष्ठ लेखिका आणि पद्मभूषण पुरस्कार विजेत्या अनिता देसाई यांचा जन्म.**
**१९८२: कर्नाटक सरकारने राज्यातील सर्व शाळांमध्ये कन्नड भाषा शिकवणे सक्तीचे केले.**
**२००१ : आधुनिकीकरणानंतर 'आय.एन.एस. विराट' ही भारताची एकमेव विमानवाहू नौका पुन्हा नौदलात दाखल झाली.**

# स्मृती वन उद्यानात सोलापूरकरांनी बनवले सीडबॉल

## 'सामाजिक वनीकरण'च्या सहकार्याने इको फ्रेंडली क्लबचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

सिमेंटच्या जंगलात हरवत चाललेल्या निसर्गाला पुन्हा जिवंत करण्यासाठी आणि आगामी पावसाळ्यात हरित क्षेत्र वाढवण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने 'इको फ्रेंडली क्लब'ने स्मृती वन उद्यानात शेकडो सीडबॉल बनवले.

निसर्ग आपल्याला भरभरून देतो, आता आपली वेळ आहे! या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात पर्यावरणप्रेमी सोलापूरकर नागरिक, तरुण आणि बाल गोपाळांनी मोठा प्रतिसाद दिला. अवघ्या दोन तासांच्या कालावधीत शेकडो सीडबॉल (बीज गोळे) अत्यंत उत्साहात तयार करण्यात आले. तयार करण्यात आलेले शेकडो सीडबॉल आगामी आषाढी वारी आणि ट्रेकिंगदरम्यान सोलापूर परिसर आणि महाराष्ट्रातील विविध गड-किल्ले, डोंगर तसेच मोकळ्या



माळरानांवर टाकण्यात येणार आहेत. जेणेकरून पावसाळ्यात या बिया रुजून त्यांचे मोठ्या वृक्षांत रूपांतर होईल. सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी लक्ष्मण आवारे, सहायक वनसंरक्षक शुभांगी जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. वनपाल महेश हिरेमठ यांनी उपस्थितांशी संवाद साधला. प्रारंभी इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक, वसुंधरा मित्र परशुराम कोकणे यांनी सीडबॉल कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक दाखवले. सीडबॉल तयार केल्यानंतर झाडांच्या शीतल सावलीत सर्वांनी एकत्र बसून 'वनभोजना'चा मनसोक्त आनंद घेतला. या उपक्रमात इको फ्रेंडली क्लबचे समन्वयक अजित कोकणे, सदस्या डॉ. सुमेधा कंदलगावकर, शिक्षक चंद्रशेखर गुंजले, बांधकाम विभागाचे अधिकारी राजेंद्र जमादार, अर्चना जमादार, प्रा. शर्मिला करपे, कनिष्का करपे, डॉ. संतोष स्वामी, डॉ. गिरिजा स्वामी, अनया स्वामी, महावीर लाळे, रोहिणी तळेकर, जय भडंगे, केदार जोशी, सचिन जगताप, अमोल तारापुरे, बसवराज परांडकर आदी पस्थित होते.

### बच्चे कंपनीचा उत्साही सहभाग

मोठ्यांसोबतच या उपक्रमात माही, रुद्र, राही, वीर, राई, ईरा, ओम, निर्मिती, आणि पार्थ या आणि इतर बच्चे कंपनीने स्वतः चिखलात हात घालून सीडबॉल तयार करण्यात दाखवलेला उत्साह सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमात सहभागी होऊन सर्वांनी आनंद व्यक्त केला.



## आदिवासी समाजातील तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून द्या

### पारधी समाजाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजातील तरुणांना तात्काळ नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पारधी समाजाने एम एससीबीचे संचालक धनंजय औंढेकर यांच्याकडे केली आहे.

यावेळी समाजाचे अनिल चव्हाण, सिद्धाराम चव्हाण, सुमित चव्हाण, आशुतोष चव्हाण उपस्थित होते. समाजातील अनेक तरूण शासनाची आयटीआय परीक्षा उत्तीर्ण होऊन एमएसईबी विभागात इलेक्ट्रिशन अप्रेनशिप कोर्स करून जवळपास दोन ते तीन वर्ष होत आले त्यांना अद्यापपर्यंत नोकरीमध्ये समाविष्ट करून न घेतल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली असल्याचे त्यांच्या निवेदनात नमूद आहे. यावेळी त्यांनी सोलापूर जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांना सदर आदिवासी समाजातील तरुण व तरुणींना तात्काळ नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी अशा सूचना केल्या. यापूर्वी पालकमंत्री गोरे यांना भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्यामार्फत निवेदन दिले होते.



## सतीश महाराज देगलूरकर यांची लांबोटीतील हॉटेल सुनीलला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील हभप सतीश महाराज देगलूरकर यांनी मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथील चहा आणि चिवड्यासाठी प्रसिद्ध असलेल्या हॉटेल सुनीलला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत प्रमोद पटवारी हे होते. त्यांचे स्वागत हॉटेलचे मालक अभिमन्यू वाघमोडे व सुनील वाघमोडे यांनी केले. हॉटेल व्यवसायामध्ये वाघमोडे कुटुंबाने घेतलेली भरारी ही उल्लेखनीय आहे.

# दोन सराईत चोरट्यांना अटक; दुचाकी चोरीचे चार गुन्हे उघडकीस

### सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने दुचाकी चोऱ्या करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील दोन सराईत चोरट्यांना करून ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत १ लाख ३५ हजारांच्या चोरलेल्या ३ मोटार सायकली हस्तगत करण्यात आले आहेत.

ओंकार आनंदा वाघमोडे (वय २२ वर्ष, रा. माळशिरस, जि. सोलापूर) व राजेश वसंत घाडगे (वय २३ वर्ष, रा. अकलूज, ता. माळशिरस) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भीमगोंडा पाटील व त्यांचे पथक दि. २० जून रोजी पंढरपूर उपविभागात गस्त घालत असताना, अंमलदार समर्थ गाजरे यांना आरोपी ओमकार



वाघमोडे हा चोरीची बाईक घेऊन पंढरपूरकडून माळशिरसकडे वाखरी मार्गे माळशिरस कडे जात असल्याची माहिती मिळाली. माहितीप्रमाणे पोलिसांनी तात्काळ वाखरी येथील पालखी तळावर सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल तपास केला असता, त्याने ही गाडी नवी पेठ, पंढरपूर येथील एका हॉटेल समोरून त्याचा साथीदार राजेश घाडगे याच्या मदतीने चोरल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींकडून १ लाख ३५ हजारांच्या ३ मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. या प्रमाणे पोलिसांनी या चोरट्यांकडून पंढरपूर शहर, पंढरपूर ग्रामीण, सांगोला आणि हडपसर पुणे येथून दुचाकी चोरी केल्याचे चार गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदरची कामगिरी ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भीमगोंडा पाटील, हवालदार सलीम बागवान, विजयकुमार भरले, अंमलदार सागर ढोरे-पाटील, यश देवकते, समर्थ गाजरे, अनवर अत्तार आणि दिलीप थोरात यांनी पार पाडली आहे.



## अहिल्याबाई प्रशालेत रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**

अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे सिद्धेश्वर ब्लड बँक, वैशाली यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

संस्थापक हाजी बंदेनावाज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. यावेळी प्राचार्य इस्माईल शेख, प्रा. महेंद्र ढवाण, प्रा.धनाजी धेंडे उपस्थित होते.

## निकिता लाड हिने केली बीडीएस पदवी संपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून-**



शेळगी येथील निकिता राजेश लाड हिने बीडीएस पदवी यशस्वीरित्या संपादन करून कुटुंबासह परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे.

निकिता हिने कठोर परिश्रम आणि ध्येयाप्रती असलेल्या चिकाटीच्या बळावर हे यश मिळिवले. शिक्षणाच्या प्रवासात आई-वडिलांचे मार्गदर्शन आणि पाठबळ महत्त्वाचे ठरल्याचे तिने सांगितले. निकिताचे वडील नोकरी करीत असून आई गृहिणी आहेत. आई-वडिलांकडून मिळालेले संस्कार, समाजसेवेची भावना आणि मेहनतीची शिकवण यामुळेच यशाचा हा टप्पा गाठता आल्याचे तिने नमूद केले.

# शहरात विविध ठिकाणी जागतिक योग दिन उत्साहात साजरा



### एसव्हीसीएस प्रशाला एमआयडीसी

एसव्हीसीएस हायस्कूल एमआयडीसी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उपमुख्याध्यापक सुहास काटगांव, पर्यवेक्षक केदार पटणे यांच्यासह प्रशालेतील २४०८ विद्यार्थी व शिक्षकांनी स्पोर्ट्स ड्रेसमध्ये योगामध्ये सहभाग घेतला. प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रा. बसवराज कोरे यांनी विद्यार्थ्यांकडून योग प्रार्थना म्हणवून घेतले व श्रावणी बटगिरी या विद्यार्थिनीने योगावरील प्रतिज्ञा सादर केली. यावेळी बोलताना मुख्याध्यापक धनंजय नकाते यांनी योगासनाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका रोहिणी कल्याणशेट्टी यांनी केले. क्रीडा शिक्षक हनुमंत यळमेली यांनी आभार मानले.

### वसुंधरा कला महाविद्यालय

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखा वसुंधरा कला महाविद्यालय व स्वामी विवेकानंद प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. दिंगबर झोंबाडे, स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी काशिद वसुंधरा महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अशोक पाटील, हायस्कूलचे क्रीडाशिक्षक कृष्णा कोळी, सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते. भारत सरकार आयुष्य मंत्रालय,विवेकानंद केंद्र कन्याकुमाारी वसुंधरा कला महाविद्यालय ,राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग तसेच स्वामी विवेकानंद हायस्कूल आणि जुनियर कॉलेज क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १२वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या योग दिनानिमित्ताने विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, शाखा सोलापूरचे नगरसंचालक महेश गोंजारी, विशाल बिराजदार, संपर्क प्रमुख सुरेश वाघमोडे योगाचे प्रशिक्षण दिले.





### सोलापूर जिल्हा रुग्णालय

वाढते ताणतणाव, जीवनशैलीजन्य आजार आणि वृद्धापकाळातील आरोग्याच्या समस्या यावर प्रभावी उपाय म्हणून योगाचे महत्त्व अधोरेखित करत जिल्हा रुग्णालय, सोलापूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमातून नियमित योगाभ्यासाचे आरोग्यदायी फायदे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आले. आयुष विभाग आणि जिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चंद्रकांत क्षीरसागर, सहायक संचालक कुष्ठरोग डॉ. मोहन शेगार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. विजय वरवटकर उपस्थित होते. योग प्रशिक्षक अनिल वेदपाठक यांनी योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे मार्गदर्शन केले.



### नेताजी सुभाषचंद्र बोस स्कूल

निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक व इंग्लिश मिडीयम शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगशिक्षिका कीर्ती बुरा यांनी प्रार्थना,ग्रीव चालनासन, स्कंद खिचाव, स्कंद चक्र, कटि संचालन,गुटना संचालन, ताडासन,वृक्षासन,पादहस्तासन, अर्ध चक्रासन, त्रिकोणासन दंडासन, वज्रासन,वक्रासन,अर्ध अष्टांगासन, भुजंगासन, पर्वतासन, उत्तान पादासन, पवन मुक्तासन, सर्व प्रकारचे प्राणायाम, बाराखडीमधील हस्यासन आदी आसनाविषयी माहिती सांगून प्रात्यक्षिके सादर केले. शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, पहिली ते चौथीच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने योगासन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जगदेवी रोडगे,प्रशांत बत्तूल, राजश्री कोळी, अर्चना आरकल,सुनीता पवार, वैशाली मोरे,लक्ष्मी नडगिरी, रेणुका दंडवते व सर्व कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### विनोबा ॲप 'पोस्ट ऑफ द मंथ' पुरस्काराने दिपाली गोरे सन्मानित

**बार्शी, दि. २३ जून-**
आचार्य विनोबा भावे शिक्षक समृद्धी कार्यक्रमांतर्गत पोस्ट ऑफ द मंथ' हा पुरस्कार जि.प. प्राथ. शाळा नं. २, उपळाई ठोंगे येथील वर्गशिक्षिका दिपाली भास्कर गोरे यांना प्रदान करण्यात आला. गटशिक्षण अधिकारी गजानन बाजड, विस्तार अधिकारी बालाजी नाटके आणि धनाजी जाधवर यांच्या हस्ते श्रीमती गोरे यांना प्रमाणपत्र व 'एज्युकेशन हिरोज इन सीशन' सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. मुख्याध्यापक अनिल रामकृष्ण काळे, सर्व शिक्षकवृंद आणि शालेय व्यवस्थापन समिती यांनी दिपाली गोरे यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी अधिकारी वर्गाने दिपाली गोरे यांच्या नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतीचे व विनोबा ॲपवरील सक्रिय सहभागाचे कौतुक केले.



### उत्कर्ष विद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि.२२ जून-**
सांगोला येथील उत्कर्ष विद्यालयात जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी योगशिक्षिका आकांक्षा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगत विविध योगासने व प्राणायामांचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, वीरभद्रासन, भुजंगासन, वज्रासन, गरुडासन, पद्मासन आणि यांसारख्या योगासनांचा सराव केला. माध्यमिकचे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रशांत भोसले, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.





### शारदादेवी प्रशालेत जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**वैराग, दि.२३ जून-**
आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त २२ जून रोजी वैराग येथे शारदादेवी प्रशालेच्या प्रांगणामध्ये अंबिका कुटीर योग व अंबिका योगाश्रम वैराग शाखेच्या वतीने प्रशालेच्या विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवुन देत वेग-वेगळी योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. योग प्रशिक्षक पांडूरंग गवळी, महादेव पवार, महेश धोकटे यांनी योगा करण्या पुर्वीच्या सुक्ष्म हालचाली, विविध योग प्रकाराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. ते पाहून विद्यार्थ्यांनी मैदानावर सामुहिकरित्या योगासने केली. प्रास्ताविक प्रा. बलभिम लोखंडे यांनी केले तर आभार शुभम घायतिडक यांनी मानले. यावेळी मुख्याध्यापिका शशीकला पाटील, क्रीडा शिक्षक प्रताप खेंदाड, किरण निंबाळकर, रंजना शिंदे यांनी परिश्रम घेतले.

### शुक्रवारी राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धा

**सोलापूर, दि. २३ जून-**
लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन शुक्रवार, दि. २६ जून रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत करण्यात आल्याची माहिती बुद्धजय भालशंकर यांनी दिली आहे. ही स्पर्धा चार गटांमध्ये विभागण्यात आली असून बाल गट (वय ६ ते १० वर्षे), शालेय लहान गट (इयत्ता ५ वी ते ७ वी), शालेय मोठा गट (इयत्ता ८ वी ते १० वी) आणि खुला गट अशा गटांचा समावेश आहे.बाल गटातील स्पर्धकांना शाहू महाराजांचे दिलेले चित्र रंगवायचे आहे. शालेय लहान गटातील स्पर्धकांनी आपल्या आवडीचे शाहू महाराजांचे चित्र काढून रंगवायचे आहे. शालेय मोठ्या गटासाठी शाहू महाराजांच्या जीवनावरील कोणत्याही प्रसंगावर आधारित चित्र काढण्याचा विषय देण्यात आला आहे.



खुल्या गटातील स्पर्धकांनी शाहू महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे चित्र साकारायचे आहे.स्पर्धा पुढील ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. १) विश्वभूषण विद्यालय, अभिषेक नगर, अक्कलकोट रोड २) सोलापूर महानगरपालिका शाळा क्र. २८, सुंदरम नगर, विजापूर रोड, ३) नालंदा बुद्ध विहार, नालंदा नगर, नवीन आरटीओ ऑफिसजवळ, विजापूर रोड, ४) संघमित्रा माध्यमिक विद्यालय, आवताडे वसाहत, कुर्डुवाडी, ता. माढा ५) मातोश्री माध्यमिक विद्यालय, म्हैसगाव, ता. माढा. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नसून नावनोंदणी अनिवार्य आहे. नावनोंदणी आणि अधिक माहितीसाठी बुद्धजय भालशंकर ९९६०३७२७३६, आशुतोष तोंडसे ७०३८८८३३३९ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जि.प.चे सदस्यगण करणार आषाढी तयारीची पाहणी

## आषाढी वारीपूर्व नियोजनाला वेग; पालखी मार्गासह विकासकामांची होणार प्रत्यक्ष पाहणीसह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून**
आगामी आषाढी एकादशी यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा यंदा पंढरपुरात घेण्यात येणार आहे. गुरुवार दि.२५ जून रोजी सकाळी १२ वाजता स्वेरी कॉलेजमध्ये होणार असल्याचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सभेपूर्वी आषाढी यात्रेच्या तयारीचा आढावा प्रत्यक्ष ठिकाणी घेण्यासाठी जिल्हा परिषद पदाधिकारी आणि सदस्य पालखी मार्गासह विविध विकासकामांची पाहणी करणार आहेत.

चार वर्षांच्या प्रशासकीय कार्यकाळानंतर जिल्हा परिषदेत नव्याने लोकप्रतिनिधींचे नेतृत्व आले आहे. त्यामुळे नव्या सदस्यांना जिल्हा प्रशासनाच्या काम काजाची माहिती मिळावी. यात्रेपूर्व तयारीची प्रत्यक्ष पाहणी करता यावी, या उद्देशाने सर्वसाधारण सभा पंढरपुरात आयोजित करण्यात आली आहे.

यंदाच्या आषाढी वारीसाठी जिल्हा प्रशासनाने तयारीला सुरुवात केली असून, वारकरी, भाविक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर



भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती आणि सदस्य पालखी मार्गावरील सुविधा, स्वच्छता व्यवस्था, पिण्याचे पाणी, रस्ते आणि अन्य विकासकामांचा आढावा घेणार आहेत.



यंदाची आषाढी वारी चांगल्या पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने योग्य नियोजन करण्यात येत आहे. वारीच्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या तयारी पूर्णत्वास जात आहेत. त्याची पाहणी करण्यात येणार असून, सदस्यांच्या मागणीनुसार सभा पंढरपूर येथे घेण्यात येत आहे.
**- दीपक वैद्य,**
अध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर

## महाराष्ट्र सुवर्ण परिवारातर्फे शुक्रवारी सामुदायिक मोफत व्रतबंध सोहळा

### समाजगौरव पुरस्कार, गुणवंत विदयार्थ्यांच्या सत्कार समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२३ जून-**
महाराष्ट्र सुवर्ण परिवार, पंढरपूर यांच्यावतीने सामुदायिक मोफत व्रतबंध सोहळा, मान्यवरांचा समाजगौरव पुरस्कार आणि सुवर्णकार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले असल्याची माहिती महाराष्ट्र सुवर्ण परिवार, पंढरपूरचे मुख्य प्रवर्तक, सेवानिवृत्त कृषी अधिकारी, आयुर्वेदाभ्यासक रत्नाकर रामचंद्र वेदपाठक यांनी दिली.




कार्यक्रमास माजी मंत्री आ. विजयकुमार देशमुख, खासदार प्रणिती शिंदे,माजी पोलिस उपमहानिरिक्षक डॉ. शहाजी सोळुंखे, ओबीसी विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापिका वृषाली लहारे, आ. समाधान आवताडे, आ. अभिजीत पाटील आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून कराडचे प्रशांत पोतदार मेळाव्याचे अध्यक्षस्थान स्विकारतील.

कार्यक्रमास महाराष्ट्र सुवर्ण परिवाराचे संस्थापक अध्यक्ष रत्नाकर वेदपाठक, कोल्हापूरचे नारायण पोतदार, पंढरपूरचे हेमंतकुमार महामुनी, मोहोळचे महेश पंडित उपस्थित राहणार आहेत. सकाळी ८ ते ११.३० बटुंचे संस्कारविधी कार्यक्रम होत असून सकाळी ११.३० ते ३ मान्यवर व गुणवंतांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले आहे. यावेळी गणेश गोडबोले (महामुनी) यांचा स्वरांजली ऑर्केस्ट्राचा बहारदार संगीताचा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष हेमंतकुमार महामुनी, सहउपाध्यक्ष विशाल दिक्षीत, अध्यक्ष प्रशांत पोतदार तसेच मनोज कासेगांवकर, प्रशांत महामुनी, सुमित पारखे, संजय वेदपाठक, अमोल दिक्षीत, सारंग वेदपाठक, मिथून महामुनी, श्रीराज वेदपाठक, अक्षय दिक्षीत, शशिकांत पोतदार, सारंग महामुनी आदी बांधव प्रयत्नशील आहेत.

## मुलींनो, निर्भय होऊन जीवन जगायला शिका

### बाबासाहेब घाडगे; मळेगाव येथील मित्र विद्यालयात निर्भया पथकातर्फे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ जून-**
शालेय आणि सामाजिक जीवन जगत असताना महिला व तरुणींना त्यांच्या सुरक्षिततेची आणि कायदेशीर हक्कांची जाणीव असणे अत्यंत गरजेचे आहे. पोलीस प्रशासन आणि निर्भया पथक हे अहोरात्र तुमच्या सुरक्षेसाठी व सेवेसाठी सदैव तत्पर आहे. त्यामुळे मनात कोणतीही भीती न बाळगता मुलींनी निर्भय होऊन जीवन जगायला शिकले पाहिजे, असे आवाहन निर्भया पथकाचे प्रमुख बाबासाहेब घाडगे यांनी केले.



येथील मित्र विद्यालयात विद्यार्थिनींसाठी आयोजित विशेष मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक विलास मिरगणे होते.

बाबासाहेब घाडगे यांनी मुलींना गुड टच आणि बॅड टच मधील फरक ओळखण्याचे आवाहन केले, तसेच सध्याच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा वापर अत्यंत काळजीपूर्वक आणि योग्य कामासाठीच करावा, असा सल्लाही दिला. कार्यक्रमात पोलीस हवालदार उज्वला निंबाळकर यांनी उपस्थित विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला. त्यांनी मुलींच्या विविध समस्या, अडचणी जाणून घेत त्यांना कायदेशीर व मानसिक स्तरावर योग्य ते समुपदेशन केले आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक व कार्यक्रम अध्यक्ष विलास मिरगणे, प्राचार्य विकास बोराडे, पोलिस हवालदार उज्वला निंबाळकर, पोलीस कॉन्स्टेबल नम्रता गटकुळ, हनुमंत पाडुळे, भाऊसाहेब महानवर, हेमांगी सांगडे, गुलाब शेख, विकास ढेंगळे, शंकर आगलावे, राजेंद्र बागुल उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार शंकर आगलावे यांनी मानले.

## वटवृक्ष मंदिरात मराठी चित्रपट कॅलक्युलेटरच्या स्क्रिप्टचे पूजन

**अक्कलकोट, दि. २३ जून-**
येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात सौम्या प्रोडक्शन प्रस्तुत आगामी मराठी चित्रपट कॅलक्युलेटर याचे स्क्रिप्ट पूजन आणि पोस्टर लाँच सोहळा पार पडला.

मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते कॅलक्युलेटर चित्रपटाचे स्क्रिप्ट पूजन आणि पोस्टर लाँच करण्यात आले. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, अंकुश मांडेकर, चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक शुभम दळवी आणि निर्माते पल्लवी अगरवाल यांच्यासह मनिष शिंदे, सायली शिंदे, के. विजय, आदित्य पवार, स्नेहल करंडे, श्रावणी जाधव आणि अरुण पाणीभाते उपस्थित होते. स्क्रिप्टपूजन आणि पोस्टर लाँचनंतर चित्रपटाच्या संपूर्ण टीमने चित्रपटाच्या यशस्वी निर्मितीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कॅलक्युलेटर हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक वेगळा आणि मनोरंजक अनुभव ठरणार असल्याचा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले व सहकारी यांचा श्री स्वामी समर्थ महाराजांचे कृपावस्त्र देऊन सत्कार केला. यावेळी नगरसेवक अविनाश मडीखांबे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव उपस्थित होते.

## अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी लोखंडे

### ९ ऑगस्ट रोजी जयंती काढणार मिरवणूक

### विविध सामाजिक, प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून-**
साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे १०६ वी मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी साक्षांत लोखंडे यांची निवड करण्यात आली. दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी जयंती मिरवणूक काढण्यात येणार असून सुमारे ४५ मंडळांचा सहभाग राहणार आहे, अशी माहिती समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री उत्तम प्रकाश खंदारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे १०६ वी मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीची वार्षिक बैठक रविवारी इम्पॅरियल पॅलेस, सिंचन भवन येथे माजी राज्यमंत्री उत्तमप्रकाश खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी २०२६-२७ या वर्षासाठी समितीच्या नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.



१८ जुलै रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकातील पुतळ्यासमोर आदरांजली अर्पण करण्यात येणार असून गीतगायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर ३१ जुलै २०२६ रोजी रात्री अण्णाभाऊंच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. १ ऑगस्ट २०२६ रोजी शहरातील लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेची प्रतिष्ठापना होणार असून प्रबोधनपर गीतगायन कार्यक्रम सादर केला जाणार आहे. तसेच ९ ऑगस्ट २०२६ रोजी भव्य जयंती मिरवणूक काढण्यात येणार असून सुमारे ४५ मंडळांचा सहभाग राहणार आहे.

या मिरवणुकीत सामाजिक संदेश देणारे प्रबोधनपर देखावे, सांस्कृतिक सादरीकरणे आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जागर करणारे उपक्रम सादर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी अजय मोहिते, कार्याध्यक्षा वैशाली डोलारे, सचिव बंडू गवळी, सहसचिव कुणाल कांबळे, खजिनदार विशाल लोंढे, कायदेशीर सल्लागार ॲड. सुरज पाटोळे यांची निवड करण्यात आली. प्रमुख सल्लागार म्हणून सुरेश पाटोळे, सुहास शिंदे, खंडू बनसोडे, समाधान आवळे, हणमंतु पवार, महादेव भोसले, मुकुंद शिंदे, सतीश बगाडे, शांतीलाल साबळे, विकास कसबे, भैरू लोंढे, श्रीकांत देडे, राजू क्षीरसागर, रोहित खिलारे आदींची निवड करण्यात आली. या पत्रकार परिषदेस पदाधिकारी उपस्थित होते.



## भीम प्रतिष्ठानच्या वतीने मोफत शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जून-**
भीम प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या वतीने लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त शिवस्मारक, शिंदे चौक येथे मोफत शालेय साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रंगनाथ बंकापुरे, राजेंद्र शहा, संतोष गायकवाड आणि अश्विनी चव्हाण उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक, शैक्षणिक व लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. प्रतिष्ठानचे संस्थापक दलितमित्र बाबा बाबरे, अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, सचिव अकबर शेख व कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भीमराव माने, वैभव लोखंडे, प्रेम अंकुश, प्रदीप बाबरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सिद्धांत बाबरे, आभार प्रेम अंकुश यांनी मानले.

## श्री शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त 'शिवस्मारक'तर्फे 'प्रतापगडपर्व' महानाट्य

### मराठी आणि तेलगु भाषेत व्याख्यानांचेही आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जून-**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपति श्री शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या श्री शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अर्थात हिंदूसाम्राज्यदिनानिमित्त श्री छत्रपति शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे शुक्रवारी (दि. २६) सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात राज्यात प्रचंड लोकप्रिय झालेल्या 'प्रतापगडपर्व अन इतिहास घडला' या महानाट्याचे आयोजन करण्यात आले असून प्रवेश सर्वांसाठी मोफत आहे, अशी माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे गेल्या अनेक दशकांपासून श्री शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विविध सांस्कृतिक, बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदाच्यावर्षीही प्रतापगडपर्व या महानाट्याबरोबरच



शहरात दोन ठिकाणी व्याख्यानांचेही आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि. २७ जून) रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापुरातील भारतीय विद्यापीठाशेजारील मांगल्य मंगल कार्यालयात श्री शिवचरित्र व्याख्याते मोहन शेटे यांचे श्री शिवराज्याभिषेक या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर त्याचदिवशी (दि. २७ जून) सायंकाळी ६ वाजता अक्कलकोट रस्ता एमआयडीसी येथील पद्मावती कन्वेशन येथे सुप्रसिद्ध तेलगू अभिनेते तेनीकेल्ला भरणी यांचे श्री शिवराज्याभिषेक या विषयावर तेलगू भाषेतून व्याख्यान होणार आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या श्री शिवराज्याभिषेक या विषयावर तेलगू भाषेतून व्याख्यान सोलापुरात सलग दुसऱ्यावर्षी होत आहे. तसेच राज्यभर गाजत असलेले सुप्रसिद्ध श्री शिवचरित्र व्याख्याते मोहन शेटे यांच्या मराठी भाषेतून व्याख्यानाची संधी सोलापूरकरांना उपलब्ध झाली आहे.

या तीनही कार्यक्रमास सोलापूरकरांनी अधिकाधिक संख्येने उपस्थित रहावे आणि लाभ घ्यावा, असे आवाहन शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी याप्रसंगी केले. या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे संचालक प्रा. देवानंद चिलवंत, धनंजय कुलकर्णी, माधवी कुलकर्णी, प्रसाद जिरांकलगीकर, वरदराज बंग, उदय वैद्य, पुरुषोत्तम कारकल, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर उपस्थित होते.

### श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शनिवारी माल्यार्पण

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीदिनी अर्थात शनिवार दि. २७ जून रोजी सकाळी ८.३० वाजता शिंदे चौक येथील शिवस्मारकमध्ये शिवस्मारकतर्फे छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती मूर्तीस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. याप्रसंगी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन शिवस्मारकतर्फे करण्यात आले आहे.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राज्य परिवहन महामंडळातर्फे आज पंढरपुरात प्रवासी राजा दिन उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ जून-**

राज्य परिवहन महामंडळातर्फे सोलापूर जिल्ह्यात प्रवासी राजा दिन या उपक्रमाचे नियोजन केले असल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा, सुविधांमधील अडचणी,समस्या,तक्रारी व सुचना ऐकून घेऊन जिल्हास्तरावरील अधिकारी व आगार प्रमुखांनी उपस्थित राहून तक्रारींचे निराकरण करावे व सेवेतील त्रुटी तातडीने दूर कराव्यात असे आदेश महाव्यवस्थापकांनी दिलेले आहेत. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक आगारात एका बुधवारी प्रवासी राजा या उपक्रमाचे नियोजन केलेले आहे. यावेळी जिल्हास्तरावरील एसटीचे अधिकारी व संबंधित आगार प्रमुख उपस्थित राहून प्रवाशांच्या अडचणीचे निराकरण करणार आहेत. प्रवाशांनी प्रवासी ग्राहक संघटनांनी आगारानिहाय बुधवारी दु ११ते १ यावेळेत संबंधित आगार प्रमुख कार्यालयामध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाचे सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांतसदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख यांनी केले आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील प्रवासी राजा दिन**

आगारनिहाय - पंढरपूर (२४ जून), बार्शी (१जुलै), अक्कलकोट (८ जुलै), अकलूज (दि.१५ जुलै ).



## महत्त्वाचे...



### काँग्रेस समन्वय समितीची बैठक

**सोलापूर, दि. २३ जून-**

सोलापूर जिल्हा (पूर्व) काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस समन्वय समितीची बैठक उत्साहात पार पडली. जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी मार्गदर्शन करताना मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकन मोहिमेत पक्षाच्या BLA-१ व BLA-२ प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. कोणत्याही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले जाणार नाही यासाठी बूथ स्तरावर दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात २६ ते २८ जून रोजी BLA-२ प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. BLA प्रमुख डॉ. स्मिता शहापूरकर यांनी बूथ एजंटांनी मतदार नावांची पडताळणी करून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले. यावेळी राजेश पवार, गजानन जकीकोरे, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, संघटक सिद्राम पवार, लक्ष्मण भोसले, किशोर पवार, अॅड. गजेंद्र खरात, प्रमिला तुपलवंडे, गोविंदराव पंके, आरिफ पठाण, रविंद्र शिवशरण,नाथा ऐवळे, बापू आवघडे, लक्ष्मण बनसोडे, हर्षवर्धन गायकवाड, ज्योती गायकवाड उपस्थित होते.



### महावितरण संचालक धनंजय औंढेकर यांचे सोलापुरात स्वागत

**सोलापूर, दि. २३ जून-**

महावितरण मुख्य कार्यालय मुंबई संचालक (संचालन) धनंजय औंढेकर सोलापूर दौऱ्यावर आले असता, बालाजी सरोवर प्रिमियर हॉटेल येथे विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या वतीने विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती, संघटनेची स्मरणिका देऊन स्वागत व सत्कार करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर मंडळ अधीक्षक अभियंता सुनिल माने, संघटनेचे पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, अशोक निंबर्गी, संजीव बसरगी, संजय स्वामी, रामास्वामी कुंभार, अनिलकुमार बनसोडे, स्वप्निल कोरे उपस्थित होते.




### अध्यात्म आणि फिटनेसचा संगम; फिलिप्स आर अॅण्ड कर्मचाऱ्यांची पंढरपूर वारी

**बार्शी, दि. २३ जून-**

इंडो अॅथलेटिक सोसायटी आयोजित १०व्या पुणे ते पंढरपूर वारी सायकल मोहिमेत फिलिप्स हेल्थकेअरच्या कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेत २३५ किलोमीटरचा प्रवास १० तासात यशस्वीरीत्या पूर्ण केला. या मोहिमेत मनोज चोपडे (K२K), सारंग गुलाणे, अरविंद खलाटे, सुशील देवरे, गौरव परब आणि सागर यांनी सहभाग नोंदवत आरोग्य, तंदुरुस्ती आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम अनुभवला. दरवर्षीप्रमाणे यंदाही IAS टूर द पंढरपूर राईड' या आध्यात्मिक आणि प्रेरणादायी सायकलवारीत सहभाग घेण्यात आला. या संपूर्ण मोहिमेचे उत्कृष्ट नियोजन इंडो अॅथलेटिक सोसायटीने, गजानन खैरे, अजित, गणेश भुजबळ व सर्व स्वयंसेवक यांनी केले. सहभागींसाठी संपूर्ण प्रवासादरम्यान हायड्रेशन, प्रोटीनयुक्त आहार, वैद्यकीय मदत आणि तांत्रिक सहाय्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या वर्षीच्या मोहिमेतील सर्वात प्रेरणादायी बाब म्हणजे अवघ्या १२ वर्षांच्या स्वरद चोपडे (रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा विद्यार्थी) याने २३५ किलोमीटरचे अंतर सरासरी २३ किमी प्रति तास वेगाने पूर्ण करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

### शरद भोसले यांना महाधन योध्दा पुरस्कार

**सोलापूर, दि.२३ जून-**



प्रगत शेती, वैज्ञानिक पीक पोषण पध्दतींचा प्रभावी वापर केल्याबद्दल कोंढार चिंचोली (ता. करमाळा) येथील सरपंच शरद नाथसाहेब भोसले यांना महाधन योध्दा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ऊस लागवडीत संतुलित पीक पोषण, आधुनिक शेती तंत्रज्ञान, उत्कृष्ट उत्पादनासाठी हा सन्मान करण्यात आला.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळेस जागा देण्यास विरोध

## यमाई तलाव बचाव समितीची स्थापना, प्रसंगी न्यायालयात दाद मागणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जून-**

येथील यमाई तलावालगतची जागा श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळेस देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मात्र, यास स्थानिकांसह येथे नियमित फिरण्यास येणाऱ्या नागरिकांनी विरोध दर्शविला आहे. यासाठी यमाई तलाव बचाव समितीची स्थापना करण्यात आली आहे.

पंढरपूर शहरातील यमाई तलावालगतची सुमारे आठ एकर जागा श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळा विस्तारासाठी देण्याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे यमाई ट्रॅकवर फिरायला येणाऱ्या नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पंढरपूर नगरपरिषदेच्या निधीतून यमाई तलावाची देखभाल केली जाते. तसेच राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत या तलावाचे सुशोभीकरण करून पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यात आले आहे. दरम्यान मंदिर समितीकडे वाखरी, गोपाळपूर, देगाव व पंढरपूर तालुक्यात इतरही मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध आहेत. त्या जमिनीवर गोशाळा उभारणे अधिक योग्य व संयुक्तिक ठरणार अशी भूमिका नागरिकांनी मांडली.

शासनाने भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन या परिसरात पिकनिक स्पॉट, बोटिंग, सायकल ट्रॅक, ओपन जीम, ऑक्सिजन पार्क व इतर सार्वजनिक सुविधा उभारण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

या कारणाने सदर दिलेली मंजुरी तत्काळ रद्द करण्यात यावी, अन्यथा सरकारच्या या निर्णयाविरोधात पंढरपूर नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक, राजकीय, सामाजिक संस्था व नागरिकांच्यावतीने यमाई तलावच्या बचावासाठी मोर्चाचे नियोजन करून जनआंदोलन उभे केले जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान याबाबत आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी योगभवन येथे बैठक पार पडली. यामध्ये प्रसंगी न्यायालयात जाण्याचा निर्णय देखील घेण्यात आला.

### आज बैठकीचे आयोजन

पंढरपूर शहरातील सर्व नागरिकांना, राजकीय, सामाजिक संस्था व वृक्षप्रेमी,पर्यावरण प्रेमी नागरिक यांना विनंती की,पंढरपूर येथील यमाई तलाव लगतची जागा गोशाळेसाठी मंदिर समितीस देऊ नये म्हणून सरकारच्या या निर्णयाविरोधात पंढरपूर नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक, राजकीय,सामाजिक संस्था व नागरिक वतीने यमाई तलावच्या बचावासाठी भव्य मोर्चाचे नियोजन करून जन आंदोलन उभा करण्यात येणार आहे. तरी शहरातील सर्व पर्यावरण प्रेमी नागरिकांनी बुधवारी (दि. २४ जून ) सकाळी ७ वाजता यमाई तलाव ( तुळशी वृंदावनसमोर ) येथे बैठक आयोजित केली आहे तरी सर्व शहरातील नागरिक सामाजिक राजकीय व पर्यावरण प्रेमी यांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन यमाई तलाव बचाव समिती पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## 'एलएलबी'च्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरवात




**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.२३ जून -**

येथील स्वेरी लॉ कॉलेजमध्ये बीए एलएलबीच्या कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेस शुक्रवार, १९ जूनपासून सुरूवात झाली असून ही प्रक्रिया गुरुवार ९ जुलैपर्यंत चालणार आहे. या प्रक्रियेला विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुटचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

सन २०२६-२७ करीता पाच वर्ष मर्यादा असलेल्या बीए एलएलबी प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याकरिता स्वेरीमध्ये सुविधा उपलब्ध आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी लॉच्या प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन, पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होणारी अडचण व शंका याबाबत 'मार्गदर्शन सुविधा केंद्र' सुरु केले आहे. या प्रवेशासाठी कोणत्याही शाखेतून १२वी परीक्षा उत्तीर्ण होणारे विद्यार्थी पात्र आहेत. रजिस्ट्रेशन प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उच्चशिक्षित प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. उत्तम अनुसे मो. ९१६८६५५३६५ प्रा. विक्रम पाटील (मो. ९०९६०१६६२५ यांच्याशी संपर्क साधावा.

## सोलापूर जिल्ह्यात डॉल्बी व लेझर लाईट वापरास बंदी

**सोलापूर, दि. २३ जून-**

मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक कार्यक्रम व मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम तसेच लेझर लाईटच्या वापरामुळे नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हादंडाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सोलापूर जिल्ह्यात अशा साधनांच्या वापरास २६ जूनपर्यंत प्रतिबंध करणारा आदेश जारी केला आहे. या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक उत्सव मंडळांकडून आयोजित कार्यक्रम व मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईट शो वापरास बंदी राहणार आहे. मोठ्या आवाजातील डॉल्बी सिस्टीममुळे काही नागरिकांना कान व छातीचे गंभीर त्रास होण्याची शक्यता असून, लेझर लाईटमुळे विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांना इजा होऊ शकते. याबाबत विविध सामाजिक संघटना व नागरिकांकडून प्रशासनाकडे निवेदने प्राप्त झाली होती.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर व फौजदारी कारवाई करण्यात येईल.

## खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या विरोधात बार्शीत जोडेमारो आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जून-**

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी केल्याचा आरोप करत ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्यावतीने बार्शी येथील पोस्ट चौकात तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी खासदार ओमराजे निंबाळकर आणि गद्दार खासदार यांच्या प्रतिमेस जोडे मारुन निषेध व्यक्त केला. तसेच घोषणाबाजी करत त्यांच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. शिवसेना पक्षाशी व उद्धव ठाकरे यांच्याशी निष्ठा ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्याचा आरोप यावेळी उपजिल्हाप्रमुख देवा दिंडोरे यांनी केला.

या आंदोलनात शिक्षक सेनेचे बाळासाहेब मुडे, आयुबभाई मुजावर,आबा गपाट, माजी नगरसेवक बापू जाधव, जिल्हा सचिव दिपक तिवाडी, युवासेनेचे उपतालुकाप्रमुख स्वराज क्षीरसागर, तालुका समन्वयक अॅड.पांडुरंग घोलप, अर्जुन सोनवणे, महेंद्र गरड, गणेश खडके, मिठू बोराडे, अमोल मोरे, प्रकाश पोफळे, माजी सरपंच अशोक घायतिडक सहभागी झाले होते.

आंदोलन शांततेत पार पडले असून यावेळी पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

## भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना किमान ८ तास वीज द्या

### आमदार सुभाष देशमुख यांची अधिवेशनात मागणी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जून-**

भीमा नदीकाठच्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केवळ दोन तास वीजपुरवठा होत असल्याने शेती, पाणीपुरवठा योजना आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना किमान आठ तास नियमित वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात करीत भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधले.

आमदार देशमुख यांनी भीमा नदीवर अनेक बंधारे असून उजनी धरणाचाही परिसर याच नदीकाठी आहे. पाण्याची उपलब्धता असतानाही अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक पाणी उचलता येत नसल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

सध्या वीजटंचाईचे कारण देत भीमा नदीकाठच्या अनेक गावांमध्ये केवळ दोन तास वीजपुरवठा केला जात आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या पाणीपुरवठा योजना बंद पडल्या असून पिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. याचा थेट परिणाम शेती उत्पादनावर होत आहे. तसेच ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र झाली असून जनावरांसाठीही पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आमदार देशमुख यांनी यावेळी महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील वीजपुरवठ्याची तुलना केली. कर्नाटक राज्यातील भीमा नदी परिसरातील शेतकऱ्यांना आठ ते दहा तास नियमित वीजपुरवठा केला जातो. मात्र महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्याच नदीकाठच्या भागात अत्यल्प वीज मिळत असल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र शासनाने कर्नाटकच्या धर्तीवर निर्णय घेऊन भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना किमान सात ते आठ तास नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी जोरदार मागणी आमदार देशमुख यांनी अधिवेशनात केली. शेती, पिण्याचे पाणी आणि पशुधन या तिन्ही क्षेत्रांसाठी अखंडित वीजपुरवठा अत्यावश्यक असल्याने शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## आर.बी. ज्वेलर्स दुकानाचे शटर उचकटून ५७ हजारांचा ऐवज चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जून-**



अज्ञात चोरट्याने एका सोन्याचा मुलामा देऊन विकण्यात येणाऱ्या दागिण्याच्या दुकानाचे शटर उचकटून रोख रक्कम आणि मोठ्या प्रमाणावर सोन्याचे दागिने व मौल्यवान रत्ने मिळून एकूण ५७ हजार रुपयांचा ऐवजचोरून नेल्याची घटना विजापूर नाका भागातील आनंद नगर येथे सोमवार रोजी उघडकीस आली. दरम्यान या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ऋषिकेष राजेश भुमकर (वय २५, रा. विजय देशमुख नगर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी भुमकर यांचे आनंद नगर येथे 'आर बी ज्वेलर्स' नावाचे दुकान आहे. दि. २१ ते २२ जून दरम्यानच्या रात्री अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर कशाच्या तरी सहाय्याने उचकटून आत प्रवेश केला. चोरट्याने दुकानाच्या कॅश काउंटरमधील ३६ हजार ९०० रुपये रोख आणि जेन्टस लॉकेट ७ नग, जेन्टस रिंग ५ नग, ब्रासलेट ५ नग, लेडीज छल्ले ८ नग, लेडीज रिंग ६ नग, १ पाचू आणि २ राशी रत्ने असे एकूण ५६ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादित म्हटले आहे. पोलीस हवालदार शिर्के हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.